म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 833

# काव्यकलेचं अंतरंग

REFBK-0006377

के. नारखेडे

वा.क्र. ६२२८ निबंध २८८
७३००
८०२८
निबंध
२५/१/७३

# काव्यकलेचें अंतरंग

(काव्यविषयक निबंधांचा संग्रह)

REFBK-0006377

लेखक
के. नारखेडे
वाङ्मयविशारद

किंमत २ रुपये

प्रकाशक
दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर,
५२९ सदाशिव पेठ, पुणें २.

★

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

★

आवृत्ति १ ली : १९४३

★

मुद्रक
प्रल्हाद भास्कर काळे,
प्रतिभा प्रेस, ३३५ शनिवार पेठ, पुणें २.

# निवेदन

—:०:—

सुमारें चार वर्षांपूर्वी मीं या पुस्तकाच्या लेखनाला सुरवात केली. प्रत्येक विषयाचा सांगोपांग अभ्यास करून मीं हे लेख माझ्या सवडी-नुसार लिहिले व ते कांहीं मासिकांतून प्रसिद्ध केले. लढाईमुळें वाढत चाललेल्या या महागाईच्या काळांत हे लेख संकलित स्वरूपानें प्रसिद्ध करण्याचें मी टाळीत होतों; परंतु माझे मित्र नानासाहेब जोशी, अण्णासाहेब लोखंडे, बाबूराव ठोकळ व दयार्णव कोपर्डेकर यांच्या प्रेमळ आग्रहामुळें 'काव्यकलेचें अंतरंग' आज प्रसिद्ध होत आहे.

या पुस्तकांतील विषय अत्यंत विवाद्य आहेत. त्यांतलि विचार सर्वांनाच पटतील, रुचतील असें नाहीं. कांहीं वाचकांना माझे विचार पूर्णपणें पटले नाहींत, तरी त्यांत ग्राह्यांश आहे एवढें जरी त्यांना वाटलें तरी त्यांत मला समाधान आहे.

या पुस्तकांत शेवटीं घातलेला 'आमचीं जानपदगीतें' हा लेख अगदीं अलिकडे लिहिलेला आहे. जानपदगीतांसंबंधीं जीं निरनिराळीं मतें आढळलीं त्या सर्वांचा योग्य तो परामर्ष घेण्याचा प्रयत्न मीं या लेखांत केला आहे. 'शिवार' हा माझा जानपदगीतांचा संग्रह प्रसिद्ध झाल्यावर निरनिराळ्या टीकाकार मित्रांकडून जे निरनिराळे अभिप्राय आले त्यांचा विचार साकल्यानें या लेखांत केला आहे. 'शिवार' मधील कविता मला जानपद भाषेंत अगर बोलभाषेंत लिहितां आल्या नसत्या, असें मला परिचित असणारा कोणीहि इसम म्हणूं शकणार नाहीं; पण तें मला पसंत नव्हतें.

रा. चंद्रशेखर व रा. तांबे यांच्याविषयींची टीका त्यांच्या भक्तांना कदाचित् फार कठोर वाटेल, पण मी त्यांना एवढेंच सुचवूं इच्छितों कीं, त्या श्रेष्ठ कवींविषयींच्या आदरभावनेच्या बाबतींत मी त्यांच्या कोणत्याहि भक्ताला हार जाणार नाहीं.

माझ्या कांहीं कविमित्रांचा मी ठिकठिकाणीं उल्लेख केला आहे; कांहींवर मला टीका करावी लागली आहे. ते माझ्या हेतूविषयीं गैर-समज करून घेणार नाहींत अशी माझी अपेक्षा आहे. तरीहि माझ्या टीकेमुळें कोणाचें मन दुखावलें गेल्यास त्यानें उदार हृदयानें मला क्षमा करावी.

१ ऑक्टोबर १९४३.
न्यू एरिया,
भुसावळ.

के. नारखेडे

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १ कला, जीवन आणि आनंद | .... | .... | १ |
| २ कलेचें अधिष्ठान | .... | .... | १४ |
| ३ कलेंतील वास्तवता | .... | .... | २८ |
| ४ काव्याविषयीं अपेक्षा | .... | .... | ४० |
| ५ काव्याची उपयुक्तता | .... | .... | ५५ |
| ६ काव्य-कलेची उपासना | .... | .... | ६९ |
| ७ कवीचें काव्य व शील | .... | .... | ७७ |
| ८ आमची राष्ट्रीय कविता व तिचें यशोमापन | | .... | ८७ |
| ९ आमचीं जानपदगीतें | .... | .... | ९७ |

# के. नारखेडे यांचें वाङ्मय

## प्रकाशित—

१ चंद्रकला

स्फुट कवितांचा संग्रह — किंमत १ रुपया

२ बालगीत-माला

लहान मुलांकरितां कविता — किंमत २ आणे

३. शिवार

जानपदगीतांचा संग्रह — किंमत १ रुपया

४ काव्यकलेचें अंतरंग

काव्यविषयक निबंधांचा संग्रह — किंमत २ रुपये

## आगामी—

५ किलबिल

बालगीतांचा संग्रह

मित्रवर्य अच्युतराव ऊर्फ

दादासाहेब चौधरी

यांस

अर्पण

# काव्यकलेचें अंतरंग

## कला, जीवन आणि आनंद

कला व जीवन यांमध्यें अधिक महत्त्वाचें स्थान कोणाचें? हा अत्यंत वादग्रस्त प्रश्न आहे. कित्येक रसिक कलेचें महत्त्व जास्त मानतात; कित्येक पुरुष जीवनापुढें सर्वच कला तुच्छ मानतात व बरेच हा वाद कां होतो हें लक्षांत न आल्यामुळें त्याकडे उपेक्षेनें दुर्लक्ष करितात.

कांहीं कलाभिज्ञ रसिक सांगतात कीं, जीवनाचें महत्त्व नाकबूल करितां येणार नाहीं, पण जीवनामध्यें कलेला इतकें महत्त्वाचें स्थान आहे कीं, तिच्यावाचून जीवित कंठणें अशक्य होतें. आनंदहीन, यंत्राप्रमाणें जीवन व्यतीत करणाऱ्या माणसामध्यें व घाण्याच्या बैलामध्यें फरक नाहीं. आनंदप्राप्ति हा कलेचा मुख्य उद्देश, जीवनाचा मुख्य उद्देशहि तोच आहे. पतिपत्नित्वाच्या जाळ्यांत मनुष्य प्राणी स्वतःस अडकवून घेतो, तो त्यांत आनंदलाभ होईल हें वाटल्यामुळेंच. कनक व कांता हीं जगांतील वादाच्या मुळाशीं असतात व त्या वादामुळेंच जगाच्या नकाशाचे रंग पालटतात. हा कनक व कांता यांचा इतका हव्यास मनुष्याला असण्याचें कारण, त्यांच्या लाभामुळें आनंद व सुख लाभेल, असें त्याला वाटत असतें, हें आहे. आनंदावांचून जीवन व्यर्थ आहे व आनंदाची प्राप्ति कलेपासून प्रामुख्यानें होते, म्हणून कलेचें महत्त्व जीवनापेक्षांहि जास्त मानावयास पाहिजे असें मत ते प्रतिपादन करूं लागतात.

जीवनाचें महत्त्व वाजवीपेक्षां जास्त दाखविण्यांत येतें असें त्यांना वाटतें. मनुष्य पुष्कळदां ज्या जीवनाचें अतिशय महत्त्व मानलें जातें, त्या जीवनावर क्षुल्लक कारणाकरितां पाणी सोडावयास तयार होतो. एकाला मानभंग असह्य झाल्यामुळें जीवित भारभूत होतें, तर दुसऱ्याला शत्रूला पाठ दाखविण्यापेक्षां मृत्यु पत्करणें श्रेयस्कर वाटतें. प्रणयिनीच्या प्रेमाखातर एखादा तरुण जीवावर उदार होतो, तर देशप्रेमासाठीं प्रणयिनीसह आत्मसमर्पण करण्यास दुसरा तरुण समरकुंडांत उडी घालतो. कुणी पिता आपल्या बाळाकरितां प्राणाला कःपदार्थ समजतो. एखादी माता आपल्या मुलाकरितां मरावयास सज्ज होते. कुणी भगिनी आपल्या भावाच्या सुखाकरितां प्राण देते. पतिविरहांत आपलें जीवित कंठणें अशक्य म्हणून एखादी साध्वी स्वतःस जाळून घेते, तर दुसरी त्याच्या पश्चात् झुरून झुरून मरते.

जीवनाचें महत्त्व सर्वांत जास्त मानलें जातें, पण जीवनाचा त्याग करण्यास मनुष्य कित्येकदां सहज रीतीनें तयार होतो. याचें कारण एक तर जीवनांत आनंद–सुख–लाभाची पुन्हां प्राप्ति होण्याची त्याला आशा नसते अगर आपल्या जीवितनाशानें आपल्या प्रिय व्यक्तीच्या आनंदांत भर पडण्याजोगी परिस्थिति निर्माण होईल असें वाटल्यामुळें त्याला समाधान वाटत असतें, हें आहे.

कित्येक लोक आत्महत्या करून अमूल्य गणल्या जाणाऱ्या प्राणाचा त्याग करावयास सज्ज होतात याचें कारण, त्यांचा भविष्यकाळ त्यांना अंधःकारमय वाटतो, हें होय. सारांश, जीवनाचें महत्त्व कितीहि मोठें मानलें तरी त्याची किंमत, त्यामध्यें सुख व आनंद हीं नसतील तर, कवडी-मोल होय. तें जीवन भारभूत होतें व ज्याला तसलें जीवन कंठावयाची पाळी येते, तो मनुष्य देवाची प्रार्थना न करितां, मृत्यूची प्रार्थना करूं लागतो. म्हणूनच जीवनांत आनंद उत्पन्न करणाऱ्या कलेचें महत्त्व जीवनापेक्षांहि अधिक मानण्याकडे कांहीं कलाभिज्ञांची प्रवृत्ति वळते.

जीवनांत आनंदाचें स्थान महत्त्वाचें असलें व आनंद कलेपासून मिळत असला, तरी तिची पायरी जीवनापेक्षां फार खालची आहे, असें कांहीं व्यवहाराचा अनुभव घेतलेले स्वानुभवानें सांगतात. कलेवांचून जीवन काढतां येणें शक्य आहे, पण जीवनावांचून कलेला काय किंमत येणार असें ते विचारतात. कला जीवनांत आनंद देणारी असली, तरी दुसऱ्याहि अशा अनेक गोष्टी आहेत कीं, त्यांपासूनहि मनुष्यास आनंद होतो. कला हें जीवनांत आनंद उत्पन्न करण्याचें साधन आहे; त्याला साध्याइतकें महत्त्व केव्हांहि मिळणार नाहीं. ज्या ज्या गोष्टींपासून आनंद प्राप्त होतो, त्या त्या गोष्टींत कलेचें वास्तव्य मानण्याची कांहीं लोकांची प्रवृत्ति होते. त्यांना सागराच्या लहरींत कला दिसते. निःशब्द वाऱ्यावर डोलणाऱ्या वृक्ष-लतांच्या पानापानांत कलेला ते पाहूं शकतात. विजेच्या चकचकाटांत व घनांच्या भीषण गर्जनेंत त्यांना कला आढळते. पण अशा रीतीनें कलेची व्याप्ति वाढविल्यास, ज्यामुळें सर्व आनंदाचा लाभ घेतां येतो, तें जीवन त्या कलेचें प्रमुख अंग होईल.

जीवन आणि आनंद व जीवितनाश आणि दुःख, ह्या कल्पना बाह्यतः भिन्न वाटत असल्या, तरी विचारांतीं त्या अभिन्न असल्याचें दिसून येईल. जीवन म्हटलें कीं, आनंदाचीच आम्ही कल्पना करितों व मृत्यु म्हटला कीं, दुःखाशिवाय दुसरी भावना क्वचितच आमच्या हृदयांत खळबळ करिते, आणि मग वरच्या कल्पनेप्रमाणें जीवनांत व कलेंत फारसा फरक राहात नाहीं.

" जगण्यांत मौज आहे, आनंद आहे " व " आनंदांत कला आहे " असें वाटत असल्यामुळें, कित्येक कलावन्त म्हणविणारांनीं आपल्या जीवनाचें मातेरें करून घेतलें आहे. कलेच्या नादानें बहकून जीवनापेक्षां कलेचें महत्त्व अधिक मानणाऱ्या कांहीं या असल्या कलावंतांनीं, आपल्या मुलाबाळांची, पत्नीची जी दुर्दशा केली, ती वाचून त्यांचा तिरस्कार वाटूं लागतो. कलेकरितां कला असली बडबड करणाऱ्या या रसिकांनीं

स्वतःच्या आयुष्याची राखरांगोळी तर केलीच, पण आपल्याबरोबर आपल्या कलांनाहि हास्यास्पद ठरविलें. कवि हा शब्द थट्टेचा निदर्शक व्हावयास हे असेच कलावंत कारणीभूत झाले आहेत. गवई म्हटला कीं, तो हेकड, लहरी, व्यवहारशून्य अशीच आमची कल्पना होते.

कलावंतांविषयीं आम्हांला आदर वाटतो, अशी आमची समजूत असते. तो आदर त्यांच्या कलेविषयीं वाटत असतो, त्यांच्याविषयीं वाटत नाहीं व म्हणून त्यांच्या कलांचा आस्वाद जोंपर्यंत लांबून मिळतो, तोंपर्यंत ठीक असतें. त्या कलावंतांच्या निकट सहवासांत राहण्याची आमची पुष्कळांची इच्छा नसते.

कलेकरितां कला असें अट्टाहासानें सांगून जीवनाकडे दुर्लक्ष करणें केव्हांहि श्रेयस्कर नाहीं. जीवनाला जर राणीची उपमा दिली तर कलेला तिची दासी म्हणतां येईल, इतकीच तिची योग्यता आहे, हें ह्या व्यवहारी लोकाचें प्रामाणिक मत असतें. दासीचें काम राणीला संतोष देण्याकरितां झटावयाचें हेंच. राणीच्या आसनाला तिनें स्पर्श करावयाचा तो फक्त तें व्यवस्थित करण्याकरितांच. तिनें त्या आसनावर कधींहि बसावयाचें नाहीं, इतकेंच नाहीं, तर त्याला पादस्पर्शहि करावयाचा नाहीं. त्याचप्रमाणें जीवनापुढें कलेची किंमत मानली पाहिजे. रमणीय उद्यानांतील प्रफुल्ल पुष्पांच्या सुवासाचें सेवन करून पोटांतील आग विझवितां येणार नाहीं. तृषेनें व्याकुळ होऊन सहारासारख्या वाळवंटांत इतस्ततः भटकत असतां, चित्रांतील निर्झराचें पाणी पिऊन तळमळणारा जीव शांत होणार नाहीं. भुकेनें कासावीस झालों असतां, गंधर्वांच्या गाण्यांत मौज वाटणार नाहीं व तरवारीच्या धारेखालीं मान सांपडली असतां समोरचें रंभेचें नृत्यहि आनंद देणार नाहीं. बळी देण्यापूर्वी बोकडाला कितीहि सजविलें अगर फांशी देण्यापूर्वी शिक्षा झालेल्या माणसाला त्याच्या मरणकाळची इच्छा पुरविण्याची कितीहि तत्परतेनें तयारी केली, तरी त्याचा उपयोग काय ? सारांश, जीवन व कला यांची तुलनाच करणें अयोग्य आहे असें त्यांना वाटतें. सुंदर

सतारीच्या तारा तुटल्या, तर तात्पुरता विरस होईल; पण जीवनसतारीच्या तारा तुटल्यास कायमचा विरस होतो. कितीहि सुंदर कलाचित्र असलें, तरी लहान मुलाला खेळण्याचें जितकें महत्त्व व उपयुक्तता, तितकीच माणसाला त्याची उपयुक्तता व महत्त्व. खेळणें इस्वलें अगर काढून घेतलें तर मूल रडेल, ओरडेल, आकांत करील, पण घटकाभरच. खेळतां खेळतां तेंच खेळणें उशापायथ्याशीं टाकून, तें स्वस्थपणें झोंप घेईल व त्याचा त्याला विसर पडेल. पण जीवनाचें तसें नाहीं. म्हणून आनंदहीन जीवन व्यतीत करणें कठीण खरें, तरी जीवनाचा त्याग करणारे थोडेच सांपडतात. जगांत सुखापेक्षां दुःख जास्त आहे हें माहीत असूनहि, सुखाची आशा नष्ट झाल्यावरसुद्धां, मनुष्य जीवन धारण करितो, याचें कारण त्याला जीवनाचें महत्त्व सर्वांत जास्त वाटत असतें, हें होय.

या दोन्ही मतांचे लोक आपआपल्या मतांच्या अभिनिवेशांत इतर गोष्टींचा विचार करीत नाहींत. कला व जीवन यांचें महत्त्व ठरवितांना कोणती कसोटी वापरावयास पाहिजे, हा महत्त्वाचा मुद्दा उपेक्षिला जातो.

जीवापेक्षां कांहींहि प्रिय नसतें हें सर्वमान्य असलें, तरी कित्येक वेळां मनुष्य सहज रीतीनें जीवावर उदार होतो. जीवनाचीं साधनें मिळावीं म्हणून पैसा हवा असतो व तो मिळविण्याकरितां जीवावर उदार झालेले कितीतरी लोक आपणांस आढळतात. लष्करांत गोळा झालेल्या बहुतेक शिपायांच्या मनोवृत्तीकडे पाहिल्यास हेंच दिसून येईल. पैशाकरितां लढणारे व प्राण अर्पण करण्यास तयार असलेले लोक मिळाल्यामुळेंच इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांत स्थापन झालें.

कलेविषयींहि असेंच म्हणतां येईल. कला कला म्हणून वेडे होणारे, कित्येक प्रसंगीं त्याच आपल्या कलांना पायदळीं तुडवितात. सतारीच्या गोड सुरांनीं नागाप्रमाणें डोलणारे कलावंत, त्या सतारींतून एकादे वेळेस मनासारखे सूर न निघाल्यास, ती दगडावर आपटून तिचे तुकडे तुकडे करतील. पोटाची आग भडकली असतां आपल्या प्रिय कलेचा ते बाजार मांडतील.

यामुळेंच कला व जीवन यांमध्यें रण माजून निश्चित निकाल लागणें कठीण झालें आहे. ह्या वादामध्यें प्रत्येकजण आपापल्या मताप्रमाणें एकाला श्रेष्ठतर ठरविण्याचा अट्टाहासानें प्रयत्न करीत असतो. कला व जीवन यांची योग्यता ठरविण्याची कसोटी ते ठरवीत नसल्यामुळें तो वाद जास्त चिघळत जातो.

त्यांची योग्यता ठरविण्यासारखी एकादी कसोटी आहे काय, हा प्रश्न साहजिकच उपस्थित होतो. तशी कसोटी असल्यास या वादाचा निकाल ठरविणें सोपें जाईल.

जीवनांत आम्हांला आनंद हवा असतो व कला आनंदप्राप्तीकरितां असते; पण आनंदाचा लाभ होणें पुष्कळदां **मनः स्थितीवर** अवलंबून असतें. मन समाधानांत सुस्थितींत असेल, तें चिंता, श्रम, दुःख यांपासून मुक्त असेल अगर त्याची जशी ठेवण असेल, त्यावर त्याला एकाद्या गोष्टीपासून आनंद होणें अगर न होणें अवलंबून असतें. मनाची ही स्थिति व जीवन यांचा अत्यंत निकट संबंध आहे. मन सुस्थितींत नसेल तर आनंदोत्पादक गोष्टीहि मनुष्याला आनंद देऊं शकणार नाहींत. साखर गोड लागते, पण एकुलत्या एक पुत्राच्या निधनानें व्याकुळ झालेल्या विधवेला ती गोड लागणार नाहीं. भूक लागत नाहीं म्हणून कुरकुरणाऱ्या धनिकाला पक्वान्नांचें जेवणहि रुचकर लागणार नाहीं; उलट दिवसभर काबाडकष्ट करून, थकून आलेल्या शेतकऱ्याला त्याच्या बायकोनें पुढें ठेवलेल्या झुणकाभाकरींत अमृताची गोडी वाटेल. नेहमीं पंचपक्वान्नांना बोटानें दूर सारणारा भूपति शिकारीमागें धांवत पळत वाट चुकल्यावर, रानांतील एखाद्या झोपडींत रात्र काढण्यास मिळाली तर आनंद मानतो व तेथें मिळालेली जळकी शिळी भाकरीहि त्याला त्याच्या पक्वान्नांपेक्षां अधिक रुचकर लागते. आळसांत लोळून दिवस घालविणाऱ्या श्रीमंताला चंदनाच्या पलंगावरचें नकसकाम पाहण्यांत रात्र घालवावी लागते; तर एखाद्या श्रमानें थकलेल्या हमालाला दगडावर गाढ

झोंप मिळून आनंद लाभतो व तो उत्साहानें उठून कामाला लागतो. सतत बावीस तास आपल्या प्रयोगाकडे पहात राहणाऱ्या शास्त्रज्ञाच्या चेहऱ्यावर कंटाळल्याचें चिन्ह दिसत नाहीं, तर प्रहरभरसुद्धां एखाद्या रमणीय उद्यानांत वेळ काढणें एकाद्याला अशक्य होतें.

मनाची ठेवण जशी असेल, त्याप्रमाणें कलाचित्रापासून आनंद होतो. खेडेगांवच्या महादू पाटलाला तमाशांत एखाद्या पोरानें लावणी म्हटली असतां जसा आनंद होईल, तसा अब्दुल करीमखांच्या गाण्यापासून होणार नाहीं. आमच्या महंमद शिपायाला दुर्गा खोटेचा अगर शांता आपटेचा अभिनय पाहतांना कदाचित् जांभया येतील; पण एखाद्या मुन्नाजानच्या नखऱ्यानें तो बेहद्द खूष होईल. ताजमहालचें सौंदर्य एखाद्याला बेभान करील, तर निसर्गाच्या सौंदर्यापुढें दुसऱ्याला तें तुच्छ वाटेल. पै पैसा जमविण्यांत एखाद्याला सुख सांठविलेलें आढळेल, तर याचकांना तो देण्यांत दुसऱ्याला आनंद होईल. कोंपरापासून मनगटापर्यंत सोन्याच्या बांगड्या घातलेली, दागिन्यांच्या ओझ्यानें वांकलेली आपली पत्नी एखाद्या शेटाला सुन्दर दिसेल, तर नुसती एकदाणी गळ्यांत असलेली आधुनिक युवती तिच्या प्रियकराला मोहक भासेल. गवयाला सतारीचें जें मोल वाटेल, तेंच शिकाऱ्याला आपल्या बंदुकीचें वाटेल. सतारीचे सूर ऐकून गवयाचें अंतःकरण नाचूं लागेल. वाघाची गर्जना कानीं पडतांच शिकाऱ्याच्या चेहऱ्यावर उत्साहहास्य चमकूं लागेल. एखाद्या गणितज्ञाला आंकडेमोड करण्यांतच खरा आनंद प्राप्त होईल. एखाद्याला देशभक्तिपूर्ण गीतें आवडतील तर दुसरा लावण्यांवर खूष होईल. तिसऱ्याला भावगीतांची मोहिनी पडेल. कुस्तीची कला प्राप्त व्हावी म्हणून आपलें आयुष्य घालविणारे मल्ल आपणांस आढळतील, तर क्रिकेटच्या क्षेत्रांत प्राविण्य मिळावें म्हणून जीवापाड मेहनत करणारे खेळाडूहि आपणांस थोडे थोडके दिसणार नाहींत.

या मनःस्थितीमुळें एकच गोष्ट भिन्न भिन्न व्यक्तींच्या जीवनावर भिन्न

भिन्न परिणाम करूं शकते. परपुरुषाच्या स्पर्शानें भ्रष्ट झालेल्या देहाचा त्याग करून, जीवनाचा शेवट करणाऱ्या पतिव्रता, अनेक होऊन गेलेल्या आहेत; उलट शरीर विकून मिळालेल्या द्रव्याच्या साहाय्यानें आनंदांत राहणाऱ्याहि अनेक स्त्रिया आपणांस आढळतात. आपल्या देशाच्या हित-संरक्षणार्थ, आनंदानें सर्वस्वाचा त्याग करणारे देशप्रेमीहि आपण पाहतों; व देशाच्या हितशत्रूंना मदत करून आपली पोळी पिकवून सुखांत, चैनींत राहणारे देशद्रोहीहि आपणांस आढळतात. विजयी शत्रूपुढें मान न वांकवितां मान देणारे मानधन वीरपुरुष आपल्याला आढळतात; उलट त्यांची थुंकी झेलून त्यांच्यापुढें गोंडा घोळून जीवित आनंदानें घालविण्यांत जन्मसाफल्य मानणारे अनेक नरोत्तमहि आपणांस दिसतात. सत्याकरितां जीव देणारे जितके दिसतील, तितकेच चुकूनहि सत्य न बोलणारेहि असतील. परस्पर विभिन्न गोष्टींत आनंद मानला जातो याचें कारण, त्या त्या व्यक्तीच्या मनाची ठेवण, हें होय.

ही मानसिक परिस्थितीहि बदलत असते, व ती बदलते त्याप्रमाणें आनंदप्राप्तीचे विषयहि बदलतात. मुंबईची हवा लागण्यापूर्वी आपल्या घरधनिणीच्या काळ्यासांवळ्या सौंदर्यावर बेहद्द खूष होऊन, तिच्या प्रेमळ सहवासांत स्वर्गसुख मानणारा साधाभोळा शेतकरी, मुंबईचा मजूर बनल्यावर व तेथील भडक रंगाला पाहून चमकल्यावर, त्या घरधनिणीच्या सौंदर्याला कचरामोल मानतो. व्यायामाचा तिरस्कार करणारा व चूकूनहि व्यायामशाळेकडे ढुंकूनहि न पाहणारा गृहस्थ परिस्थितीनें बदलतो व व्यायामाचा पुरस्कार करूं लागतो. वेषभूषा करण्यांत प्रहरचे प्रहर घालविणारी युवती अत्यंत साधेपणानें राहूं लागते व फॅशनचा तिरस्कार करूं लागते. केसांचा भांग थोडासाहि विस्कटणार नाहीं म्हणून काळजी घेणारा व तेवढ्याकरितां खिशांत फणीआरसा बाळगून वारंवार त्यांत पाहणारा मनुष्य, डोक्यावरचें केसांचें रान सफा उडवून त्याचा गोटा बनविणारा होणार नाहीं असें कोणालाहि खात्रीनें सांगतां येणार नाहीं.

अत्यंत दुर्व्यसनी माणसें, कीं ज्यांनीं आपली उभी हयात अमानुष कृत्यें करण्यांत घालविली, तीं इतकीं सुजन बनतात कीं, कुणीहि त्यांच्या चरणवंदनार्थ इच्छा करावी! दुराचारांत लोळत पडणाऱ्या स्त्रियाहि आपल्या गतायुष्याचा तिटकारा करून, पश्चात्तापांत तळमळतांना दिसतात. सारांश, मनाची परिस्थिति प्रसंगानुसार व परिस्थित्यनुरूप बदलत जाते व बदलत्या परिस्थितीप्रमाणें आनंद देणारीं साधनेंहि बदलत असतात.

कलाचित्रासंबंधीं विचार करितांना हीच गोष्ट प्रामुख्यानें नजरेस येते. मनाच्या ठेवणीवर व परिस्थितीवर कलाविषयापासून आनंद होणें, न होणें अगर कमीजास्त होणें अवलंबून असतें. एकाद्या कलाविषयापासून सर्व रसिकांना केव्हांहि सारखाच आनंद प्राप्त होणें शक्य नाहीं. व्यक्ति तितक्या प्रकृति असें म्हणून आपण या मुद्याकडे दुर्लक्ष करितों; पण खरोखर असें कां व्हावें हा विचार आपण करीत नाहीं. ज्या व्यक्तीची जशी मनस्थिति असते तसा तिच्यावर कलाविषयाचा परिणाम होतो. ओलेतीचें चित्र पाहतांच एकाला तें बीभत्स, त्याज्य वाटलें, तर दुसऱ्याला त्यांत कला अवतरलेली दिसली. सदाफुली हें पुस्तक एका विद्वान् लेखकाला घाणेरडें, तिरस्कारार्ह वाटलें तर माधव ज्यूलियनसारख्या कलावंत पंडिताला ती एक नितांतसुन्दर कलाकृति वाटली. गडकऱ्यांची कालिंदी एका रसिकाला अवास्तव म्हणून संतोषप्रद होत नाहीं, तर दुसऱ्या मार्मिक रसज्ञाला तें एक सुन्दर कलाचित्र वाटतें. निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळ्या कला आवडतात. कोणा रसिकाचें अंत:करण संगीताच्या लहरींवर नाचावयास लागतें, तर एकाद्या कलावंताचें हृदय चित्रकाराच्या रंगछटांत गुंतून राहतें. शिल्पकला कोणाला आकर्षक वाटते, तर काव्यावर कांहीं रसिक खूष असतात. सृष्टिसौंदर्यांत एकाद्याचें मन दंग होतें, तर आकाशांतील नक्षत्रांचा पसारा पहाण्यांत कोणी देहभान विसरतो.

निरनिराळ्या कलांविषयींच्या आवडींतहि विभिन्नता आढळते, इतकेंच नव्हे तर, एकाच कलेच्या निरनिराळ्या अंगांपैकीं कांहीं विशिष्ट अंगेंच

एकाद्याला रुचतात. दुसऱ्याला दुसरींच आवडतात. एकाद्याला जीं रुचतात तींच दुसऱ्यालाहि रुचतील असें नाहीं. पण दोन्हीहि व्यक्ति मर्मज्ञ कलावंत व रसिक मानल्या जातात. कोणाला बालगंधर्वांचें गाणें आवडेल, तर कोणी मास्तर कृष्णाच्या गाण्यावर मोहित असेल. एकादा गोहरच्या रेकॉर्डशिवाय रेकॉर्ड घेणार नाहीं, तर दुसरा व्यासाच्या दणकेबाज तानेवर संतुष्ट असेल. सुंदराबाईच्या आवाजीवरून जीव ओवाळावयास उत्सुक असलेला रसिक, अबदुलकरीमखांच्या गाण्याच्या वेळीं कदाचित जांभया देईल. हीच गोष्ट इतर कलांसंबंधींहि आहे. कोणाला तैलचित्रें आवडतील, तर कोणाला जलरंग रुचतील. निसर्गाचीं दृश्यें रेखाटणें एकाद्याला आवडेल तर लाईफ स्केचेस काढण्यांत दुसऱ्याचा हातखंडा असेल.

ही **अभिरुची** कांहीं बाबतींत आंधळी असते. आईला आपल्या मुलांत सौंदर्य आढळतें. प्रत्येकाला आपल्या जन्मभूमीविषयीं प्रेम वाटत असतें. दुसऱ्या कोणत्याहि देशापेक्षां ती त्याला श्रेष्ठतर व रम्यतर वाटत असते. प्रत्येक देशांतील राष्ट्रीय कविता घेऊन तीं चाळल्यास तिच्यामध्यें पुष्कळदां आमचा देश सर्वांगसुन्दर आहे, इतर देशांपेक्षां तो श्रेष्ठ आहे, आमचे पूर्वज अत्यंत शूर होते, आमचा लोकनायक सर्व जगांत थोर होता, असलीं एकजिनशी अवास्तव वर्णनें आढळून येतील. प्रत्येकाला वाटतें आमची जुनी संस्कृति श्रेष्ठ. धर्माविषयीं हीच स्थिति. लहानपणीं मुलाला आपली खेडेगांवची शाळा सर्वांगसुन्दर वाटते तसलेंच हेंहि वाटणें. यामुळें ज्या राष्ट्रगीतानें एकाला संतोष वाटेल त्याच राष्ट्रगीतानें अन्यदेशीय रसिकाला आनंद होईलच, असें नाहीं. आपल्या कुरूप बाळाचें चुंबन घेतांना त्याच्या मातेला आनंद होईल, पण इतरांना त्या मुलाकडे पाहणेंहि आवडणार नाहीं.

ही अभिरुचि निरनिराळ्या काळीं बदलत जाते. एका वेळेस पोप-सारखा लोकप्रिय कवि इंग्लंडमध्यें नव्हता. गडकऱ्यांनीं मराठी रसिकाला वेडें केलें होतें. हरीभाऊ व स्कॉट यांची लोकप्रियता एका वेळेस कळसास

पोहोंचली होती. एका काळीं ज्या कलाचित्रांनीं लोकांना मोहिनी घातली होती, तींच कलाचित्रें कालांतरानें तितकीं आकर्षक वाटेनाशीं झालीं. कांहीं कलाचित्रें दीर्घकाल लोकमान्य राहतात. कालिदास, शेक्सपिअर यांच्या-सारख्यांचीं काव्यें, रामायण–महाभारत–इलियडसारखे ग्रंथ, रसिकांना नेहमीं संतोषप्रद होणार नाहींत असें म्हणणारा मूर्ख ठरेल; पण भवभूती-सारख्याला एका काळीं रसिक आढळत नव्हता व म्हणून भविष्यकाळांतील रसिकांकडे तो आशाळभूतपणें पहात होता याचा अर्थ काय ? रसिकता बदलते कीं काव्य बदलतें ? अभिजात काव्य सर्व काळीं रसिकांना तोषवील, पण एकंदर काव्यग्रंथांत असे उतारे मधूनमधूनच सांपडतील. बाकीचें काव्य विशिष्ट तऱ्हेचें वातावरण निर्माण करीत असतें व तेंच पुष्कळदां रसिकाला विशिष्ट परिस्थितींत आकर्षक वाटत असतें. सर्व काळीं व सर्व परिस्थितींत जें लोकप्रिय राहील, त्या काव्याची योग्यता ठरविण्याचें कारणच नाहीं. पण अशीं काव्यें फारच थोडीं आढळतील व तीं थोडींच राहतील. परिस्थिति बदलली, लोकाचार बदलले, मनस्थितींत फरक पडला तरी तीं रुचतील. तरीहि मनुष्याच्या विशिष्ट मनस्थितींत व परिस्थितींत त्यांच्यापासून होणारा आनंद कमजास्त राहील. शिवाय त्यांपैकीं कांहींच्या-कडे विशिष्ट दृष्टिकोनांतून पाहण्याची पद्धत पडलेली असल्यामुळें त्यांना विशेष कसोटीहि लाविली जात नाहीं.

यामुळें कला व जीवन यांमध्यें अधिक श्रेष्ठ कोण, हें ठरविणेंच शक्य नाहीं. कलेपासून होणारा आनंद, परिस्थिति व रसिकांची मनःस्थिति यांवर अवलंबून असतो व जीवनाची सार्थकता अगर महत्त्व त्यांत लाभ-णाऱ्या आनंदावर व सुखावर ठरवावयाचें असतें. आनंदोपभोग हा जीवनाचा हेतु. प्रत्येक व्यक्ति कोणत्याहि कलाविषयापासून तिला किती आनंद होतो हें पाहून, त्याचें मोल ठरवीत असते. आनंदहीन गुलामाच्या जीवनाला आम्ही अत्यंत क्षुद्र लेखतों. पण एकादा 'गुलाम' [illegible] जीवनाला सरावून त्यांतच आनंद मानतो.

कला ही आनंददायक तर खरीच पण तो आनंद पुष्कळदां सापेक्ष असतो. त्याचप्रमाणें जीवनाबद्दलहि म्हणतां येईल. कलावंत पुष्कळदां कलेचें बाजवीपेक्षां जास्त स्तोम माजवितात. कारण, सर्वसाधारण जनते-पेक्षां ते जास्त बोलके असतात अगर आपल्या कलाचित्रांनीं ते जनतेला थोडा वेळ कां होईना मुग्ध बनवितात. निष्प्रेम कलाहीन चिरंजीवन दग-डाला मिळतें असें सांगून ते तसल्या जीवनाचा धिःकार करतात. मृत्यु यावा तोहि आपलें कलावंताचें वैशिष्ट्य व्यक्त करणारा यावा असें त्यांना वाटतें. उलट कलाहीन, आनंद नसलेलें जीवन कंठणारीं माणसेंहि पुष्कळच आढळतात. पिंजऱ्यांतील पोपट अगर सिंह आत्महत्या करीत नाहींत. कलेचें जें ध्येय तेंच जीवनांतील साध्य. यामुळेंच त्यांची तुलना करण्याची इच्छा होऊन, त्यामध्यें श्रेष्ठ—नीच ठरविण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. परंतु वस्तुतः त्या दोघांची किंमत ठरविणारी घटना परिस्थितीकडून बनत असते. कितीहि चपल अश्व असला तरी त्याला त्याच्या मर्जीनुरूप धावणें शक्य होत नाहीं; त्याचा लगाम ज्याच्या हातांत असतो त्याच्या इच्छे-प्रमाणें त्याला धांवावें लागतें. पंख कापलेल्या पोपटाला स्वैर भरारी मारतां येत नाहीं.

मनःस्थितीप्रमाणें कलाचित्रापासून आनंद होतो. ही मनःस्थिति परि-स्थित्यनुरूप बदलते. खरोखर परिस्थिति जीवनांत आनंद उत्पन्न करितें व तीच कलाचित्रांतील अव्यक्त आनंद प्रत्ययास आणून देते.

सारांश, कला व जीवन यांची किंमत प्रत्येक व्यक्ति स्वतःच्या मनः-स्थितीवरून व भोंवतालच्या परिस्थितीवरून ठरवीत असते. ही मनःस्थिति व परिस्थिति बदलत असते व ती बदलतांच व्यक्तीची कला व जीवन यांकडे पहाण्याची दृष्टीहि बदलते. देशकालपरिस्थितीप्रमाणें ही अभिरुचि व दृष्टिकोन बदलतो; व म्हणूनच एका काळीं सर्वमान्य असणाऱ्या कला-चित्रांची पकड कालांतरानें कमी होते. यामुळेंच कलेची सर्वमान्य व्याख्या ठरलेली नाहीं व ती ठरवितांहि येणें शक्य नाहीं. अशी व्याख्या न

ठरल्यामुळें कला व जीवन यांमध्यें उत्पन्न झालेला वाद मिटणें शक्य नाहीं. दोन विवादकांचेंसुद्धां एकमत होणें कठीण आहे; मग सर्वमान्य मत ठरणें दूरच. प्रत्येक व्यक्ति त्यांचें मोल तिला त्यांपासून होणाऱ्या आनंदावरून ठरविते. एक अमूल्य व सुन्दर चित्र आगींतून काढावें तर एका मुलाचा प्राण जातो व मुलाचा प्राण वांचवावा तर त्या चित्राचा नाश होतो, तेव्हां काय करावें ? असा एक प्रश्न प्रो. वामन मल्हार जोशी यांनीं त्यांच्या एका पुस्तकांत वाचकांपुढें ठेविला आहे. दुसऱ्याच्या प्राणांची ढेकणाशीं तुलना करणारी व्यक्ति मुलाच्या प्राणाला तुच्छ मानून चित्राचा बचाव पहिल्यानें करील. दुसरा चित्राची पर्वा न करितां मुलाला वांचवील. मनःप्रवृत्तीप्रमाणें माणसांकडून कृति होईल. थोरांनीं चांगलें म्हटलेल्यांना चांगलें म्हणण्याची रीत आहे. त्याप्रमाणें कलाचित्रांच्या व जीवनाच्या बाबतींतहि होते. पण मनुष्य थोरांचें अनुकरण करून त्यांवर अभिप्राय देत असला, तरी ते अभिप्राय त्याच्या अंतःकरणांतील नसतात. त्याच्या हृदयांत, प्रत्येक कलाचित्राचें मोल तो स्वतंत्रपणें, त्याला त्यापासून होणाऱ्या आनंदावरून ठरवीत असतो. त्याप्रमाणेंच जीवनाचें मोलहि प्रत्येक व्यक्तीच्या हिशेबानें कमीजास्त असतें व म्हणून ह्या दोहोंविषयीं सामान्य नियम ठरविणें अशक्य आहे.

# कलेचें अधिष्ठान



कलाकृतीकडे पहावयाचा प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन भिन्न भिन्न असतो. कलाकृतीपासून निरनिराळी अपेक्षा केली जाते. तींत योग्य कोणती व अयोग्य कोणती हें ठरविण्याकरितां कलाकृतीच्या मूळ स्वरूपाचा विचार करावयास पाहिजे.

कलाकृतींत वास्तवता व सत्य असावयास पाहिजे. नंतर तिच्यावर सौंदर्याचा साज चढविण्यास हरकत नाहीं असें मानणारे पुष्कळ विद्वान् आढळतात. उलट कलाकृतींतील सौंदर्याला प्राधान्य देऊन तिच्यांतील वास्तवतेकडे दुर्लक्ष करणारे रसिकहि अनेक दिसून येतात. कलाकृतींत सत्य, वास्तवता यांचें स्थान अधिक महत्त्वाचें कीं, सौंदर्याचें स्थान अधिक महत्त्वाचें, हा प्रश्नहि अत्यंत वादग्रस्त समजला जातो.

सत्य अगर वास्तवता यांचा पुरस्कार करणारे या दोन शब्दांचा अर्थ पुष्कळदा सारखाच समजतात. एकादी गोष्ट जशी असेल तशीच दाखविणें म्हणजे वास्तवता. पर्यायानें तेंच सत्य. कित्येक लोक त्यापुढें जातात. स्वतःच्या परंपरागत रूढ समजुतींनाच ते सत्य मानतात व स्वतःच्या मनाला न पटणाऱ्या गोष्टींना असत्य समजतात.

कलाकृतींत सत्य नसेल, तिच्यांत वास्तवतेचा अभाव असेल अगर तींत वस्तुस्थितीचा विपर्यास होत असेल तर तिच्यांतील सौंदर्याकडे हे विचारवंत उपेक्षेनें पाहतात. शरीर अत्यंत सुंदर आहे. अमूल्य वस्त्राभरणांनीं तें भूषविलेलें आहे, पण त्यांत प्राण नाहीं. काय महत्त्व त्याचें ! सौंदर्यामध्यें सदभिरुचीला पोषक असें सत्य नसेल तर तें सौंदर्य त्यांना तितकेंसें आल्हाददायक वाटत नाहीं.

पितळ सोन्याप्रमाणें दिसतें. पितळेच्या दागिन्यावर एकाद्या कुशल कारागिरानें आपलें सर्व कौशल्य खर्च केलें, तरी त्या दागिन्याची सोन्याच्या

दागिन्याबरोबर तुलना करतां येत नाहीं. फोनो, रेडिओ यांतील सूर कितीहि आकर्षक असले तरी प्रत्यक्ष गवयाच्या गळ्यांतील स्वरांची माधुरी त्यांत असणें शक्य नाहीं. फोटो जवळ असल्यामुळें सहवासाच्या सुखाचें समाधान मानलें तरी प्रत्यक्ष व्यक्तीच्या सहवासांतील सुख-समाधान निराळेंच असतें.

सौंदर्याला महत्त्व देणारे लोक अलंकार सोन्यांमोत्यांचे बनवितात हें खरें असलें तरी सोन्याच्या लगडी गळ्यांत बांधणारा 'लक्ष्मीधर' आढळणें अशक्य आहे. सत्यावर सौंदर्याची ज्या प्रमाणांत कलाचातुरी व्यक्त केली जाईल, त्या प्रमाणांत त्याचें मोल ठरेल. सत्य कितीहि आवश्यक असलें तरी कलेचें जीवन सौंदर्यावर अवलंबून आहे, सत्यावर नाहीं. आत्म्याची योग्यता शरीरापेक्षां कितीहि जास्त असली तरी मनुष्य शरीराचेंच महत्त्व मानतो. शरीरावांचून आत्मा काय उपयोगाचा ? आत्मा ज्या शरीरांत असतो त्या शरीरावरच त्या आत्म्याची योग्यता ठरविली जाते. सत्य अगदींच नको असे हे लोक म्हणत नाहींत; पण सत्यावर सौंदर्याचा इतका बेमालूम साज चढविला पाहिजे कीं, त्या सत्याकडे धान्यांतील खडा निवडून काढण्याकरित जसा प्रयत्न करावा लागतो, तसा प्रयत्न केल्यावर, लक्ष वेधावें.

निरनिराळ्या प्रकारच्या कलाकृति विचाराकरितां घेऊन या दोन मतांबद्दल विचार करूं या.

चित्रकला, नृत्यकला, गायनकला, काव्यकला ( वाङ्मय ) वगैरे अनेक कला कलेच्या साम्राज्यांत महत्त्वाच्या मानल्या जातात. पण त्यांत वाङ्मयकलेइतकें चिरकालीनत्व दुसऱ्या कलांना नाहीं. नवीन नवीन शोधांमुळें इतर कलांनाहि हल्लीं दीर्घजीवन लाभलें आहे, पण तें वाङ्मयाच्या मानानें अल्पकालिन आहे. व्यासवाल्मीकीची भव्य व दिव्य प्रतिभा आपणांस आजहि पहावयास मिळते; पण तानसेनाचें स्वर्गीय गायन, मेनका–रंभादिकांचें नृत्य अगर चित्ररेखेची चित्रकला हीं केवळ नामशेष मात्र झालीं

आहेत. म्हणून वरील मतांचा विचार करितांना वाङ्मयकलेला प्राधान्य दिलें पाहिजे.

नाटक, कादंबऱ्या यांमध्यें वास्तवता, स्वभावदिग्दर्शन यांनाच प्रमुखत्व मिळालेलें आपण पाहतों. नाटक हें संसाराचें दृश्य काव्य मानलें जातें. जे प्रसंग आपण संसारांत पाहतों, ऐकतों अगर अनुभवितों त्या प्रसंगांचें हुबेहूब रेखाटन नाटकांत व्हावयास पाहिजे अशी अपेक्षा असते. ज्या प्रकारचीं माणसें आपणांस व्यवहारांत आढळतात, त्याच प्रकारचीं माणसें नाटकांतहि असावयास पाहिजेत. व्यवहारांत आपल्याभोंवतीं वावरणाऱ्या माणसांच्या अंगीं ज्याप्रमाणें गुणदोष दिसून येतात, त्याप्रमाणेंच नाटकांतील व्यक्तींच्या ठिकाणींहि असले पाहिजेत. जसे प्रसंग नेहमीं डोळ्यांसमोर घडून येतात तसेच प्रसंग नाटकांत रंगविले पाहिजेत. कळ फिरवितांच आकाशांतून भ्रमण करणाऱ्या घोड्याच्या साहाय्यानें फिरणें अगर जादूच्या वस्त्रावर उभें राहून स्वैरसंचार करणें, एखाद्या थोर पुरुषानें दिलेलें वस्त्र पांघरून अदृश्य होणें, एकाकी वीरानें शेकडों योध्यांना तरवारीच्या साहाय्यानें नामोहरम करणें, दुसरीकडे होणाऱ्या गोष्टी अलौकिक शक्तीनें जाणणें, वाटेल तें रूप सहज घेतां येणें व त्याच्या जोरावर आपल्या प्रतिपक्षीयाला चकविणें, यक्षिणीची कांडी फिरतांच महालाचें सरोवर होणें, असले चमत्कारिक कल्पनामय व सत्यसृष्टींत न आढळणारे प्रसंग रेखाटले, तर ते कोणाहि व्युत्पन्न माणसाला संतोषप्रद होत नाहींत. अतिमानवता बुद्धिप्रधान माणसाला तृप्ति देऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें व्यवहारांत न आढळणाऱ्या कृत्रिम गोष्टींनींहि त्याचें समाधान होत नाहीं.

वरील विचारसरणी सकृद्दर्शनी बरोबर वाटते. पण तिच्याबद्दल जरा बारकाईनें विचार करावयास पाहिजे.

नाटक संसाराचें चित्र आहे हें खरें आहे; पण नाटक तीन चार तासांत संपवावयाचें असतें. नाटकांतील घटना येवढ्या वेळांत पूर्ण झालेली क्वचि-

तच आढळते. तीन तासांत होणाऱ्या नाटकांत, तीन वर्षांतीलच नव्हे पण तीस वर्षांतील घडामोडीसुद्धां रंगविलेल्या आढळतात.

रंगभूमीवर सगळ्याच गोष्टी कृत्रिम असतात. त्यांतील अरण्याचे अगर राजवाड्याचे देखावे खोटे; त्या वाड्यांत फिरणारे राजेप्रधान खोटे. त्यांचीं भाषणें पाठ केलेलीं व कित्येकदां संगीतांतून चालणारीं. तालांत, ठेक्यांत पढविलेले पोपट नाचत असतात. आजच्या रंगभूमीवर कोणती गोष्ट वास्तवतेला धरून आहे ? आजपर्यंत तोंडाला रंग न लावतां कोणता नट रंगभूमीवर आला आहे ? कोणत्या गोष्टींत स्वाभाविकता आहे ! कोणत्या गोष्टींत संसाराचें चित्र आहे ?

स्वभावपरिपोषासंबंधीं विचार करावयाचा तर सज्जन-दुर्जन याशिवाय नाटक, कादंबरी सहसा आढळत नाहीं. नायक म्हटला कीं, सद्‌गुणांचा, पराक्रमाचा पुतळा. दुर्जन म्हटला कीं, सर्व दुर्गुणांचा अर्क. कोमल भावना त्याच्या ठिकाणीं आढळणें अशक्य. नायिका म्हटली कीं, सुरूप–सुंदरी, सद्‌गुणमंजरी वगैरे विशेषणें अपुरीं पडूं लागतात. कुरूप काळी स्त्री असली म्हणजे तिच्या काळ्या रंगाच्या भांडवलावर हबसाणांची पिढी रंगविली जाण्यास हरकत नसते, अगर श्वेत समुद्राचा काळा समुद्र करून भूगोलपंडितांची दिशाभूल करितां येते. शत्रु म्हटला कीं, दुर्गुणी, नेभळा असावयाचाच. तोंडावर केस असावयाचे ते इतके कीं, त्या केसांच्या अरण्यांत कोकिळेचीं घरटीं व्हावींत. नायकाच्या पराक्रमाबद्दल बोलावयासच नको. त्याला अपयश ठाऊकच नसतें. चंद्राला क्षणभर ग्रहण लागलें तरी तें अल्पकालानें नष्ट होतें व तो उज्ज्वलतेनें प्रकाशूं लागतो; त्याप्रमाणेंच नायकाचेंहि दिसून येतें. वेषांतर इतकें बेमालूम केलेलें असतें कीं, त्याचें त्याला ओळखूं येत नाहीं. दोघांच्या चेहऱ्यांत साम्य असावयाचें तें इतकें कीं, त्यांच्या बायकांनाहि स्वतःच्या नवऱ्यांची ओळख पटूं नये. असल्या वर्णनांत किती वास्तवता आहे !

काव्यें, चित्रें यांतहि हेंच आढळतें. स्वातंत्र्याचीं गीतें गाणारे पक्षी पारतंत्र्यांत खितपत पडणाऱ्या माणसाची कींव करितात, त्याला उपदेश करितात. परमेश्वराच्या सृष्टींत मनुष्याला न कळणाऱ्या शब्दांत बोलणारे प्राणी काव्यसृष्टींत माणसाला ज्ञान शिकवूं लागतात. फत्तर व फुलें शेजारीं आलीं कीं माणसांप्रमाणें भांडतात. एकमेकांचें उणें काढतात. सूर्य-चंद्र न बोलून कसें करतील ?

चित्रकलेंतहि असेंच आढळतें. जो देखावा दाखवावयाचा त्याला अनुरूप पार्श्वभूमि पाहिजेच. त्याशिवाय चित्राला मोल येत नाहीं. नांगर हाकणाऱ्या एकाद्या शेतकऱ्याचें चित्र पहा. अवयव ठसठशीत व प्रमाणबद्ध असलेले दिसतील. झोपडीच्या समोर खिन्नपणानें भांडीं घाशीत बसलेली दारूबाज घरधन्याची कारभारीण रूपसुंदर तिलोत्तमा असते. रानांत गुरें चारणारा गुराखी हातांत बांसरी घेऊनच उभा असलेला आढळतो. चित्रांचें वर्गीकरण केल्यास रंभा, उर्वशी, तिलोत्तमा यांच्यासारखीं चित्रें एका बाजूला आढळतील, तर हिडिंबा, कुब्जा, शूर्पणखा यांचीं चित्रें दुसऱ्या बाजूला दिसतील. मधलें वास्तवतेचें सदर बहुतेक मोकळेंच दिसून येईल.

आजपर्यंत जीं कलाचित्रें रेखाटलीं गेलीं आहेत, त्या बहुतेकांमध्यें थोड्याफार प्रमाणांत अवास्तवता दिसून येते. त्यांना मूलभूत असें सत्य असलें तरी तें रेखाटतांना अतिशय भडकपणानें रेखाटलेलें आढळून येतें. मूळ सत्य उठावदार होण्याकरितां त्याच्याभोंवतीं कृत्रिमतेचें रम्य, आकर्षक जाळें निर्माण केलेलें असतें.

हें कृत्रिमतेचें जाळेंच मनाला मोहित करतें. तें नसेल तर मूळ सत्याकडे कोणी ढुंकूनहि पहाणार नाहीं. सत्यापेक्षां कृत्रिमतेनें सत्याचा आभास उत्पन्न केला असल्यास आम्ही खूष होतों. दारूबाजाच्या बायकोचे हाल होतात हें आम्हांस मान्य आहे. पण असें चित्र रेखाटतांना ती सुंदर दाखवून त्या हालांत तिच्या सौंदर्यानें भर पडते, हें दाखविलें तर आम्हांला तें अधिक पटतें. गिरणीचा मालक अगर मॅनेजर केवळ मजुरांच्या मजुरीकडे

दुर्लक्ष करणारा असून चालत नाहीं; तर तो गिरणींतील यच्चावत् सुंदर मजूर स्त्रियांवर पापी नजर ठेवणारा असला पाहिजे, तेव्हांच तो आम्हांला खलनायक होण्यास योग्य वाटतो.

पावसांतून भिजत जाणाऱ्या कितीतरी स्त्रिया आम्ही प्रत्यहीं पहात असतों. पण कृत्रिम पावसांतून भिजत जाणाऱ्या वसंतसेनेला पाहण्यांतील आनंद कांहीं निराळाच असतो. रुक्मी व शिशुपाल कृष्णाशीं तुल्यबळ असले तरी दुर्बळ बकऱ्यांप्रमाणें त्यांना काखोटीला मारून रंगभूमीवर प्रवेश करणारा कृष्ण आम्हांला पुन्हांपुन्हां पहावासा वाटतो. राजकन्या रुक्मिणी राजवाडा सोडून गवळ्यांच्या वाड्यांत कृष्णाच्या तपासाकरितां फिरत आहे, ती मातीच्या घागरीनें पाणी आणीत असून कृष्णानें खडा मारूं नये म्हणून त्याची विनवणी करीत आहे, असें दृश्य पाहिलें म्हणजे आम्ही बेभान होतों. आकाशांत भिरभिरणाऱ्या घारीला मनगटावर खिळवून ठेवण्याचा दुष्कर्मयोग करणारा वृंदावन एका क्षणांत वसुंधरेपुढें नम्र होऊन तिला माता म्हणावयास तयार होतांच आमच्या अंतःकरणांत आनंदाच्या लहरी उसळूं लागतात. नदींत उडी टाकणार तोंच अकस्मात् येऊन शारदेला वांचविणारा कोदंड आमच्या अधीर मनाचें समाधान करितो. ताईच्या डोळ्याचें ऑपरेशन करणारे डॉक्टर सर्व हिंदुस्तानांत एकटेच असतात व ते विन्याचे श्रीधरपंतच असत. काब्राजीच्या तडाक्यांत सांपडलेल्या मधुरेची सुटका अविनाश मुंबईतच सहज रीतीनें घडवून आणतो. गलबत समुद्रांत टाकण्यास नांवाजलेल्या नाखव्याच्या नजरेचा भोंवरा गरगरावयास लागत असला तरी त्या तुफान समुद्रांत उडी घेऊन तुळशीला जिवंत बाहेर काढणारा व त्याच वेळीं मृत्यूच्या मांडीवर असतांना तिच्याशीं प्रणयाराधन करणारा संभाजी आम्हांला मुग्ध करितो. आत्महत्या करावयास सज्ज झालेल्या नायक-नायिकेच्या गळ्याला गळफांस लागणार तोंच त्यांची मुक्तता घडविणारा प्रसंग पाहण्यास आम्ही उत्सुक असतों. फांसावर चढविलेल्या जयंताच्या गळ्या-

भोंवतींचा फांस ओढला जाणार, तोंच त्याला फांसावरून उतरविलेलें पाहून आम्हांला हर्ष होतो.

स्वगत भाषणें आम्हांला अतिशय प्रिय वाटतात. 'नाहीं मी बोलत नाथा' हें पद घोळून म्हणतांना मध्येंच एकदम मान वेळून रागानें तिरपें पहाण्याचा अभिनय करणारी भामिनी एक पुरुष आहे हें आम्ही विसरतों. रक्तानें न्हालेल्या आसन्नमरण सिंधूकरितां व तिच्या मुलाकरितां आम्ही रडतों.

सत्य परिस्थितीची व वस्तुस्थितीची आम्हांला कल्पना नसते, हा याचा अर्थ समजावयाचा काय ?

उषासमयींचा अगर संध्याकालाचा देखावा परमेश्वराच्या सृष्टिचित्रांत रोज पहावयास मिळतो. पण अर्धवट सूर्य मावळत आहे, त्याच्या किरणांनीं आकाशांतील काळ्या भुरक्या मेघांना चित्रविचित्र रंगछटांची रुपेरी-सोनेरी दौलत लाभली आहे, खालीं एकादा चिमणासा झरा झुळझुळ वाहात आहे, आजूबाजूंच्या वृक्षलतांची शोभा फलपुष्पांनीं द्विगुणित झाली आहे, सोनेरी सूर्यकिरण झऱ्याच्या पाण्याशीं गुजगोष्टी करीत आहेत; असें रम्य चित्र जर एकाद्या कुशल कलावंतानें काढलें तर आम्ही त्या चित्रानें मोहित होतों. परमेश्वराच्या सृष्टींतील देखाव्याकडे ढुंकूनहि न पाहणारा मनुष्य त्या चित्राजवळ आल्यावर क्षणभर तरी थांबल्याशिवाय राहात नाहीं. किती आंधळे–लुळे भिकारी आम्हीं पाहिले असतील, किती शिल्पकार आमच्या भोंवतीं दगड फोडीत असतील, कितीतरी दहीं विकणाऱ्या गवळणी रस्तोरस्तीं फिरत असतील. त्यांच्या अस्तित्वाची आम्हांला क्वचितच जाणीव असते. पण एकाद्या कुशल कारागिराच्या कुंचल्यांतून त्यांचीं चित्रें निर्माण होऊं द्या. गवळणीचें दूध घेऊनहि तिच्या हातांत बरोबर पैसे न टाकणारा रसिक पेन्शनर म्हातारा तिच्या चित्राकरितां रुपये ओततो. रस्त्यांतून स्वतःच्या उमेदीच्या नादांत इतरांना तुच्छ लेखीत चालणारा तरुण, बाजूच्या दगडफोड्याकडे दृष्टिक्षेप टाकीत नसला तरी

त्याचें चित्र पाहतांच, त्याच्या मुखावरील एकतानता व कार्यमग्नता पाहून एकादें भावगीत गुणगुणूं लागतो. आंधळ्या-लुळ्या भिकाऱ्याला दाराशींहि उभें न राहूं देणारा सिव्हिल सर्व्हंट त्याच्या चित्रानें आपल्या दिवाण-खान्याला शोभा आणतो.

कादंबऱ्या, काव्यें वगैरेंच्या बाबतींतहि हीच स्थिति आढळते. प्रतिभेचें साधन कसें करावें हें सांगणारे लेखकहि वास्तवतेवर मारवाडी पद्धतीचा रंग चढवून आपले ग्रंथ लिहितात. जादुगार कादंबरी वाचल्यापासून धनुष्याकृति भुवयांची स्त्री शोधून पाहण्याचा प्रयत्न माझा एक मित्र करीत आहे. अजून त्याला यश आलें नाहीं. यंत्राशीं कटकट करणारा मनुष्य बोजड चेहऱ्याचा असेल अशी कल्पना केली, तर सत्य-सृष्टींत ती सहसा चुकीची होणार नाहीं. पण फडक्यांचा अविनाश सर्व-गुण-कला-संपन्न आहे. वर्गांत पहिला येणारा शशिकांत कोणत्याहि खेळांत अग्रगण्य असतो, इतकेंच नाहीं तर चित्रकलेसारख्या विषयांतहि तो अनन्यसाधारण प्रावीण्य मिळविण्यास समर्थ असतो. आमच्या सत्य-सृष्टींतील स्कॉलर पुष्कळदां पुस्तकांतील किडे असतात. त्यांना खेळाचें वावडें असतें. कलांशीं बहुधा त्यांचें वाकडें असतें. कॉलेजमध्यें फेलो होणारे किती बुद्धिमान् विद्यार्थी क्रिकेट, हॉकी संघाचे कर्णधार झाले आहेत हें प्रत्येक कॉलेजचें रेकॉर्ड तपासल्यावर सहज कळेल. असें असूनहि रा. फडक्यांच्या कादंबऱ्यांनीं तरुण महाराष्ट्रीय वाचकांस वेड लाविलें आहे. त्यांचे सर्व नायक व नायिका त्यांच्यावर अशी मोहिनी टाकतात कीं, तशीं पात्रें सभोंवतीं आढळतील कीं नाहीं हा विचारहि त्यांच्या मनांत येत नाहीं. असें कां व्हावें ?

काव्यविषयासंबंधीं विचार केल्यास ही कृत्रिमता पराकोटीला पोहोंचलेली आढळून येईल. सत्यसृष्टि व काव्यसृष्टि यांमध्यें कल्पनाशक्तीनें जमीन-अस्मानाइतकें अंतर पाडलें आहे. शेतांतून गवताचा भारा आणणारी अगर रानावनांतून उन्हांत भटकणारी छोकरी रंगानें श्यामा असली तरी सौंद-

र्यांच्या बाबतींत कित्येक राजांच्या राण्यांना लाजविते. कोकिळेचा पंचम स्वर कानांवर येतांच बेभान होऊन त्या स्वरांतील माधुर्याचें वर्णन करणाऱ्या कवीं-पैकीं किती कवि कोकिळेच्या स्वरानें हर्षित झाले असतील ? विधवांवर गाणीं लिहितांना आमच्या कविवर्यांना सुंदर, कोमल, यौवनप्रांतांत नुकतेंच ज्यांचें पाऊल पडत आहे अशाच विधवा आढळतात. त्यांच्या दुःस्थितीचें वर्णन करीत असतांना यांचे अश्रू पाझरूं लागतात. यांना समाजांतील विषमतेची चीड येते. सामान्य रूप लाभलेल्या अगर सोळा वर्षे उलटून गेलेल्या विधवांच्या भावना मृत होतात, असा का याचा अर्थ समजावयाचा ? मुलांच्या भावनांकडे दुर्लक्ष करणारे पण मुलांविषयीं कविता लिहिणारे कितीतरी कवि आढळतील. फुलांची सृष्टि म्हणजे कवींचें विश्रामस्थान; पण सत्यसृष्टींतील फुलांना पायदळीं तुडवितांना किती तरी रसिक कवि दिसून येतील. लतेवर एकटेंच फूल दिसत असतां त्याच्या वर्णनांत रंग-णाऱ्या कवीला विचारलें, तर तो सांगेल बाजारांत मिळणाऱ्या दोन आण्यांच्या पुड्यांत 'पंचावन्न कमळें व एकशेंआठ गुलाब' असतात. ही सत्यस्थिति असूनहि वरील विषयांवरील कविता आम्हांला आनंद देतात. याचें कारण काय ?

काव्यसृष्टींत दुःखानें हृदय उलून जात आहे असें सांगत असतां, सत्यसृष्टींत तो कवि कित्येकदां लहरींत चहा पीत पीत वृत्तजुळणी करीत असेल. बायकोच्या मृत्यूमुळें जिवास कंटाळून आत्महत्या करण्यास उत्सुक झालेला कवि, कविता लिहीत असतांना आपल्या द्वितीय पत्नीच्या मुखा-कडे पहात आहे असें चित्र कल्पनेनें रेखाटल्यास तें कदाचित् खोटें ठरणार नाहीं. खोलींत बसून सृष्टिसौंदर्याचें वर्णन करणारे अगर सकाळीं अंगावर ऊन पडल्यानंतर उठून सूर्योदयप्रसंगाचें बहारीचें वर्णन रेखाट-णारे कवि नसतील असें नाहीं. पण हीं काव्यें वाचतांना त्या विचारांचा स्पर्शतरी आमच्या मनाला होतो काय ?

आजचीं प्रणयगीतें आणि सत्यसृष्टि यांचा मेळ घालतां येणें शक्य

आहे काय ? "कुबेराची सर्व संपत्ति पुढें ओतली, राजाची राज्यलक्ष्मी पायाशीं लोळण घेत आली, रूपगर्विता आपल्या सौंदर्याचें चरणावर उदक सोडावयास तयार झाली तरीहि स्थिरचित्त असणारा, बालकाच्या निर्व्याज हास्यानें जिंकला जातो," हें वाचतांच रवींद्रांच्या प्रतिभेची विशालता, भव्यता आमच्या डोळ्यांसमोर उभी राहते. पण हें सत्यसृष्टींत किती पटेल ? मेघाला दूत करून त्याच्याबरोबर निरोप पाठविणाऱ्या कालिदासाची प्रतिभा पाहून आम्ही थक्क होतों. मेघाला दूत समजून निरोप पाठविणें अशक्य कोटींतीलच नव्हे तर वेडगळपणाचें आहे हें आमच्या लक्षांतहि येत नाहीं. काव्यांत त्रिभुवनांतील संपत्तीवर लाथ मारणारे आपल्या संसाराचा मोडका गाडा दुरुस्त करण्याकरितां पै पै जमवितांना आढळतील. पण त्यांच्या काव्यसंसाराची आम्ही काळजी करितों; त्यांच्या स्वतःच्या संसाराबद्दल आम्हांला पर्वा नसते.

स्वर्गाचीं वर्णनें आमचे कवि स्वर्गवासी न होतां करतात. निरनिराळे प्राणी व पक्षी त्यांच्याशीं बोलतात व हे त्यांच्या भाषणांत तल्लीन होतात. कोकिळेच्याच नव्हे तर घुबडाच्या अगर कावळ्याच्या गाण्यांतहि ते गुंग होतात. ते क्षणांत आकाशपाताळ एक करतात. नारदाप्रमाणें त्रिभुवनसंचार करण्यास त्यांना मोकळीक असते. त्यांचीं काव्यें वाचतांना यांतील एकहि गोष्ट त्यांना शक्य नाहीं असें आम्हांला वाटत नाहीं. तसें वाटलेंच तरी आम्हांला त्या विचारानें विषाद वाटत नाहीं व आमचा काव्यानंद त्यामुळें ओसरत नाहीं. कवीनें केलेलें स्वर्गाचें वर्णन आम्ही गुंग होऊन वाचतों. त्याच्याबरोबर आम्ही पाताळांत जातों, आकाशांत फिरतों, इंद्रधनुष्यावर स्वार होतों. वास्तवतेशीं त्या वर्णनाचें साम्य असलें पाहिजे हें त्यावेळीं तरी चुकूनहि आमच्या लक्षांत येत नाहीं.

चंद्रवदनेच्या वदनाची चंद्राशीं तुलना करावयाची, केस भ्रमरपंक्तीप्रमाणें मानावयाचे, ओठ बिंबफलाप्रमाणें, नाक चाफेकळीप्रमाणें, कमर सिंहाप्रमाणें, चाल हत्तीप्रमाणें ! कशाचें साम्य कशाशीं आहे ?

स्वाभाविकता, सत्य अगर वास्तवता व हें वर्णन यांचा विचार केल्यास दारूबाजाचें बरळणें यापेक्षां सुसंबद्ध असतें हें कोणासहि नाकबूल करतां येणार नाहीं.

अप्सरेसारखी सुंदर, अमृताप्रमाणें मधुर, नंदवदनाप्रमाणें रमणीय यांत सत्य किती आहे ? कोणीं अप्सरा पाहिली आहे कीं, अमृताचा स्वाद घेतला आहे कीं, नंदनवनांत विहार केला आहे ? फत्तराचें हृदय, फुलाप्रमाणें मन, सशाचें काळीज यांत सत्यांश किती आहे ? मग हें अगर असलें वर्णन काय दर्शवितें ?

सत्यस्वरूपांत मांडल्यानें ज्या गोष्टी आम्हांस कळणार नाहींत, त्यांची अशा वर्णनानें आम्हांस कल्पना येते. निष्ठुर हृदय म्हटल्यानें ज्याची नीट कल्पना येणार नाहीं, त्याची कल्पना फत्तराचें हृदय म्हटल्यानें येईल. साखरेप्रमाणें अगर मधाप्रमाणें गोड म्हणून ज्याची गोडी नीट कळणार नाहीं, त्याच्या गोडीची अमृताप्रमाणें मधुर असें म्हटल्यानें कल्पना येईल. मर्त्य माणसानें न चाखलेल्या अमृताच्या उदाहरणानें ही गोष्ट सुलभतेनें व्यक्त केली जाते.

शिल्पकला तर कृत्रिमच असते. तींत वास्तवतेची निर्जीव नक्कल असते. नृत्यगायनादि कलांचा वास्तवतेशीं मेळ घालतां येणेंच कठिण आहे.

वास्तवतेच्या दृष्टीनें विचार केल्यास बहुतेक कलाचित्रें भ्रामक ठरतील, व कलाचित्राच्या निर्मितीमध्यें व तीं पहाण्यामध्यें माणसाला जो आनंद होत असतो तो नष्ट होईल. कलाकृतींतून कृत्रिमता काढून टाकली अगर सत्याच्या कठोर कसोटीवर ती आम्ही पारखून पाहूं लागलों तर आम्हांला त्यांच्यापासून जें मनोरंजन, समाधान होत आहे त्यास आम्ही पारखे होऊं. कलाचित्रें पाहत असतां सत्यस्थितीचा आम्हांस क्षणभर का होईना विसर पडतो.

व्यवहारांत जें नेहमीं आढळतें तें त्याच स्थितींत कलाचित्रांत पाहण्यांत काय मौज आहे ? कलाचित्रांमध्यें सभोंवार असलेल्या गोष्टींपेक्षां कांहींतरी

निराळें जर आढळणार नाहीं तर मग तीं पाहण्यास उत्सुकता कशी वाटणार ? स्वाभाविक, सत्य गोष्टीपेक्षां अशा चमत्कारिक रीतीनेंच त्या गोष्टी आम्हांस पहाव्याशा वाटतात. आरसा हातांत घेऊन त्यांत स्वतःचें मुख प्रत्यक्ष पाहून जें समाधान वाटत नाहीं, तें समाधान आमच्या फोटो-मध्यें आम्हांला आढळतें. म्हणूनच रंगभूमीवर तोंडाला रंग लावून आलेलींच पात्रें आम्हांला हवींत. साधारणत: संदर्भावरून बोलणाऱ्या रामलीलेंतील रामसीतेपेक्षां, आपलीं भाषणें पाठ करून म्हणणारीं पात्रें, आम्हांला अधिक संतोषप्रद वाटतात. गाढव, कुत्रीं ओरडतांना आम्ही नेहमीं ऐकत असतों, तरी एकाद्या माणसानें त्यांची हुबेहुब नक्कल केली तर आम्ही त्याचें कौतुक करितों. पुरुषनटानें स्त्रीवेषांत हळदीकुंकवाच्या समारंभांत जाऊन कोणालांहि कल्पना येऊं न देतां तो समारंभ साजरा केल्याचें ऐकून, त्या नटाच्या अभिनयावर आम्ही खूष होतों. दारू पिऊन तर्र् झालेल्या दारूबाजाला पाहण्यापेक्षां दारूबाजाची नक्कल करणारा नट पाहण्यांत आम्हांला खरा आनंद होतो. मुलाफुलांची सृष्टि भोंवतीं नाचत असतांहि त्यावरील कविता वाचण्यांत आम्ही तल्लीन होतों. उपमा-उत्प्रेक्षांचें साहश्य मूळ विषयाशीं थोडेंसेंच असलें तरी आमचा आनंद त्यामुळें कमी होत नाहीं. सर्वगुणसंपन्न नायकनायिका व्यवहारांत आढळत नसल्या, तरी वाङ्मयचित्रांत त्या असल्या तर आम्हांस मौज वाटते. रोजचीं दिसणारीं पात्रें जशीं दिसतात तशींच रेखाटलीं तर मग तीं आम्ही कलाचित्रांत पाहण्याचा खटाटोप कां करावयास पाहिजे ?

सर्व कलाकृतींचा कृत्रिमता हा पाया आहे. कृत्रिमतेच्या पायावर कलाचित्रांची उभारणी केलेली असते. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं कोठें-तरी ताजमहालाचें वर्णन वाचलें. तें वाचल्यावर ताजमहाल पाहण्याची त्यांना इतकी तीव्र उत्कंठा वाटली कीं त्यांनीं तावडतोब रजा घेतली व आग्र्याकडे जाणारी पहिली गाडी पकडली. ताजमहाल पाहिल्यावर त्यांनीं आपला अनुभव लिहून ठेविला आहे. "ताजमहालाचें वर्णन वाचून

मला जितका आनंद झाला तितका प्रत्यक्ष ताजमहाल पाहिल्यावर झाला नाहीं." ताजमहाल हें कलाचित्र असलें तरी त्याचें शब्दचित्र मूळ कलाचित्रापेक्षांहि सरस वठलें. कलाकृतीपासून होणारा आनंद ती निर्माण करणाऱ्याच्या कौशल्यावर अवलंबून असतो. मोडकांच्या 'सुख व शांति' या भाषांतरित पुस्तकांतील सर्पाचें शब्दचित्र वाचकांनीं एकदां वाचून पाहिल्यावर त्यांची खात्री होईल कीं, सर्पासारख्या भयंकर प्राण्याचेंहि शब्दचित्र अत्यंत रम्य होऊं शकतें.

म्हणूनच मला वाटतें कीं, कलाकृतीकडे पाहतांना सत्य, वास्तवता, स्वाभाविकता यांचा प्रथम विचार करणें गौण आहे. कलाकृतीपासून आनंद, मनोरंजन, समाधान हीं कितपत मिळतात हें प्रथम पाहिलें पाहिजे. नंतर सत्य, स्वाभाविकता यांचा विचार करावा. जर कलाकृतींचा पाया कृत्रिमतेवर उभारलेला आढळतो तर वास्तवतेला त्यामध्यें प्रधानपद देणें योग्य होणार नाहीं. तोंडाला रंग लाविल्यावर रंग लावणाराचें मूळ स्वरूप पाहण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद होईल. फार झालें तर त्याच्या चेहऱ्यावरील अवयवांची प्रमाणबद्धता त्या विचारानें कळेल. नाटकांतील राजा सत्यसृष्टींतील राजापेक्षां आमच्या अंतःकरणाला जरी अधिक पकड घालतो, तरी त्याच्यामध्यें खऱ्या राजाचा अल्पांशहि असत नाहीं. गुला-बाचीं फुलें दिडकीला दोन मिळतात, पण तेंच कापडाचें अगर भेंडीचें केलेलें असलें तर आपण त्याला दोन चार आणे द्यावयास तयार होतों. गोकाकचीं लाकडीं फळें खऱ्या फळांपेक्षां महाग मिळतात; त्यांत खऱ्या फळांचें माधुर्य नसतें तरी आम्ही पैसे देऊन तीं घेतों.

कलाकृतीमध्यें सत्याला किती महत्त्व द्यावें हें यावरून लक्षांत येईल. कलाचित्र मूळ सत्यावर आधारलेलें असेल, पण त्याच्यावर सौंदर्याचा बेमालूम साज चढविलेला पाहिजे. त्या सौंदर्याकडे पहात असतां सत्याचें विस्मरण व्हावयास पाहिजे. साखर व तीळ म्हणजे हलवा नव्हे.

कलेचें मंदिर कृत्रिमतेच्या पायावर उभारलेलें असतें. स्वाभाविकतेच्या

नांवाखालीं कलाकृतीवर कित्येकदां जी कठोर टीका करण्यांत येते ती पुष्कळदां अयोग्य असते. कित्येकदां नाटकांतील पात्रांचें स्वभाववर्णन करतांना कांहीं पात्रांच्या स्वभावांत कांहीं अस्वाभाविकता आढळल्यास एकंदर नाटकावर नालायकीचा शिक्का कांहीं चोखंदळ टीकाकारांकडून मारण्यांत येतो. पण तें पात्र थोडें अस्वाभाविक असूनहि त्यापासून जर आनंद होत असेल, तर असें मत देणें बरोबर होणार नाहीं.

कलेचें मंदिर कृत्रिमतेच्या पायावर उभें केलें असलें तरी ही कृत्रिमता कलाकृतींत कां आली व ती किती प्रमाणांत असावी हा प्रश्न आहे. अस्वाभाविक, अवास्तव प्रसंगांचें वर्णन करावयाचें, पण त्यांना कांहीं मर्यादा असावी कीं नाहीं ? कलेंत वास्तवता अगदींच नसली तर चालेल काय ?

या महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार पुढील लेखांत करावयाचा आहे.

# कलेंतील वास्तवता ३

कलेंत कृत्रिमता असणें अपरिहार्य आहे. तिच्यांत अवास्तवता येणारच. पण या गोष्टीला कांहीं प्रमाण असावयास पाहिजे काय? हें प्रमाण ठरविणें कितपत शक्य आहे? तें सहजसुलभ आहे कीं अशक्य आहे? या गोष्टींचा या लेखांत विचार करावयाचा आहे.

निरनिराळ्या व्यक्तींच्या वास्तव—अवास्तवतेच्या कल्पना भिन्न भिन्न आढळतात, ही गोष्ट पहिल्यानें आपण लक्षांत ठेवली पाहिजे.

भाविक, धर्मनिष्ठ माणसाला पौराणिक वर्णनांत कांहींच अवास्तव, असत्य दिसत नाहीं. श्रीकृष्णानें द्रौपदीला अनंत वस्त्रें पुरविलीं. रामानें पुनःपुन्हां जिवंत होणाऱ्या रावणाच्या छातींतील अमृतकुंभ फोडून त्याला ठार मारलें. वामनानें बळीला पाताळांत दडपलें. खांबांतून बाहेर पडून नृसिंहानें प्रल्हादाचा छळ करणाऱ्या हिरण्यकशिपूचा वध केला. मारुतीनें पर्वत उचलून आणला. कृष्णानें बोटावर गोवर्धन पर्वत उचलून धरला. सावित्रीनें पातिव्रत्याच्या जोरावर यमापासून आपल्या पतीचे प्राण परत आणले. दमयंतीनें बलात्कार करूं इच्छिणाऱ्या व्याधाला केवळ दृष्टिक्षेपानें जाळून टाकलें. मेरीला कौमार्यावस्थेंत परमेश्वरकृपेनें पुत्र झाला. मृत्यूनंतर तीन दिवसांनीं येशू ख्रिस्त पुन्हां जिवंत होऊन परत आला. पैगंबरांनीं स्वप्नांत सबक्तगिनास उपदेश केला. ह्या गोष्टी भाविक माणसाला अगदीं खऱ्या वाटतात.

ज्ञानदेवांनीं रेड्याकडून वेद म्हणविला व निर्जीव भिंत चालविली. विठोबानें जनाईस दळण दळावयास मदत केली. नामदेवाकारितां देवानें नैवेद्य भक्षण केला. धगधगणाऱ्या आव्यांतून तीन दिवसांनीं मांजरीचीं पिलें सुखरूप बाहेर निघालीं, परमेश्वरानें आपल्या भक्ताचें संकट दूर

केलें. दामाजीकरितां देवानें विठू महाराचें रूप घेतलें. ह्या गोष्टी अवास्तव म्हणून अशक्य व असत्य असें आपण एकाद्या भाविक श्रद्धावंताला सांगूं लागलों तर त्याला तें कितपत रुचेल ! आजहि परमेश्वरावर दृढ श्रद्धा असणाऱ्या भक्तांच्या रक्षणाकरितां परमेश्वर धावून येईल अशी त्याची दृढ समजूत असते. पण नवमतवादी मनुष्य वरील गोष्टी अवास्तव म्हणून 'कांहीं तरी' असा त्यांच्यावर शेरा मारील.

श्रद्धावंत भाविकाच्या मनोरचनेंत व या गृहस्थाच्या मनोरचनेंत फरक असल्यामुळें, पहिल्याला जें वास्तव म्हणून संतोषप्रद वाटतें, तेंच दुसऱ्याला अवास्तव म्हणून भ्रामक वाटतें.

निरनिराळ्या व्यक्तींची मनोरचना अत्यंत विसदृश असूं शकते. पतिव्रता द्रौपदीचें चरित्र गातांना जुन्या पिढींतील भाविक स्त्री रंगून तल्लीन होईल, तर कोणी नवविचारवती तिच्याकडे व तिच्या पातिव्रत्याच्या कल्पनेकडे कुचेष्टेनें पाहील. एकादीला पातिव्रत्याची कल्पनाच चुकीची वाटेल. पति युद्धांतून परत आला म्हणून त्याचें तोंडहि न पहाणाऱ्या राणी पद्मावतीच्या भावना निराळ्या व शत्रूकडून पराभव झाल्यामुळें भयानें पळत फिरणाऱ्या व आश्रयार्थ दीनपणानें याचना करणाऱ्या हुमायुनाबरोबर शादी करणाऱ्या हमिदा बेगमेच्या भावना निराळ्या. लढाईतून पळून आल्याबद्दल संजयाला धिक्कारणारी विदुला व आपला मुलगा लढाईवर जाणार म्हणून व्याकुळ होणारी स्त्री यांच्या मनोरचनेंत महदंतर असणारच ! तारुण्याच्या ऐन उन्मेषांत पतिशवाबरोबर सती जाणाऱ्या स्त्रिया आपणांस माहीत आहेत, त्याचप्रमाणें पतीला विषप्रयोग करून आपल्या मार्गातील अडचण दूर करणाऱ्या स्त्रियाहि आपल्या आढळांत आल्या आहेत. स्वामीकरितां सर्वस्व अर्पण करावयास तयार असणारे खंडो बल्लाळ धडपडतांना ज्या वेळेस आपणांस दिसतात, त्याच वेळेस स्वार्थाकरितां स्वामिघात करूं इच्छिणारे सूर्याजी पिसाळहि आपल्या नजरेसमोर येतात. प्राणसंकटांत परमेश्वरावर भार टाकून त्याची अनन्यभावें प्रार्थना करणारे पुष्कळ पुरुष

असतात; पण मरतांनाहि परमेश्वर नसल्यामुळें त्याचें नांव न उच्चारणारे कृष्णशास्त्री अगदींच आढळत नाहींत असें नाहीं. ईश्वरावर व त्याच्या कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् शक्तीवर पूर्ण विश्वास ठेवणारे कांहीं विचारी विद्वान् असतात, तर ईश्वर ही अज्ञानी भोळ्या जनतेच्या मेंदूंतून निघालेली वेडगळ कल्पना आहे असें म्हणणारे आगरकरासारखे थोर विचारी पुरुषहि दिसतात.

मनोरचना भिन्न भिन्न प्रकारची असल्यामुळें वास्तव–अवास्तवतेच्या कल्पनाहि भिन्न भिन्न असतात. या कल्पनांप्रमाणें मनुष्य कोणतीहि गोष्ट योग्य किंवा अयोग्य हें ठरवीत असतो. म्हणूनच एकाला गडकऱ्यांची सिंधु ही आदर्श आर्य स्त्री वाटते, तर दुसऱ्याला ती नादान वाटल्यामुळें तिची कींव येते. कालिंदीला एक धन्यवाद देतो तर दुसरा गडकऱ्यांनीं तें अवास्तव चित्र रेखाटलें असा शेरा मारतो. पतिविरहांत योगिनीचें आयुष्य कंठूं इच्छिणारी रागिणी व दुर्व्यसनी पतीचा त्याग करून आपल्या प्रियकराबरोबर सहचरी म्हणून रहाणारी अचला, यांच्या जन्मदात्यांच्या मनोरचनेंत फरक असणारच. आपल्या काळ्या राणीच्या साहाय्यानें बंधनाच्या पलीकडे जाऊन नवें जग निर्माण करूं इच्छिणाऱ्या लेखकाच्या मनोरचनेंत व जुन्या आर्य संस्कृतीच्या अभिनिवेशांत रमणाऱ्या लेखकाच्या मनोरचनेंत किती तरी विसदृशता आढळेल. नागकन्येच्या सुडौल नवनीतसदृश मनोहर अवयवांचें वर्णन करणारा लेखक व तें वर्णन पाहतांच ज्यांच्या तळपायाची आग मस्तकास पोहोंचते असे अश्लीलमार्तंड एकाच बैठकींत बसलेले नसतील असें नाहीं. अशा प्रकारचे विसंगत मनोरचनेचे लोक आढळत असल्यामुळें, त्यांच्या वास्तव–अवास्तवतेच्या कल्पनेंत साहजिक फरक आढळतो. एकाला जें वास्तव वाटतें तें दुसऱ्याला वाटत नाहीं. एकनाथाकडे प्रत्यक्ष देवानें पाणी भरलें, संत सखूबाईकरितां मार खाल्ला म्हणून पांगारकरांसारखे गहिंवरून, डोळ्यांत आंसवें आणून सांगतील, तर दुसऱ्याला त्या खुळचट कल्पनांचें हसूं येईल.

आपल्या मनोरचनेप्रमाणें कलेच्या बाबतींतहि प्रत्येकजण अपेक्षा करीत असतो. ही मनोरचना भोंवतालची परिस्थिति, शिक्षण, वयोमान, संस्कृति, सामाजिक चालीरीति वगैरेंच्या समन्वयानें बनलेली असते. लहान मुलें इसापनीतींतील गोष्टी मोठ्या आवडीनें वाचतात. कुत्र्यामांजरांच्या कथा ऐकतांना तीं भान विसरतात. प्राणी बोलतात असें त्यांना सांगितलें तरी त्याविषयीं तीं शंका प्रदर्शित करीत नाहींत. लहान मुलींचें लाकडाच्या बाहुलीशीं बोलण्यांत-खेळण्यांत भान हरपतें; पण ही मनोवृत्ति परिस्थिती-प्रमाणें, वयोमानाप्रमाणें व शिक्षणाप्रमाणें बदलत जाते. खेडेगांवांतील अशिक्षित माणसें भुतांखेतांवर व अद्भुत गोष्टींवर जितका विश्वास ठेवतात तितका सुशिक्षित माणसें ठेवीत नाहींत. गुलबकावलीसारखीं पुस्तकें अजूनहि खेड्यापाड्यांतून खूप खपतात. कांहीं शिणलेलीं वृद्ध माणसें तर जग एक मायापसारा आहे असें मानून सगळ्याच गोष्टींकडे उपेक्षेनें पहातात.

अशा रीतीनें मनोरचना बदलत असली व तिच्याप्रमाणें वास्तवअवा-स्तव-कल्पना भिन्न भिन्न बनत असली, तरी सूक्ष्मतेनें विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, या मनोरचनेप्रमाणेंच केवळ वास्तव-अवास्तव गोष्टी मनुष्य ठरवीत नाहीं. या जगांत न दिसलेल्या कितीतरी गोष्टी कलाकृतींत आढळतात. जी स्थिति पूर्वीं कोणीं कधींहि अनुभवलेली नाहीं, ती स्थितीहि रेखाटलेली कलाचित्रांत दिसते.

मेलेला मनुष्य कधींहि जिवंत होत नाहीं. कोणत्याहि वनस्पतीच्या रसांत अमृताचें दिव्यत्व अजून आढळलें नाहीं; मग अमृताची कल्पना कशी, कोठून आली ? कांहीं कलाकृतींत मेलेलीं माणसें जिवंत झाल्याचें वर्णन कसें आलें ? स्वर्ग कोणींहि पाहिला नाहीं, तरी स्वर्गाचें वर्णन केलेलें कां आढळतें ! कल्पवृक्षाची कल्पना कुणाला तरी कां सुचली ? दीपराग आळवणारे गवई, पर्वतास्त्र-पर्जन्यास्त्र सोडणारे वीरपुरुष, कामदेव व त्याचें पुष्पधनुष्य ह्या व अशाच विलक्षण कल्पना अस्तित्वांत कशा

आल्या ! ह्या गोष्टी केवळ अवास्तवच नाहींत तर त्या अतर्क्य आहेत असें असतांहि, त्या जरी सर्वमान्य झाल्या नसल्या तरी त्यांचा सार्वत्रिक प्रसार कां झाला ?

मनुष्याची सर्वच शक्ति फार मर्यादित आहेत. चार हातांपलीकडचें त्याला दिसत नाहीं. कितीतरी प्राणी त्याच्यापेक्षां अधिक बलवान् आहेत. भविष्यकाळ त्याला समजत नाहीं; भूतकाळ तो पाहूं शकत नाहीं व वर्तमानकालाचेंहि त्याला नीट आकलन होत नाहीं. जगाचें कोडें सोडविण्याचा प्रयत्न करून तो शिणला आहे. आपल्या बुद्धिबलानें अनेक नवीन शोध लावूनहि सृष्टीचें गूढ त्याला उकलत नाहीं. सृष्टीचें रूप पाहून तो गोंधळून जातो. जगांत घडणाऱ्या कांहीं गोष्टींपासून त्याला आनंद होत असला तरी बऱ्याच गोष्टींपासून त्याला दुःख व खेद होतो. त्या गोष्टी तशा न घडतां आपल्या मनाप्रमाणें—कल्पनेप्रमाणें घडाव्या असें त्याला वाटत असतें. अल्पकाळांत कोमजणारीं फुलें पाहून परमेश्वरानें सदा प्रफुल्ल असणारीं फुलें कां निर्माण केलीं नाहींत असा प्रश्न तो आपल्या मनाला विचारूं लागतो. गुणवान्, बुद्धिमान् मनुष्याला अल्पायु करण्याबद्दल तो परमेश्वरावर रागावतो, व परमेश्वरानें मनुष्याला चिरंजीवित्व कां देऊं नये हा प्रश्न त्याच्या मनांत उद्भवतो. धरणीकंप, ज्वालामुखीचा स्फोट अशा जगांत घडणाऱ्या विघटना पाहून, त्या नसलेलें एकादें सर्वसुखदायी जग—स्वर्ग असावा अशी कल्पना त्याच्या डोक्यांत खळखळूं लागते. जग अपूर्ण आहे असें प्रत्यहीं त्याला वाटूं लागतें आणि हें अपूर्ण वाटणारें जग तो आपल्या कल्पनेप्रमाणें आपल्या मनांत पूर्ण करण्याचा प्रयत्न करितो.

प्रत्येक मनुष्य जगांतील न रुचणाऱ्या गोष्टी अगर अपूर्ण वाटणाऱ्या गोष्टी आपल्या मनोविश्वांत आपल्या मनोरचनेप्रमाणें पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत असतो. सत्यसृष्टींतील अपूर्णता मनोविश्वांत कल्पनेनें पूर्ण केलेली असते. हें मनोविश्व अर्थातच अत्यंत अवास्तव असतें. सर्व

कल्पनेचा खेळ. पण कलासृष्टीला त्याचा पुष्कळसा आधार असतो, व म्हणूनच सत्यसृष्टींत नसणाऱ्या, पूर्वी न आढळलेल्या अगर पुढेंहि न होणाऱ्या गोष्टी कलासृष्टींत निर्माण झालेल्या दिसतात.

अमृताची उत्पत्ति याच मनोविश्वांत झाली. स्वर्गाची रचना हा या मनोविश्वाचाच एक भाग आहे. अप्सरा, रति, मदन, कल्पवृक्ष, चिंतामणी हीं या मनोविश्वांतून कलेच्या सृष्टींत आक्रमण करण्याकरितां आलेली मंडळी. फार काय, पण पूर्वसंस्काररहित मनानें विचार केला तर प्रत्यक्ष परमेश्वराची निर्मितीसुद्धां या मनोविश्वांतच झालेली आहे असें आढळेल.

सत्यसृष्टींतील मर्यादित शक्तीचा मनुष्य कलासृष्टींत अमर्याद शक्ति-गुणसंपन्न होतो ! तिच्यामध्यें कोणाला दहा, तर कोणाला सहस्त्र मुखें असतात. कोणी समुद्रावरून उडत जातो, तर कोणी वाटेल तें रूप घेऊं शकतो. एक समुद्र पिऊन टाकतो तर दुसरा पाताळांत प्रवेश करितो. तिन्ही लोकांत मनोजवानें फिरणाऱ्या नारदाला कलेनें निर्माण केलें आहे. सत्यसृष्टींत कुरूपसुरूपतेला कांहीं मर्यादा असतात. कलाचित्रांत रंभा–मेनका व कुब्जा–शूर्पणखा दिसतात. सौंदर्याप्रमाणेंच कुरूपतेचीसुद्धां परिसीमा त्यांत आढळते.

स्वर्ग–नरक हीं आमच्या मनोविश्वांतील पूर्णता दर्शविणारीं दोन जगें. ज्या गोष्टी येथें आम्हांला अपूर्ण वाटतात, जीं सुखें येथें आम्हांला दुर्लभ वाटतात, त्या सर्वांची पूर्णता स्वर्गांत झालेली असते. याच्या उलट भयानक, भीषण, दुष्ट गोष्टींची पूर्णता नरकलोकांत होते. हे आमच्या कल्पनेचे खेळ असले तरी ते मनोविश्वानें कल्पनेकडून तयार करविले आहेत यांत शंका नाहीं.

हें मनोविश्व प्रत्येक व्यक्तीनें स्वतःपुरतें निर्माण केलेलें असतें. इतरांचीं मनोविश्वें आपल्याप्रमाणेंच असावीं अशीहि प्रत्येकाची अपेक्षा असते. ज्याच्या राष्ट्रीय भावना तीव्र आहेत त्याच्या मनोविश्वाची रचना त्याच्या

त्या भावनेला पोषक अशीच असते. राष्ट्रीय वृत्तीचें दिग्दर्शन करणाऱ्या कलाकृतींची त्याच्या मनावर चटकन् पकड बसते; तिच्यापासून त्याला आनंद, समाधान वाटतें. इतरांनाहि तें वाटावें असें त्याला वाटतें. त्याशिवाय इतर प्रकारचें कलाचित्र असलें तर तें त्याला रुचत नाहीं. तो त्याचा तिटकारा करून तें उपेक्षेनें दूर लोटतो. त्याची ही वृत्ति त्याला योग्य वाटत असली तरी इतरांनाहि ती योग्यच वाटेल असें नाहीं. रंभा शुकाला मोहवूं शकली नाहीं म्हणून विश्वामित्राला मोहित करूं शकणार नाहीं असें थोडेंच आहे ? परमेश्वर प्रसन्न झाला असतां त्याचा विसर पडूं नये म्हणून चिरकाल दारिद्र्य मागणाऱ्या कुंतीप्रमाणेंच सर्वांची अपेक्षा असावी असें कसें म्हणतां येईल ! परलोकाकडे डोळे लागलेल्या ईश्वरभक्ताला ऐहिक गोष्टी कशा रुचणार ? हें सर्व विश्व क्षणभंगुर मानणारी ती व्यक्ति कोणत्याच कलाचित्राला किंमत देणार नाहीं.

तत्त्वप्रिय व वास्तववादी व्यक्तींचेंहि विशिष्ट मनोविश्व असतें. कोणत्याहि गोष्टीकडे पाहतांना त्याचा एक ठराविक दृष्टिकोन असतो. दगडधोंड्यांतहि तत्त्वप्रिय माणसाला तत्त्व आढळतें; मग कलाचित्रांत तें न आढळल्यास त्याला खेद झाल्याशिवाय कसा राहील ? वास्तववादप्रिय माणसाला कलाचित्रांत वास्तवता नसलेली पाहून विषाद कां वाटणार नाहीं ?

या मनोविश्वामुळेंच कलेंत कृत्रिमता आली. अगदीं वास्तववादी लेखक घेतले तरी त्यांच्या लिखाणांत कृत्रिमता येणारच. वास्तवतेच्या नांवाखालीं त्यांनीं एकादें वर्णन केलें असलें, तरी मनाला पकड बसण्याकरितां त्यांतील कांहीं गोष्टींना ते विलक्षण उठाव देतात. खांडेकरांच्या मनोविश्वांतील 'दोन ध्रुव' त्यांच्या लिखाणांत आढळले तरी सत्यसृष्टींतील लोक मध्येंच कोठें तरी असतात. त्यांना एकहि ध्रुव गांठतां येत नाहीं. वरेरकर मामा म्हणजे स्त्रियांचे अफाट वकील; पण त्यांची वकिली फक्त वाङ्मयप्रांतांतच दिसते. फडक्यांनीं आपला वास्तववाद आपल्याच एकाद्या नायकाच्या बाबतींत लावून पहावा. हरीभाऊ आपटे हे वास्तववादी लेखक.

पण वर्णन करितांना तें त्यांनीं इतक्या पूर्णतेनें केलेलें असतें कीं वाचक त्यामुळें विमूढ व्हावा. त्यांच्याविषयीं एक गोष्ट कोठें तरी वाचल्याचें स्मरतें. त्यांच्या 'मधल्या स्थितींतील' पद्मा नांवाच्या नायिकेला अत्यंत दुःखें सहन करावीं लागलीं आहेत. ती कादंबरी वाचल्यानंतर एका वाचकाला इतका संताप आला कीं, त्यानें हरीभाऊंकडे एक फाटक्या जोड्याचें पार्सल पाठविलें व त्यांना लिहिलें, "पद्मेला थोडें सुख दिलें असतें तर तुमच्या बापाचें काय गेलें असतें ? मी तेथें असतों तर या जोड्यानें तुम्हांला मारलें असतें." हरीभाऊंच्या कलेचा हा विजय होता. सत्यस्थितीच्या आधारावर रेखाटलेलें हें चित्र मनाला मोह पाडील अशा रीतीनें भडकपणें रंगविलेलें आहे. सर्वच कलाचित्रांत ही स्थिति कमजास्त प्रमाणांत आढळते. विधवेच्या छळाचें वर्णन करावयाचें तें पूर्णतेनें. व्यवहारांत काय सर्वच विधवांचा इतका छळ होतो ? दारुबाजाच्या पत्नीचा छळ दाखवावयाचा तो तिच्या जीवनाच्या शेवटांत. कलाचित्रांना मूळ सत्यस्थितीचा आधार असला म्हणजे झालें. मग आपल्या मनोविश्वाप्रमाणें कलावंत त्याला पूर्णता देण्याचा प्रयत्न करीत असतो.

कलाचित्राला हा सत्यस्थितीचा आधार आवश्यकच आहे काय ?

अपूर्ण वाटणाऱ्या गोष्टींची पूर्णता करण्याचा कलाचित्रांत प्रयत्न केलेला असतो. कांहीं तरी अपूर्ण असतें हें ओघानेंच आलें. तेंच जर नसलें तर पूर्णता तरी कशाची करावयाची ? राईचा पर्वत होईल, पराचा कावळा होईल पण वाऱ्याचे भारे कसे बांधतां येतील ? मागें एका ठिकाणीं लिहिलें आहे कीं, तोंडाला रंग लावून मूळ रूप पहाणें हास्यास्पद होईल. पण तोंडाला रंग लावून चेहरा सुंदर भासावयाचा असल्यास अवयव नीटनेटके, प्रमाणबद्ध पाहिजेत. ते तसे नसतील तर नुसतीं रंगाचीं पुटें चढविल्यानें सौंदर्य उत्पन्न होणार नाहीं. तीळ व साखर असल्याशिवाय सुंदर हलव्याचे दाणे बनवितां येणार नाहींत. कोणतेंहि चित्र पाहिलें तर त्याचें मूळ कोठें तरी सत्यसृष्टींत असतें असें आपल्याला दिसून येईल.

अशा मूळ आधारावर कलावंत कलेचें मंदिर उभारतो. कोकिळेच्या स्वराचें वर्णन काव्यांतून इतकें कां आलेलें आढळतें ? अत्यंत सुंदर आवाजीच्या माणसाला आम्हीं कोकिळ म्हणतों. काय खरोखरच त्याच्या आवाजाइतका कोकिळेचा आवाज मधुर असतो ? दुसऱ्या कोणत्याहि पक्ष्यापेक्षां कोकिळेचा आवाज अधिक गोड असतो व म्हणून तो काव्यविषय झाला. नंतर त्याची बेहद्द स्तुति होऊं लागली. सत्यसृष्टींतील वसंत व कलासृष्टींतील वसंत यांची तुलना केली तर हाच फरक दिसून येईल. इतर ऋतूंपेक्षां वसंत अधिक रम्य आहे म्हणून त्याची निवड कलाकृतीकरितां झाली. नंतर त्याच्या सौंदर्याचें अतिशय माधुर्यपूर्ण वर्णन होऊं लागलें. कलाकृतींतील वसंत सत्यसृष्टीपेक्षां कितीतरी पटींनीं अधिक सुंदर आढळतो.

कारागीर हिऱ्यावर पैलू पाडील, गारगोटीवर पाडील; एकादा कलावंत खडीसाखरेच्या खड्यावरहि पाडील, पण मातीच्या ढेकळावर त्याला आपलें कौशल्य दाखवितां येणार नाहीं. गडकऱ्यांनीं राजहंस लिहून रसिकांना रडविलें. एक गतधवा माता आपल्या एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूनें वेडी होऊन शोक करते, या कल्पनेवर हें काव्य लिहिलेलें आहे. त्या मूळ सत्यावर कवीनें कल्पना व भावना यांचा साज चढवून वाचकांना विमूढ, व्याकुल केलें आहे. पण तुळईपासून खुर्ची बनते म्हणून खुर्चीला तुळईचें मूल मानून खुर्ची मोडल्याबद्दल तुळई शोक करीत आहे अशा कल्पनेवर कवि–कुल–गुरु कालिदास अगर शेक्सपिअर यांनीं आपलें कौशल्यसर्वस्व खर्च करून काव्य केलें तर तें जनतेला कितपत पटेल ! त्यांतील वर्णनानें डोळे ओले होतील काय ? श्री. अत्रेसारख्यांनीं विडंबन केल्यास तें हसवूं मात्र शकेल. शिवाजी, तानाजी, प्रताप या वीरांच्या वर्णनांत कवींची प्रतिभा रंगते व वाचकांना ओढ लावते. पण एकाद्या कवीनें बत्तीसलक्षणी राष्ट्रपुरुष कल्पनेनें निर्माण केला तर तो आमच्या मनाची पकड घेणार नाहीं. पूर्वी राजकन्यांचीं व राजपुत्रांचीं चित्रें एकमेकांनीं पाहिल्यामुळें त्यांच्यामध्यें प्रेमभावना निर्माण झाल्याचें वर्णन आढळतें. पण एकाद्या चित्रकारानें कल्पनेनें

एकादें सुंदर स्त्रीचें चित्र काढलें आहे व त्यावर कोणी मोहित झाला आहे असें आपणांस दिसणार नाहीं. तें चित्र पहाण्यांत आनंद होईल, पण त्याची ओढ लागणार नाहीं. लहान मुलांना आपण निरनिराळीं खेळणीं देतों. त्या खेळण्यांत व सत्यस्थितींत थोडें तरी साम्य असावें लागतें. लाकडाची बाहुली असली तरी तिला डोळे, नाक दाखवावें लागतें. काठीचा घोडा असला म्हणजे त्यावर घोड्याप्रमाणें बसल्यासारखें दाखवितां येतें, म्हणूनच मुलांचें समाधान होतें. त्यानंतर आपल्या कल्पनेनें सत्याचा आभास उत्पन्न करून मुलें खेळतात; बाहुला–बाहुलींचीं लग्नें लावतात; रुसतात, फुगतात; जेवणावळी घालतात; चौफेर घोडा दवडतात. त्यांच्या भोंवतीं वडील माणसांचें जें जग त्यांना दिसतें तें पूर्णतेनें तीं आपल्या या चिमुकल्या जगांत कल्पनेनें निर्माण करितात. तीच स्थिति आपली व आपल्या कलाचित्रांची असते. कलावंत जें पहातों तें पूर्णतेनें त्याच्या कलाकृतींत आणण्याचा तो प्रयत्न करतो. अपूर्णतेला तो पूर्णता देतो, पण ती देतांना सत्याचा आभास उत्पन्न करण्याची त्याला दक्षता घ्यावी लागते.

निर्झर, फुलराणी या सुंदर कविता बालकवींनीं लिहिल्या आहेत. त्यांच्यामध्यें असलेलें मूलभूत सत्य म्हणजे कोठें तरी वाहाणारा लहानसा झरा व चिमणीशी फुलाची कळी. कितीतरी झरे आतांपर्यंत नष्ट झाले असतील ? फुलांच्या कळ्या तर रोजच विकसून सुकून जातात; पण बालकवींच्या ह्या कलाकृति मराठी भाषेंत अमर झाल्या आहेत. थोड्याशा मूलभूत सत्यावर त्यांनीं कलेचें भव्य मंदिर उभारलें आहे.

सत्याचा आभास उत्पन्न करण्यांत कलावंत जितका यशस्वी होतो तितका तो चतुर समजला जातो. या आभासाचा पडदा बाजूस सारून सत्याकडे लक्ष द्यावयाचें कीं नाहीं, व लक्ष द्यावयाचें झाल्यास किती द्यावें ?

जर खरा कीं खोटा हें पहाण्याकरितां तो जाळून पहातात. जाळल्यावर जर चांदीची तार शिल्लक राहिली तर तो खरा जर असतो. खात्री करून

घेण्याकरितां सर्व जर जाळून पहाण्याची जरूर नसते. थोडासा जर जाळून खात्री करून घेतल्यावर आपण तें वस्त्र खरेदी करतों व वापरतों. पुष्कळदां जरीचीं वस्त्रें वापरणारांना जराची परीक्षा कशी करावी हेंहि ठाऊक नसतें. कित्येकदां विकणारांनीं व कित्येकदां घेणारांनींहि त्यांची दिशाभूल केलेली असते. पण वापरणारांना त्याची कल्पना नसल्यामुळें तो खराच जर आहे अशी त्यांची समजूत असते व त्या समजुतीमुळें त्याचा आनंद कमी होत नाहीं. एकादे वेळेस जर खोटाहि असेल; पण जोंपर्यंत तो खरा आहे असें वाटतें तोंपर्यंत वापरणाराचें समाधान नष्ट होत नाहीं, अगर जर जाळून पाहण्याचा वेडेपणा तो करीत नाहीं. कलेच्या बाबतींतहि असेंच दिसून येईल.

कोणत्याहि कलाचित्रांत अंशतः वास्तवांश असला पाहिजे व त्यावर सत्याचा आभास उत्पन्न केलेला पाहिजे. तो मूळ सत्यांश अगर वास्तवांश उलगडून पहाण्याची कलानंदास्वादाकरितां जरूर नाहीं. मूलभूत सत्यांश आहे एवढी समजूत असली म्हणजे पुरे. दवबिंदूंना मोत्यें म्हणावयाचें, कारण मोत्यांप्रमाणें तीं तेजस्वी दिसतात. कल्पनेनें आभास उत्पन्न केला; पण म्हणून त्यांची माळ करण्याचा प्रयत्न करावयाचा नाहीं. सुंदर निर्झराचें मोत्यासारखें पाणी चित्रांत दाखवितां येईल, पण त्यापासून तृषाशमनाची अपेक्षा करणें योग्य होणार नाहीं. मूळच्या, अशा तऱ्हेच्या सूक्ष्म सत्यावर, वास्तवतेवर अगर सत्याच्या सहजमान्य-साम्यतेवर कलावंताच्या कलेचा पाया उभारलेला असतो. नंतर आपलें कौशल्य खर्च करून तो कलेचीं मंदिरें बांधतो. तीं बांधतांना आपल्या मनोविश्वाची त्यांत पूर्णता करण्याचा तो प्रयत्न करीत असतो. ही पूर्णता करतांना एका गोष्टीची त्याला खबरदारी घ्यावयाची असते. आपलें कलाचित्र रसिकांना अवास्तव वाटूं नये ही ती गोष्ट होय. हा आभास उत्पन्न करण्यांत जर तो यशस्वी झाला नाहीं तर त्याच्या कलेला वैगुण्य प्राप्त होतें. सर्वच कलाचित्रांत कमीजास्त प्रमाणांत अवास्तवता असूनहि कांहींवरच अवास्तव

असा शिक्का मारला जातो, याचें कारण तीं निर्माण करणाऱ्या कलावंताची असमर्थता हें आहे.

प्रत्येकाचें मनोविश्व स्वतंत्र असलें तरी तें बनविणाऱ्या परिस्थितीमुळें कांहीं बाबतींत त्यांत सारखेपणा आढळतो. त्यामुळें कांहीं विशिष्ट कलाचित्रें सर्वांना सारखींच आकर्षक वाटतात. तसल्या चित्रांतहि कलावंतानें वास्तवतेचा आभासच उत्पन्न केलेला असतो; पण मनोविश्वांतील कल्पनासाम्यतेमुळें तीं आनंदप्रद वाटतात.

कांहीं गोष्टी व्यक्तिव्यक्तींच्या मनोविश्वांत भिन्न भिन्न प्रकारच्या असतात; आणि त्यामुळें प्रत्येक व्यक्ति कलाकृतीकडे पहातांना त्या भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून पहात असते. त्यामुळेंच कलावंतानें निर्माण केलेला सत्याचा आभास एकाला योग्य वाटतो, तर दुसऱ्याला अयोग्य वाटतो. एकाला विशिष्ट कलाकृति नितांत सुंदर वाटते, तर दुसऱ्याला तीच अवास्तव म्हणून गर्हणीय वाटते. मनुष्याला वाटतें आपल्याप्रमाणेंच दुसऱ्यानेंहि वास्तव–अवास्तव समजावें. त्याकरितां तो आपलें मत दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करितोहि; पण दुसऱ्याला त्याचें मत क्वचितच मान्य होतें. कलेंतील वास्तवता म्हणून जिचें वर्णन केलें जातें ती खरोखर वास्तवता नसून तो केवळ वास्तवतेचा आभास होय. आम्ही आमच्या मनोविश्वाप्रमाणें त्यालाच वास्तवता-अवास्तवता म्हणून रणें माजवितों. साप समजून दोरी बडविण्यासारखेंच तें असतें.

---

# काव्याविषयीं अपेक्षा



'रंडागीतानि काव्यानि' असें म्हणून कवितेकडे नाक मुरडून तिरस्कारानें पहावयाचे दिवस आतां नष्ट झाले आहेत. कवितेवर खूप टीका होते याचें कारण कवितेकडे आपलेपणानें पहावयाची जनतेमध्यें प्रवृत्ति उत्पन्न झाली आहे हें आहे. जनता जरी कवितेकडे आपलेपणानें पाहूं लागली आहे. तरी तिच्या पहाण्याच्या दृष्टिकोनांत फरक आहे. निरनिराळे लोक कवितेकडे भिन्न भिन्न दृष्टीनें पहातात व आपल्या मनोवृत्तीप्रमाणें तिच्यावर टीका करीत असतात.

'जेणें देहबुद्धि तुटे—जेणें भवसिंधु आटे, जेणें भगवंत प्रगटे—त्या नांव कवित्व.' ही समर्थांची उक्ति एके काळीं सर्वमान्य समजली जात असे. आजहि ती मानणारा वर्ग उपेक्षणीय नाहीं. ईश्वरविषयक अगर नैतिक-धार्मिक विचार नसलेल्या कवितेला हे लोक काव्य म्हणावयास तयार नसतात. इतर विषयांवरील कवितेला ते हातांतहि धरीत नाहींत. प्राणहीन शरीराप्रमाणें ईश्वरविषयक विचार नसलेलें काव्य जाळावयासच पाहिजे इतकें तीव्र विधान ते करीत नसले तरी प्रेत कितीहि शृंगारलें तरी तें प्रेतच असें त्यांना वाटतें. सीतामाईनें दिलेल्या रत्नहारांतील मण्यांत श्रीरामचंद्राची मूर्ति न आढळल्यामुळें मारुतीरायानें जितक्या तुच्छतेनें तीं रत्नें फोडून फेकून दिलीं, तितक्याच किंबहुना त्यापेक्षांहि जास्त तुच्छतेनें हे लोक ईश्वरविषयक विचार नसलेलें काव्य झुगारून देतात. नदीच्या भव्य व विशाल पात्रांत पाण्याचा थेंबहि न आढळल्यास त्या जलशून्य पात्राकडे पाहून जितका विषाद वाटेल तितका विषाद त्यांना अन्य विषयांवर लिहिलेल्या कवितेकडे पाहून वाटतो. आपल्या पतीशिवाय अन्य पुरुषाचें चिंतन करणारी स्त्री कितीहि सुंदर असली, तिचा वर्ण कितीहि उज्वल असला, तिचें लावण्य कितीहि आक-

षंक असलें, तरी तिच्याकडे आदर-भक्तीनें पहातां येणें शक्य नाहीं. मेनकेकडे आदरानें पाहण्याचा प्रयत्न करीत असतां तिच्या सौंदर्यामुळें मार्गच्युत झालेले विश्वामित्र आपणांस पहावयास सापडतात. त्याचप्रमाणें 'भगवंताचें अधिष्ठान' नसलेल्या कवितेचेंहि होय असें त्यांना वाटतें.

ज्या कवित्वानें भवसागर तरून जाण्याला मदत होणार नाहीं, ज्याच्या साहाय्यानें मायेचें भ्रमपटल दूर होऊन देहबुद्धि तुटणार नाहीं, ज्याच्या मदतीनें भगवंतप्राप्ति सुलभ होणार नाहीं तें सर्व पाखंड होय, असें या लोकांचें प्रामाणिक मत असतें. त्यांचा आपल्या मतावर इतका दृढ विश्वास असतो कीं, त्याच्याविरुद्ध ब्र काढलेलाहि त्यांना खपत नाहीं. एकाद्यानें त्यांच्या मताकडे नुसत्या साशंकतेनें पाहिलें तरी ते लोक एकदम भडकतात.

वरील मत ग्राह्य मानणारे बहुतेक लोक जुन्या वळणाला प्रमाण समजणारे असतात. त्यांच्या मनाचा कल नवीन गोष्टींपेक्षा जुन्या गोष्टींकडे अधिक असतो. भूतकाळाची त्यांच्या मनावर दाट छाया पडलेली असते. वादविवाद करावयास ते तयार नसतात. त्यांना आपलीं मतें बावनकशी सोन्याप्रमाणें तावून सुलाखून निघालेलीं वाटतात. एकादे प्रसंगीं वाद करण्याची पाळी आलीच तर ते संतापून, चिडून वाद करणारावर वैयक्तिक टीका करून त्याचा उपहास करतात.

यामुळें देवादिकांच्या नांवाची ढाल पुढें करून उत्तान शृंगाराची कविता लिहिली गेली. राधा व कृष्ण हीं नांवें आणलीं कीं, शृंगार करण्याचा परवाना मिळतो. शृंगारप्रिय माणसानें गोपींच्या लीलांचें वर्णन करून आपल्या मनाची हौस भागविली आहे व या लोकांना चकविलें आहे. देवादिकांच्या नांवाखालीं जितकी शृंगारविषयक कविता लिहिली गेली आहे तितकी केवळ प्रत्यक्ष शृंगाराचीच कविता लिहिणाऱ्या सगन-होनाजी कडून क्वचितच लिहिली गेली असेल. साळूमैनांच्या उन्मत्त शृंगाराला अस्पृश्याप्रमाणें दूर ठेवणाऱ्या या लोकांकडून शंकर-पार्वती व राधा-कृष्ण

यांच्या बीभत्स शृंगाराला देव-मंदिराच्या गाभाऱ्यांत व माजघरांत मानाची जागा दिली गेली आहे.

भगवंताचें अधिष्ठान नसलें तर तें कवित्व त्याज्य होय हें मत कितपत ग्राह्य मानावयाचें ? गाय पूज्य मानावयाची हें योग्य असलें तरी इतर सर्व प्राणी अगदींच तुच्छ, त्याज्य समजणें योग्य होईल काय ? मयासुराच्या कलाकुसरीनें निर्माण केलेल्या एकाद्या सुभव्य, सुंदर मंदिराच्या अंतर्भागांत देवतामूर्ति न आढळल्यास तें मंदिर एकाद्या वारांगनेचें विलासस्थानच मानावयाचें हें विलक्षण आहे. जगाला भूषणभूत झालेला ताजमहाल हें एकादें देवतेचें मंदिर नाहीं. तें एका रूपसुंदर पण सामान्य स्त्रीचें थडगें आहे. म्हणून त्याचें महत्त्व आपण अमान्य करितों काय ? कमळ सर्व फुलांत श्रेष्ठ आहे हें आपणांस मान्य असलें तरी आपण इतर पुष्पें त्याज्य मानतों काय ? गुलाब, मोगरा, जाईजुई हीं फुलें काय आपल्याला आनंद देत नाहींत ? कमळ पुष्पश्रेष्ठ म्हणून आपल्या उद्यानांत दुसरीं कोणतींहि फुलझाडें न लावतां सगळीकडे केवळ कमळेंच लावूं इच्छिणाऱ्या रसिकाची आपण काय किंमत करूं ?

* * * *

कवितेंत प्रत्यक्ष ईश्वराचें अधिष्ठान नसलें तरी ती तत्त्वप्रधान, हेतुपर असावी असें मानणारा वर्ग फार मोठा आहे. “जें देखो न शके रवि–तें देखो शके कवि” या वचनावर हा वर्ग दृढ विश्वास ठेवतो. व्यवहारांत निरनिराळे प्रसंग सर्वांच्याच अनुभवाला येतात. भिन्न भिन्न दृश्यें आपण नेहमींच पहातों. कवींची त्या प्रसंगांकडे अगर दृश्यांकडे पहावयाची दृष्टि इतरांच्या दृष्टीपेक्षां भिन्न असते. इतर लोक त्या प्रसंगाकडे पहातात व पुढें जातात. कवि त्या प्रसंगांतून तत्त्वसृष्टि निर्माण करतो. दह्यांतून लोणी काढावयाचें काम सोपें असलें तरी साध्या विषयांतून तत्त्वाचें नवनीत काढणें सोपें नसून तें काम कवीशिवाय इतरांना करतां

येत नाहीं, अशी या व्यक्तींची समजूत असते. यांच्या मतें अगदीं नित्याच्या अवलोकनांत येणाऱ्या साध्या क्षुल्लक प्रसंगांतसुद्धां फार मोठा आशय कवींना आढळतो व तो मोठा आशय जनतेपुढें मांडावयाचें काम त्यांना करावयाचें असतें. तो आशय परमेश्वराच्या न्यायीपणाबद्दल अगर दयाळू-पणाबद्दल असेल; सत्याचा नेहमीं विजय होतो अशा सामान्य स्वरूपाचा असेल अगर एकाद्या नीतितत्त्वाचें महत्त्व दाखविणारा असेल. नेहमीं दिसणाऱ्या दृश्यांतून आपल्या दिव्य शक्तीनें शाश्वत अगर अखिल मानवजातीला हितकर अशा तत्त्वांचें शिक्षण जनतेला द्यावयाची महत्त्वाची कामगिरी कवींकडे आहे असें हा वर्ग म्हणतो.

या तत्त्वप्रिय लोकांपैकीं पुष्कळांची वृत्ति मोठी चमत्कारिक आढळते. साध्या प्रसंगांतून एकाद्या तत्त्वाचें स्पष्टीकरण व्हावयास पाहिजे एवढ्याच गोष्टीकडे त्यांचें लक्ष असतें. तें किती कौशल्यानें व्हावयास पाहिजे हा प्रश्न ते अगदींच उपेक्षणीय मानतात. भांडें मृत्तिकेचें असलें वा सोन्याचें असलें तरी त्यांतील रसाच्या माधुर्यांत फरक पडत नाहीं; महत्त्व रसाचें आहे असें ते म्हणतात. रत्न नकसकाम केलेल्या सुंदर संदूकींत असो अगर जाड लोखंडी पत्र्याच्या ओबडधोबड तिजोरींत असो, महत्त्व व मोल रत्नाचेंच. प्रसंग कसाहि असला तरी त्याकडे दुर्लक्ष करून त्यांतील तत्त्वालाच हे लोक महत्त्व देतात. त्यामुळें पुन्हां पुन्हां खालीं पडल्यावरहि प्रयत्न न सोडतां शेवटीं आपल्या घरट्यांत पोचणाऱ्या कोळ्याकडे पाहून निश्चयाच्या बळाचें प्रतिपादन करविणारा प्रसंग; मी पांथांना पाणी पाजून तृप्त करितों त्याप्रमाणें तूंहि दुसऱ्यांना तृप्त करीत जावें असें सांग-णारा झरा; मी सर्वांना माझीं फलें, फळें देतों, कोणालाहि माझ्या साव-लींत बसण्यास मनाई करीत नाहीं, तूंहि माझ्याप्रमाणेंच विशाल दृष्टि ठेव असें बजावून सांगणारा वृक्षराज; अगर स्वतः झिजून घाण दूर करणारी केरसुणी यांच्यावरील कवितांना या लोकांकडून काव्यप्रांतांत मानाची फार मोठी मनसबदारी मिळते.

कवितेंतून तत्त्वप्रतिपादन नकोच असें कोणीच म्हणणार नाहीं. पण प्रश्न असतो तो व्यक्त करण्याच्या पद्धतीचा. काव्य ही कला आहे. तिच्या साहाय्यानें तत्त्वांचें प्रतिपादन करावयाचें असलें तर तें कलायुक्त सौंदर्यानेंच व्हावयाला पाहिजे. थंडीतापानें तळमळणाऱ्या मनुष्याला क्विनाइन हितकर आहे, हें कळत असतें, तरी तें घेण्यास तो अनमान करतो, व म्हणून तें साखरेची पुटें देऊन मग उपयोगांत आणलें जातें. त्याप्रमाणेंच नुसतीं तत्त्वें माणसांना कळलीं, तरी तीं त्यांच्या पचनीं पडत नाहींत. एकाद्या प्रसंगाचें मनोहर पद्धतीनें वर्णन करून तीं अप्रत्यक्ष रीतीनें सांगितलीं, तर त्या द्वारें माणसांच्या मनावर त्यांचा ठसा नीट उमटतो व त्याला तीं चटकन पटतात.

झोपीं आलेल्या मुलाला आई पाळण्यांत घालते व तो रडत असतां त्याला झोप यावी म्हणून झोके देतांना अंगाई गीत म्हणते. या गीतांतील सुरांकडे लक्ष वेधल्यानें मुलाचें रडें थांबतें व तो न कळत झोपेच्या आधीन होतो. अगदीं तसेंच काम कवीचें असतें. एकाद्या प्रसंगाचें वर्णन अशा रितीनें करावयाचें कीं, त्या वर्णनानें मोहित झालेल्या वाचकांच्या मनावर न कळत त्यांत व्यक्त केलेल्या तत्त्वाचा दृढ ठसा उमटावा. कमळाच्या सौंदर्यानें मोहित होऊन त्याकडे धांवत जाणारा भ्रमर त्याभोंवतीं घिरट्या घालीत असतां शेवटीं भान न राहून कमळांत शिरतो. त्याचप्रमाणें कवि वर्णन करीत असलेल्या प्रसंगांत त्यांच्या वर्णनकौशल्यामुळें वाहात जाऊन त्यांत प्रतिपादन केलेल्या तत्त्वाशीं शेवटीं वाचक मुग्ध होऊन समरस व्हावयास पाहिजे. आपण एकादें तत्त्व सांगत आहोंत, एकाद्या सिद्धांतांचें विवरण करीत आहोंत, अगर एकाद्या नीतिनियमाचें महत्त्व पटवून देण्याचा प्रयत्न करीत आहोंत असें कवीनें दर्शविलें कीं, त्याचा उद्देश विफल झालाच म्हणून समजावें. तें धड तत्त्वप्रतिपादनहि होणार नाहीं व ती कलाकृतीहि पण ठरणार नाहीं.

* * * *

कवितेपासून तत्वप्रतिपादनाची म्हणजेच बोधवादाची अपेक्षा करणारा वर्ग फार मोठा आहे हें मागें सांगितलेंच आहे. या वर्गांत एक पोटभेद आहे. हल्लींच्या देशकाल–परिस्थितीचा विचार करून तिला अनुरूप अशी कविता आमच्या कवींनीं लिहावयास पाहिजे अशी या वर्गाची अपेक्षा असते.

आज आपला देश पारतंत्र्याच्या खोल दरींत खितपत पडला आहे. धार्मिक बाबतींत सर्वत्र उदासीन दिसत आहे. सामाजिक स्थिति अत्यंत विषम आहे. व्यक्ति–व्यक्तींत द्वेष माजला आहे. देशाभिमान, स्वार्थत्याग वगैरे दैवी गुणांचा आम्हांला विसर पडला आहे; गुलामगिरींत अनेक वर्षें खितपत पडल्यामुळें आमचें मन मेलें आहे; आमच्या भावना थिजल्या आहेत; आम्ही नेभळे, नादान बनलों आहोंत. अशा आजच्या अवनत परिस्थितींत कवितेनें आमच्यांत जागृतीचें कार्य करावयास पाहिजे. ही अपेक्षा पुष्कळ विचारवंत देशभक्तांचीहि असते.

पारतंत्र्यांत खितपत पडल्यामुळें मुर्दाड बनलेल्या रक्ताचा अणु अणु कविता वाचल्याबरोबर सळसळूं लागला पाहिजे. मेलेल्या अंतःकरणांतील देशद्रोही विचारांनीं ओजस्वी कवितेचे सूर कानांवर पडतांच लाजेनें काळें तोंड करून अंतःकरणांतून पलायन केलें पाहिजे. हातांत तरवार धरतांना थरथरणारें हृदय तरवारीच्या धारेवर नाचण्यास उत्सुक झालें पाहिजे. अशा काव्याची आज आम्हांला जरूर आहे. तारे, चंद्र, कोकिळा, मुलें, फुलें यांच्या कौतुकाकरितां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आम्हांला पुष्कळ वेळ मिळणार आहे. देशाच्या संसाराला आग लागली असतां काल्पनिक प्रणयिनींच्या भोंवतीं गोंडा घोळीत फिरणें, राष्ट्ररथाचें चाक पारतंत्र्याच्या कर्दमांत रुतून बसलें असतां आकाशांतील चांदण्यांची शोभा पाहण्यांत दंग होणें; मातृभूमि दुःखानें होरपळून आक्रोश करीत असतां भ्रमरांच्या गुंजारवानें व कोकिळांच्या मधुरालापांनीं गुंगून जाणें; देश दैन्यानें गांजून निघाला असतां, देशांतील लक्षावधि लोक अन्नपाण्यावाचून तडफडून मरत असतां, कमल–पुष्पांतील परागांचा आस्वाद घेण्यांत रंगून जाणें बुद्धिवंत

विचारशील माणसाला योग्य तर नव्हेच, पण क्षम्यहि नाहीं असा या लोकांचा प्रामाणिक समज असतो.

वरील समजुतीप्रमाणें काव्यापासून अपेक्षिलेल्या गोष्टी जर साध्य होत असतील तर त्या होऊं नयेत असें म्हणणारा एकादाहि देशहितशत्रू आढळेल असें वाटत नाहीं. पण ही गोष्ट कितपत शक्य आहे ? असली अपेक्षा पूर्ण होणें—तीहि कवितेपासून पूर्ण होणें फार कठीण आहे असें वाटतें. भूतकालाकडे दृष्टि फेकली तर वरील अपेक्षा पूर्ण झाली आहे, असें एकाद्या तरी देशाच्या इतिहासांत आढळतें काय ?

स्पेनचें अजिंक्य आरमार इंग्लंडचा चुराडा करावयास धावून येण्याच्या तयारींत असतां कविश्रेष्ठ शेक्सपिअर हॅम्लेटचीं स्वगत भाषणें लिहिण्यांत व्यग्र झाला होता. क्रॉमवेलची पोलादी फौज देशद्रोह्यांच्या विरुद्ध रणशिंग फुंकावयास सज्ज झाली असतां तिला मनापासून अनुकूल असणारा महाकवि मिल्टन, जनतेच्या मनांत आपल्या हक्कांची जाणीव उत्पन्न करण्याकरितां, तिच्यावर होत असलेल्या अन्यायाची कल्पना देऊन तिला जुलमी सत्तेविरुद्ध बंडखोरीला प्रवृत्त करण्याकरितां, तिच्या हृदयांतील अभिमानाची ज्योत पेटविण्याकरितां गणमात्रा जुळवीत बसला नाहीं. त्यानें कांहीं पत्रकें प्रसिद्ध केलीं व राजकारणाच्या आखाड्यांत त्यानें जातीनें उडी घेतली. वीस वर्षें तो रणांगणांत धडपडत, श्रमत होता. क्रॉमवेलच्या सत्ताविनाशानंतर, त्याच्या सर्व तत्त्वांना हरताळ फासणारी विलासी राज्यपद्धति सुरू झाली असतां लोकांना धर्मनिष्ठेचे, कर्तव्यतत्परतेचे धडे मिळतील असें कांहीं लिहिण्याऐवजीं स्वर्गच्युतीसारखे काव्य लिहिण्यांत त्यानें आपले उरलेले दिवस घालविले. सर्व युरोप खंड फ्रान्सच्या रणगर्जनेनें थरारून गेलें असतां इंग्लंडच्या रक्षणाकरितां धाकटा पिट् अहोरात्र तळमळत होता. इंग्लंडच्या नाकाशीं सूत धरण्याइतकी त्या देशाची दुरवस्था होऊन मोठी विलक्षण परिस्थिति निर्माण झाली होती. त्या स्थितींत वर्डस्वर्थ फुलपांखरांशीं बोलण्यांत, लतावृक्षांशीं हितगुज करण्यांत अगर एकाद्या अज्ञात गवत

कापणारीच्या अस्फुट स्वरलहरींवर तरंगण्यांत रंगून गेला होता. जर्मनी-मध्यें बजबजपुरी माजली असतां महाकवि गटे तरुण वेर्टरचीं दुःखें सांगण्यांत व फास्ट लिहिण्यांत चूर झाला होता. कविराज होमर इतिहासांतील गतप्रसंगांवर आपलें काव्य लिहून दारोदार तें गात फिरत होता, तो कांहीं ग्रीकांना स्फूर्तीचा झरा देण्याकरितां नव्हे !

आपल्या महाराष्ट्राच्या इतिहासांत काय आढळतें ? महाराष्ट्र निष्क्रिय झाला असतां, मुसलमानी सत्तेखालीं तो भरडून निघाला असता, जुलमी सत्तेखालीं सर्व निष्प्रभ झाले असतां, आमच्या संतकवींनीं काय केलें ! शिवाजीला राज्यस्थापन करण्याकरितां ज्या अनुकूल गोष्टी आमचे इतिहासकार देतात, त्यांमध्यें महाराष्ट्र जनतेची मनोभूमि संतांनीं अगोदरच तयार करून ठेवली होती असें एक कारण देतात. त्या वेळच्या संतकवींच्या शिकवणीकडे पाहिलें तर त्यांनीं महाराष्ट्राची मनोभूमि परकीय राज्यसत्ता उलथून पाडण्याकरितां तयार केली होती, हें म्हणणें फार भ्रामक वाटतें. त्या वेळच्या आमच्या संतांची सारी शिकवण परमार्थाविषयीं आहे. जग मायेचा पसारा आहे, ऐहिक वैभव हें क्षणभंगुर आहे. बाप, भाऊ, बहीण, पत्नी कोणी कोणाचे नव्हत. द्वेष, सूड, राग, लोभ हे मनुष्य जातीचे शत्रु होत. ह्या गोष्टी जनतेच्या मनावर बिंबवून त्यांना निष्क्रियतावादी बनविण्याचें पाप जर कोणाच्या डोक्यावर फोडावयाचें असेल तर तें संतकवींच्या डोक्यावर फोडावयास पाहिजे. 'हेंचि दान दे गा देवा-तुझा विसर न व्हावा' असें म्हणून सारखे परलोकाकडे डोळे लावून बघणारे, संसारविन्मुख होणारे व इतरांनाहि ऐहिक कर्तव्यपराङ्मुख बनविणारे आमचे संतकवि. त्यांना परसत्ता झुगारून देण्याकरितां उत्सुक अशी महाराष्ट्राची मनोभूमि तयार करण्याचें श्रेय देणें कितपत योग्य होईल ? हें कारण सांगून शिवाजीच्या यशाचें श्रेय थोडें कां होईना दुसऱ्याला देऊन त्याच्या वास्तव योग्यतेला कमीपणा आणण्याचें काम आमच्या बऱ्याच इतिहासज्ञ म्हणविणाऱ्या लोकांकडून केलें जातें; हा

ऐतिहासिक विवाद्य प्रश्न बाजूला ठेवला तरी तें श्रेय संतकवींना दिलेलें बुद्धीला पटत नाहीं. त्यांच्या साऱ्या शिकवणीचें सार परमार्थप्राप्ति हें होतें. उलट असें म्हणतां येईल कीं, तीनशें वर्षेपर्यंत महाराष्ट्रांतील संतकवींनीं जें परमार्थविषयक तत्त्वज्ञान जनतेच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न केला होता तें सारें आमच्या ह्या राष्ट्रपुरुषानें आपल्या कृतीनें, उदाहरणानें, वर्तनानें एका क्षणांत उडवून दिलें व जनतेचा हृदयाग्नि चेतविला. हें कवितेनें केलेलें कार्य नाहीं. आपसांतील दुहीनें महाराष्ट्राचें स्वराज्य नष्ट होण्याची पाळी आली असतां आमचे कविवर्य मोरोपंत महाभारत-रामायण यांचीं भाषांतरें करून काव्यरचना करण्यांत दंग झाले होते. आणि अलीकडेहि आमच्या आशियाचे कविसम्राट, हिंदुस्तानचे प्रातर्वंदनीय कविराज रवींद्र हिंदुस्तानच्या अवनत अवस्थेंत गीतांजली, गार्डनर, बिजेची कोर अशींच काव्यें आधिक्यानें लिहीत होते.

पारतंत्र्याची शृंखला तोडीत असतां प्रतिकूल परिस्थितीवर स्वार होऊं इच्छिणाऱ्या कोणत्याहि वीरश्रेष्ठानें कवितेच्या पांगुळगाड्याचा आधार घेतलेला दिसून येत नाहीं. महाराष्ट्राच्या इतिहासाकडे भावनेच्या मोहिनीनें भारावून पहाणारे व ऐतिहासिक सत्याविषयीं विशेष चोखंदळ नसणारे कांहीं लोक सोडून दिले तर, शिवाजीला एकाद्या पोवाडे म्हणणारानें अगर कवीनें उल्लेखनीय मदत केली होती असें म्हणण्याचें कोणीच धाडस करणार नाहीं. जगद्विजयी नेपोलियनाच्या सैन्यांतील दुर्दमनीय उत्साहाचा प्रेरक कोणी कविराज होऊन गेला नाहीं. शिखांच्या रक्ताच्या कणाकणांत लढाऊ वृत्तीचें बीजारोपण करण्याचें काम गुरु गोविंदसिंहानें कांहीं कवितेच्या मंत्रबलावर केलें नाहीं. शत्रूच्या त्रासानें हैराण होऊन रानोमाळ सैरावैरा भटकत असतां राणा प्रतापच्या अंतःकरणांतील स्वातंत्र्यज्योत तेवत राहावी म्हणून त्याच्या हृदयदीपांत कवितास्नेहाची संततधार एकाद्या कवीनें सुरू ठेवली नव्हती. धर्माच्या विक्षिप्त कल्पनांनीं वावरलेल्या वीरनायक केमालपाशाचा उजवा बाहु म्हणून एकादा कवि नाहीं.

आयर्लंडला स्वराज्याचा मंत्र शिकविणारा डी व्हॅलेरा आपल्या देशबांधवांच्या अंतःकरणांत देशप्रेमाची ज्योत पेटविल्याबद्दल कोणत्या कवीला वंदन करावयास तयार होईल ! वृद्ध अस्वलाप्रमाणें हतबल वाटणाऱ्या रशियाच्या नेभळ्या रक्तांत संजीवन ओतण्याचें कार्य लेनिननें कोणत्या कविपुंगवाच्या मदतीनें केलें ! दांत व नखें उपटून पिंजऱ्यांत कोंडलेल्या जर्मनसिंहाची अस्मानगर्जना सुरू होण्यास कोणत्या कविकुलगुरूची प्रतिभा हिटलरच्या साहाय्यास आली ? खलास झालेल्या रशियावर गरुडझेप टाकणाऱ्या जर्मन रणबहाद्दरांचे पंख आपल्या कोयत्यानें छाटावयाचें सामर्थ्य साध्याभोळ्या रशियन स्त्रीच्या अंगांत संचरावें म्हणून स्टॅलिननें एकाद्या कवीला त्याच्या प्रतिभासंपन्न राष्ट्रगीतांच्या गायनाचा दौरा काढावयास लावलें होतें काय ? आपद्ग्रस्त राष्ट्राची मुक्तता करण्याचें श्रेय एकाद्या कवीला लाभल्याचें उदाहरण शोधूं जातां आढळत नाहीं.

अलौकिक वीरपुरुषांनीं, असामान्य लोकनायकांनीं, अतुल बुद्धिबलशाली पुरुषश्रेष्ठांनीं आपल्या राष्ट्राच्या मानेवरील अवजड जोखड आपल्या दीर्घ प्रयत्नांनीं झुगारून दिलें आहे; आपल्या महान् कृतीनें त्यांनीं स्वजनांच्या अंतःकरणांत अमृत ओतलें आहे.

अनेक भाट पूर्वजांच्या पराक्रमाचे पोवाडे गाऊन भोंवतीं पिंगा घालीत असतांहि कर्तव्य–विन्मुख बनलेल्या चितोडच्या सिंहाची–युवराज उमरावाची झोप उडविण्याकरितां अछरोलच्या ठाकुराला अपमान–निर्भर्त्सना यांचा विषारी फटकारा मारून त्याला डिवचावें लागलें. रामदासासारख्या समर्थांचा दासबोध संभाजीच्या बाबतींत निरुपयोगी ठरला. शिकंदराजवळ इलियड असे पण निरुत्साही बनल्यावर पराक्रमाची स्फूर्ति होण्याकरितां त्याला त्याचा उपयोग होत असे, असें म्हणण्याचें साहस सहसा कोणी करणार नाहीं. हजारों वीरांच्या तलवारीची मला जितकी भीति वाटत नाहीं तितकी भीति डेमास्थेनिसच्या जिभेच्या पट्ट्याची वाटते, असें

फिलिपप्रमाणें एकाद्या कवीविषयीं कोणीतरी उद्गार काढले आहेत काय?

कवितेनें राष्ट्रप्रेम, देशाभिमान हीं उत्पन्न झालीं तर तीं आम्हांस जरूर पाहिजेत. पण ज्या प्रमाणांत ही अपेक्षा केली जाते त्या प्रमाणांत ती पूर्ण होणें अशक्य आहे, हें गतकाळाकडे दृष्टि फेकल्यावर कळून येतें.

* * * *

याच मनोवृत्तीचा पण थोड्या निराळ्या दृष्टीनें कवितेकडे पाहणारा एक वर्ग आहे. समाजामध्यें जी विषमता आढळते तिचें प्रभावी भाषेत वर्णन करून कवितेनें या विषमतेविषयीं जनतेच्या मनांत तिटकारा उत्पन्न केला पाहिजे. श्रीमंतांची अरेरावी, दलितवर्गाची लाचारी यांचें असें वर्णन कवितेंत असावयास पाहिजे कीं, समाज खडबडून जागा व्हावा व ह्या अन्यायाविरुद्ध त्यानें बंडखोरीला प्रवृत्त व्हावें. सामाजिक अन्यायाची दणदणीत भाषेत लिहिलेली कथा कवितेंतून वाचावयास मिळाली पाहिजे असें त्यांना वाटत असतें. " अर्धी भाकर दरएकाला—नंतर श्रीमंता पोळी " हें त्यांचें आवडतें ध्येय असतें. 'अन्याय व जुलूम यांविरुद्ध चीड' हें त्यांचें प्रिय तत्त्वज्ञान काव्यमंदिरांतील सिंहासनावर अधिष्ठित झालेलें पाहिजे असें त्यांना वाटतें.

या बाबतींतहि येणारा अनुभव तितकासा समाधानकारक नाहीं. महाराष्ट्रांतील विषम रूढींवर आगरकरांनीं जो हल्ला केला तो कांहीं कवितेंतून केलेला नाहीं. केशवसुतांची कविता म्हणजे आगरकरांच्या जळजळीत लिखाणाची केवळ पडछाया. काव्याच्या अभिनिवेषांत आम्ही त्या कवितेचे कितीहि गोडवे गाइले तरी ती खरोखर आगरकरांच्या रणभेरीचा अस्फुट प्रतिध्वनि आहे. महाराष्ट्राचें जहाल राजकारण प्रत्येक व्यक्तीच्या रक्तांत भिनविण्याचें काम केसरीच्या अस्मान—गर्जनेनें लोकमान्यांनीं केलें. आजचे स्वातंत्र्यवीर सावरकर एक प्रतिभाशाली कवि आहेत. पण त्यांनीं बुरसटलेल्या रूढींवर जो हल्ला केला तो कवितेंतून केला नाहीं. त्यांच्या गद्य—लेखांनींच तें कार्य प्रामुख्यानें केलें. अरेराव श्रीमंतांनीं पिचत,

तडफडत दडपून ठेवलेल्या दलितवर्गाला, बेगुमान पराक्रमानें त्यांच्याशीं दोन हात करण्यास तयार करण्याचें महत्तर कार्य रुसोनें कवितेच्या तारे-चरच्या कसरतीनें केलेलें नाहीं. आमचा 'मराठी भाषेचा शिवाजी' एवढें जनताजागृतीचें कार्य करून गेला पण त्यानें आपल्या सर्व आयुष्यांत कवितेची ओळ खरडल्याचें दिसत नाहीं. हाच अनुभव लेनिन, स्टॅलिन, रॉय, महात्मा गांधी वगैरेंच्या बाबतींतहि दिसून येतो. कवितेची लाकडी तरवार घेऊन रूढ कल्पनांच्या भूतांचा छेदविच्छेद कोणत्याहि समाजपुरुषानें केलेला दिसत नाहीं. अन्यायाची चीड कवितेंतून व्यक्त केली गेली असली, तरी त्या अन्यायाविरुद्ध बंडखोरीला प्रवृत्त करण्याचें खरें कार्य कवितेपेक्षां गद्यलेखांनींच केलेलें आढळतें.

* * * *

मनाला आल्हाद देण्याकरितां करमणूक करण्याकरितां कविता असते, असें म्हणणारा वर्ग जनसमाजामध्यें बराच मोठा आहे.

"सरस्वति ही पुराणिकाच्या व्यासपीठावर बसली नसून, प्रमत्त मयूर-पुच्छाच्या सिंहासनावर बसली आहे." प्राध्यापक फडके.

"ज्ञान हवें असल्यास पंडिताकडे जावें, उपदेश हवा असल्यास हरदासाकडे जावें." आचार्य अत्रे.

कविता वाचल्याबरोबर अंत:करणांत आनंदाच्या लहरी उसळावयास पाहिजेत. क्षणभर का होईना पण आनंदानें बेभान झाल्यामुळें माणसाला सर्व जगाचा विसर पडला पाहिजे, असें या लोकांचें मत आहे. मनुष्याची सर्व धडपड आनंदप्राप्तीकरितां चाललेली असते. सर्व सुखाची अनुकूलता असणारा संपन्न संस्थानिक आपला जीव धोक्यांत घालून रानावनांतून उपाशी सर्व दिवसभर आपल्या शिकारीच्या मार्गे धावपळत असतो, याचें कारण त्यांत त्याच्या मनाला अव्यक्त आनंद प्राप्त होत असतो, हें आहे. या आनंदाच्या प्राप्तीकरितांच, गौरीशंकराच्या माथ्यावर जाऊं इच्छिणारे सर्व लोक आजपर्यंत मृत्युपंथानें गेले हें ठाऊक असूनहि, आपलें जीवित

६३०७

मृत्यूच्या जवड्यांत टाकण्यास तिकडून कोणी साहेब येतो तर निरुपयोगी मोत्यें गोळा करण्याकरितां इकडून कोणी समुद्राच्या तळाचा ठाव घेतो.

निरनिराळ्या कला माणसाला आनंद देण्याकरितांच निर्माण झाल्या आहेत चित्रकला, शिल्पकला, नृत्यकला ह्या त्याच्या नयनांना आनंद देण्याकरितां अवतरल्या. संगीताच्या अर्थहीन, शब्दहीन, मधुर निनादलहरींवरहि मनुष्याचें हृदय नाचूं लागतें. वीणेच्या गोड सूरांनीं तो बेभान होतो. कोकिळेच्या मधुरालापांनीं तो गुंगून जातो. सनईच्या गोड स्वरलहरींनीं त्याचें हृदय उचंबळून येतें. श्रीकृष्णानें आपल्या मुरलीच्या सुस्वर मोहिनीनें सारें गोकुळ वेडें केलें होतें. तंतु वाद्यांचे एवढे प्रकार व इतका प्रसार होण्याचें कारण निःशब्द नादलहरींवरहि माणसाचें मन हर्षनिर्भर होतें हें आहे.

यामुळेंच काव्य शब्दातीत असतें असेंहि ह्यांपैकीं कांहीं लोक म्हणावयास तयार होतात. सागराच्या चंचल लहरींत त्यांना काव्य आढळतें. काळ्या मेघांच्या पोटांत नाचणाऱ्या वेड्यावाकड्या विजेच्या दर्शनांत ते काव्य पहातात. पूर्णिमेचा चंद्रच नव्हे तर विजेची कोरहि त्यांच्या काव्यानंदाला भरती आणते. वसंताच्या विलासांत त्यांच्या काव्यशक्तीला बहर येतो. श्रावणाच्या सरीबरोबर त्यांच्या काव्यसरींचा वर्षाव होतो. शरदश्री पाहून फुलांभोवतीं गुणगुणत फिरणाऱ्या भ्रमराबरोबर यांचाहि काव्यात्मा गुणगुणूं लागतो. निर्झराच्या निरर्थक झुळझुळणाऱ्या लहरीबरोबर ह्यांचेंहि हृदय मुग्ध होउन गाऊं लागतें.

हृदय आनंदाच्या शोधांत असतें, अशा दृश्यांनीं आनंद प्राप्त होतो व म्हणूनच ते कवींचे काव्यविषय झाले आहेत असें ते म्हणतात. त्यांच्यामतें हेतुशून्य गोष्टींनींहि मनाला आनंद होत असतो व त्यामुळें कितीतरी गोष्टींना काव्यप्रांतांत सन्मानाचें स्थळ मिळालें आहे. लहान मुलाचे बोबडे अर्थशून्य बोल त्याच्या आईच्या हृदयांत आनंदाचें थैमान उसळवितात. त्यामुळेंच त्यांना काव्यरूप मिळतें. रात्रीं आकाशांत दिस-

णारा नक्षत्रांचा पसारा बहुतेक कवींचा काव्यविषय कां होऊं शकला ? इंद्रधनुष्याच्या रंगाबरोबर कवींची प्रतिभा कां रंगू लागली ? सुप्रभातीं दिसणाऱ्या रम्य उषेचें अगर सायंकाळच्या मनोहर संध्येचें चित्र काढतांना अनेक कवि तल्लीन कां झाले ? सूर्यापेक्षां चंद्रालाच काव्याच्या जगांत अधिक सन्मानाचें स्थान कां दिलें गेलें ! त्यांपासून एकादें तत्त्व कळतें, का कांहीं हितकर उपदेश होतो, का एकाद्याचा मार्ग चुकला असल्यास त्याला योग्य मार्ग सुचतो, का त्यांच्या दर्शनानें गलितधैर्य झालेल्यांच्या अंतःकरणांत पराक्रम सळसळूं लागतो, का देशबुडव्या माणसाच्या अंतःकरणांत देशाभिमान जागृत होतो ? त्यांच्यापासून निर्मल आनंद प्राप्त होतो. त्यामुळेंच केवळ त्या दृश्यांना काव्याचें चिरस्वरूप मिळालें आहे.

हृदयामध्यें भावनेच्या आवेगामुळें उत्पन्न आनंद होतो. विचारी, तत्त्वप्रिय माणसाच्या दृष्टीनें क्षुद्र वाटणाऱ्या कितीतरी गोष्टींना हृदयानें अमूल्य ठरविलें आहे. डोक्यांतील मेंदूला ज्या वस्तूंचें महत्त्व वाटत नाहीं अशा कितीतरी वस्तूंच्या सहवासांत हृदय आनंदानें हसूं खेळूं लागतें. तत्त्वज्ञानामुळें जगाची प्रगति होत असेल, पण मनुष्य भावनेच्या बळावर जगत असतो. कितीहि तत्त्वप्रिय मनुष्य असला तरी तो भावनाशून्य असणें शक्यच नाहीं. हृदयाशीं संबंध आला कीं तत्त्वज्ञान लुळें-पांगळें ठरतें. जगांत तत्त्वज्ञांची संख्या ज्या प्रमाणांत वाढेल त्या प्रमाणांत जग रुक्ष आनंदहीन यंत्रासारखें बनेल. तत्त्वज्ञाला पुत्रप्राप्तीचा आनंद होणार नाहीं. पत्नीविरहाचें दुःख होणार नाहीं. प्रिय पुत्राच्या मृत्यूनें त्याचें हृदय पिळवटून रडूं लागणार नाहीं. देशाच्या उत्कर्षानें अगर अवनतीनें त्याच्या चित्ताची स्थिरता ढळणार नाहीं. दुःखानें तळमळणारांच्या हृदयभेदक किंकाळ्यांनीं त्याच्या मनाची समता चळणार नाहीं. सौंदर्यसम्राज्ञीच्या प्रेमगर्भ कटाक्षांनीं त्याचें हृदय घायाळ होणार नाहीं. बालकाच्या निर्मळ हास्यानें तो विकला जाणार नाहीं. त्याला हृदयच नसतें. पण असे तत्त्वज्ञानी जगांत नाहींत हें आमचें भाग्य. कण्वासारख्या स्थितप्रज्ञ महर्षींच्या डोळ्यांतसुद्धां

आपल्या पाळलेल्या कन्येच्या वियोगानें अश्रु तरंगूं लागले. विषाचा प्याला हातांत घेऊन त्याकडे उपहासानें पाहणारा तत्त्वज्ञ साक्रेटीसहि प्रसंगीं देशाकरितां हातांत तलवार घेऊन लढला होता. सर्व जगावर प्रेम करूं इच्छिणारे महात्माजीहि हिंदुस्तानकरितां रात्रंदिवस तळमळत असतात.

काव्यामुळें हृदयांत आनंदाच्या लहरी ज्या प्रमाणांत उसळतील त्या प्रमाणांत तें काव्य श्रेष्ठ समजावयाचें असें या वर्गाचें म्हणणें असतें. आनंद-प्राप्तीशिवाय तुमच्या दुसऱ्या अपेक्षा असल्या तर त्या पूर्ण होण्याकरितां काव्याच्या मुखचंद्राकडे पाहणें तितकेंसें योग्य नव्हे असें ते म्हणतात.

हा निरनिराळ्या मतामतांचा गलबला पाहिला म्हणजे आम्ही भांबावून जातों. प्रत्येक जण आपापल्या मताच्या स्पष्टीकरणाकरितां शद्बांचे भाले सरसावून आपल्याला येत असतील नसतील तितक्या भाषांतील थोरामोठ्यांच्या अवतरणांच्या ढाली पुढें करून प्रतिपक्षावर हल्ला चढवीत असतो. कोणीहि माघार घेत नाहीं, कांहींहि निश्चित ठरत नाहीं, सारखा गोंधळ चाललेला असतो. आणि मग आम्ही वैतागून म्हणतों, "काव्य ही जगाच्या संसारांतील अडगळ आहे."

# काव्याची उपयुक्तता ५

'काव्य ही जगाच्या संसारांतील अडगळ आहे; सर्व काव्यग्रंथ समुद्रांत नेऊन बुडविले तरी जगाचें कांहीं अडणार नाहीं. जग आजच्याच गतीनें पुढें जाईल.' असें उद्वेगानें म्हणणारे लोक शेवटीं आपल्या मताचें अनेक प्रकारें समर्थन करूं लागतात व कवितेची उपयुक्तता सिद्ध करून दाखवा, म्हणून तिच्या पुरस्कर्त्यांना कित्येकदां आव्हान देतात.

रवींद्रनाथांनीं एक चिमुकली भावकथा लिहिली आहे. "एक प्रतिभाशाली धनसंपन्न कवि आपल्या बागेंत मजेंत बसला असतां, कोणी-तरी भुकेनें व्याकुळ झालेला, पाठीस पोट लागलेला, दुबळा भिकारी त्याच्याकडे येऊन कांहींतरी खायला द्या म्हणून त्याला विनवूं लागला. त्याची दीनवाणी ऐकून कविराजांना फार आश्चर्य वाटलें. तेथें सुमधुर परिमल पसरलेला होता. कोठेंतरी वृक्षशाखेवर बसलेली कोकिळा पंचमांत तान घेत होती. जिकडे तिकडे हसरीं फुलें वाऱ्यावर नाचत होतीं. कविराज त्या दृश्याकडे पाहून त्या भिकाऱ्याला म्हणाले, "अरेरे, मला तुझी कीव येते. येथें पसरलेल्या मधुर परिमलाचें सेवन करून आपली भूक तुला शांत करतां येऊं नये ! ही कोकिळा मधुर गायन करीत असतां तुला आपल्या यःकश्चित् भुकेचा कसा विसर पडत नाहीं ? ही हसरी पुष्पसृष्टि पाहूनहि तुला पहिल्यानें पोटाची खळगी भरण्याची कशी काळजी वाटते ? किती क्षुद्र वृत्तीचा आहेस तूं ! जा, तुला कांहीं द्यावें अशा योग्यतेचा तूं नाहींस !" बिचारा भिकारी तसाच तळमळत परत गेला. कविराज आपल्या काव्य-कल्पनानादांत रंगून गेले. त्या भिकाऱ्याला एकच भूक माहीत होती. त्या भूकेपेक्षां दुसरी अगर तिसरी भूक अधिक तीव्र असते याची त्याला कल्पनाहि नव्हती. कवितेची अनुपयुक्तता एका महाकवीनेंच कशी स्पष्ट

केली आहे हें अशा रीतीनें दाखवितांना या लोकांना मोठें स्फुरण चढतें.

कविलोकांनीं कवितेचा नसता बडेजाव करून ठेवला आहे असें ते म्हणतात. व्यवहारांत कवितेला अनिवार्य महत्त्वाचें स्थान मिळणें कठीण आहे. शाळाकॉलेजांतील तरुण मुलांना कांहीं महत्त्वाचा उद्योग नसल्यामुळें ते काव्य-कल्पनांवर झुलत डुलत असतात. प्राचीन-अर्वाचीन कविमयूरांच्या काव्यपिसाऱ्याला पाहून दिपून गेलेले तरुण कवितेला भलतेंच महत्त्व देतात. पण सत्यस्थिति तशी नसते. पिसाऱ्यांतील डोळे केवळ शोभेचे असतात.

" आम्ही आमचें साम्राज्य देऊं, पण आमचा शेक्सपिअर देणार नाहीं " अशी बडबड करणाऱ्या इंग्रज पंडितांचे भाऊ, शेक्सपिअरला वास्तव जगांत जी किंमत देतात, तीबद्दल आचार्य अत्रे यांनीं आपला एक सुंदर अनुभव लिहून ठेवला आहे. ते एका ब्रिटिश बोटींतून विलायतेला जात होते. एकदोन दिवसांतच बोटीवर फिरायचा त्यांना कंटाळा आला. कांहींतरी वाचून वेळ घालवावा म्हणून शेवटीं ते बोटीवरच्या लायब्ररींत गेले. पण त्या लायब्ररींत ओळखीचा चेहराच त्यांना दिसेना. निदान शेक्सपिअर तरी दिसेल, म्हणून ते पाहूं लागले. बराच प्रयत्न केल्यावर एका कोपऱ्यांत धूळ खात, अर्धवट कसरीनें खाल्लेला, कविश्रेष्ठ शेक्सपिअर त्यांना आढळला. बोटीवरच्या एकाहि इंग्रज माणसानें कधीं त्या इंग्लंडच्या महाकवीची विचारपूस केलेली दिसत नव्हती. पण एका विशिष्ट शिक्षणक्रमांतून गेलेल्या हिंदी माणसाला त्याची आठवण झाली. शेक्सपिअरचें साम्राज्यापेक्षां अधिक महत्त्व मानणाऱ्या पंडितसाहेबाला, कान पिरगळून सांगावयाला पाहिजे कीं, "तूं दारू प्याल्याप्रमाणें बरळूं नकोस. ही पहा, तुझे देशबांधव तुझ्या प्रियतम कवीची काय किंमत करतात ती ! "

कविता म्हणजे फुलवेल. काव्यसृष्टि म्हणजे फुलांनीं बहरलेलीं उद्यानें. ह्या उद्यानाचें मोल ज्वारीच्या अगर भाताच्या शेतांपेक्षां फार जास्त मानणारे पुष्कळ पांढरपेशे आपणांस आढळतात; पण भाताच्या शेतांतून येणाऱ्या तांदळाचा पुरेसा पुरवटा झाल्यामुळेंच त्यांचें हें मत बनलेलें

असतें, हें विसरतां कामा नये. आम्ही भाताचीं शेतें मोडून त्यांचीं उद्यानें बनवूं लागलों कीं या रसिकवर्यांचे डोळे पांढरे होतील.

या आत्यंतिक उपयुक्ततावाद्यांना त्यांच्याच पद्धतीनें उत्तर देतां येणार नाहीं असें नाहीं. कविता जगाच्या संसारांत त्यांना अडगळीप्रमाणें वाटते. पण कवितेकडे इतक्या कटाक्षानें पाहणारा त्यांचा उपयुक्ततावाद जर सगळीकडे योजूं लागलों तर मोठा अनवस्था प्रसंग येईल. खऱ्या उपयुक्ततावाद्याला सम्राट् जॉर्जच्या मुकुटावरील दैदीप्यमान कोहिनूर एकाद्या कोळशाच्या तुकड्यापेक्षां जास्त किंमतीचा वाटणार नाहीं. जगाला भूषणभूत झालेल्या ताजमहालाची उभारणी करण्याकरितां पाण्यासारखा पैसा ओतून मनुष्यशक्तीची हानि करणाऱ्या शहाजहानाचा त्याला संताप येईल. प्राचीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून नांवाजलेलीं वेरूळचीं लेणीं पाहून त्याला विषाद वाटेल. आफ्रिकेंत म्हाताऱ्या अगर आजारी पडलेल्या माणसाला मारून खाणारी एक जात आहे म्हणतात; खरा उपयुक्ततावादी काम करण्यास असमर्थ म्हणून निरुपयोगी झालेल्या आपल्या वृद्ध माता-पित्याला गोळी घालून ठार मारावें असें म्हणण्यास कमी करणार नाहीं. नंदनवनाप्रमाणें सुंदर असलेलें उद्यान जाळून तो त्या ठिकाणीं भाताची लागवड करील. स्त्री म्हणजे मुलें उत्पन्न करण्याची गिरणी यापेक्षां स्त्रीचें जास्त महत्त्व त्याला वाटणार नाहीं; पण असे उपयुक्ततावादी फारच थोडे आहेत म्हणूनच जगाची धडगत आहे. शिवाय दोन उपयुक्ततावाद्यांचें तरी एकमत होतें काय ? एक कवितेला अनुपयुक्त ठरवील तर दुसरा सर्वच कला निरुपयोगी असा त्यावर औरंगजेबशाही शिक्का मारील आणि त्याच्या हातांत सत्ता आल्यास तो सर्व कलांची हकालपट्टी करण्याचा प्रयत्न करील. पण असल्या प्रयत्नांचा काय परिणाय होईल ? लढाईच्या प्रसंगींहि हातांत बायबल ठेवूं इच्छिणाऱ्या जहाल प्यूरिटन्सनीं क्रॉमवेलच्या कारकीर्दींत सर्व चैनीच्या व ऐषआरामाच्या गोष्टींचा इंग्लंडमधून नायनाट करण्याचा कसून प्रयत्न केला; पण त्यांच्या त्या विरोधामुळें दुसऱ्या चार्लसच्या कारकीर्दींत त्या

गोष्टी तोडलेल्या तरूप्रमाणें जोरानें फोफावल्या. क्रॉमवेलची सुतकी कारकीर्द मात्र त्याच्या मूठभर अनुयायांशिवाय कोणालाहि रुचली नाहीं.

दुसरी महत्त्वाची गोष्ट–या असल्या उपयुक्ततावाद्यांना आनंदप्राप्तीचें महत्त्व न कळल्यामुळें तिच्या उपयुक्ततेचें आकलनच होत नाहीं. आनंद-प्राप्तीकरितां मनुष्य आपला सुखी जीव संकटांत लोटतो हें मागें एकदां सांगितलें आहे. अत्यंत कष्टानें मिळविलेला पैसा खर्च करून आम्ही आनंद विकत घेण्याचा नेहमीं प्रयत्न करीत असतों. दिवसभर काबाडकष्ट करून चार सहा आणे मिळविणारा मजूर कित्येकदां अर्धपोटीं राहूनहि दोन पैशांच्या विड्या घेऊन त्या लपवून ओढीत पिटमधून आपलें आवडतें तुफान चित्र पहात असतो. करमणुकीच्या बहुतेक गोष्टींकरितां आम्हांला पैसा ओतावा लागतो व आम्ही निढळाच्या घामानें मिळविलेला पैसा खर्चहि करतों. आनंदलाभामुळें श्रम दूर होतात व अधिक उत्साहानें मनुष्य काम करूं लागतो. त्याची उपयुक्तता इतर वस्तूंच्या उपयुक्ते-प्रमाणें प्रत्यक्ष मोजण्याचें साधन नसल्यामुळें, सकृद्दर्शनीं लक्षांत येत नसली तरी अनेक अत्यावश्यक गोष्टींपेक्षांहि आनंदलाभ करून घेण्याचें मोल जास्त आहे हें विचारांतीं पटेल आणि हें जर पटलें तर भाताचीं शेतें नांगरून तेथें उद्यानें लावूं नयेत, हें मान्य केलें तरी त्याबरोबरच मधून मधून कोठेंतरी एकादें दुसरें उद्यान असलें पाहिजे हेंहि म्हणणें मनाला वावगें वाटणार नाहीं. निदान असलेलीं उद्यानें जाळून भाताची लागवड करावी असें म्हणणें श्रेयस्कर नाहीं, एवढी तरी खात्री होईल.

ही जी काव्याकडे पहातांना कांहीं लोकांची आत्यंतिक विषादाची वृत्ति बनलेली दिसते, ती तशी कां दिसते याचा विचार करावयास पाहिजे. हे लोक काव्यावर जे इतके घसरतात ते केवळ काव्य-वाचनाची त्यांना आवड नसते त्यामुळेंच घसरतात कीं दुसरें त्याचें कांहीं कारण आहे? काव्यापासून हल्लीं साधारणपणें ज्या निरनिराळ्या अपेक्षा भिन्न भिन्न व्यक्तींकडून केल्या जातात, त्याचें दिग्दर्शन मागच्या लेखांत केलें आहे.

त्या लोकांच्या मतामतांचा गलबला पाहून, हे लोक काव्याकडे वैतागानें पाहतात हें जरी कांहीं अंशीं खरें असलें, तरी तेवढेंच एक कारण त्यांच्या वैतागाच्या मूळाशीं आहे काय ?

काव्याविषयीं ही विलक्षण उपेक्षा असण्याचें कारण बरेच रसिक काव्यापासून भरमसाट अपेक्षा करितात हें आहे. ती प्रतिक्रिया आहे. प्राचीन काळापासून काव्याविषयीं व तीं लिहिणाऱ्या कवींविषयीं लोकांनीं विलक्षण कल्पनांचा जो बेसुमार प्रसार केला त्यावर तो प्रत्याघात आहे.

कवि द्रष्टा असतो; इतरांना ज्या गोष्टींचें आकलन होत नाहीं त्या गोष्टी आपल्या प्रतिभाशक्तीच्या देणगीमुळें त्याला समजतात. सूर्याला आपल्या सहस्रकिरणनेत्रांनीं जें दिसत नाहीं तें कवीला दिसतें. कवि शब्द-सृष्टीचे ईश्वर असतात. ते ईश्वराचे लाडके सत्पुत्र असतात. कवि सर्व जगाला वंदनीय असतात. जगावर त्यांचे फार फार उपकार झाले आहेत. जगांतून कवीला वगळतांच जगाची भयंकर हानि होईल ! कवि म्हणजे ज्ञानरसाची गंगा, विद्वत्तेचें कोशागार. याप्रमाणें कवीविषयीं केलेलीं विधानें पाहिलीं म्हणजे सामान्य माणसें गोंधळतात. त्यांच्या-भोंवतीं एकादा दुसरा कवि त्यांना दिसत असला तर त्याची व या असल्या वर्णनाची ते तुलना करूं लागतात; आणि तो कवि जर आपल्या प्रतिभेच्या दैवी गुणांच्या धुंदींत बेभान झालेला असेल (बहुधा तो तसा असतोच) तर मग पहायलाच नको ! या लोकांना त्याच्या एकंदर वृत्तीकडे पाहून जो अनुभव येतो त्यावरून, त्याच्याविषयीं व कवितेविषयीं तिटकारा न वाटला तरच नवल !

या परमेश्वराच्या लाडक्या पुत्राला साधा व्यवहार कळत नाहीं. आपल्या मोठेपणाच्या धुंदींत तो इतरांना तुच्छ लेखीत असतो. या जगांत आपलीं कांहीं कर्तव्यें असतात याचा बहुधा त्याला विसर पडतो. तो नेहमीं काल्पनिक जगांत वावरत असतो. त्याच्या घरीं कपभर चहा मिळणें मुष्कील असलें

तरी तो जनतेकरितां अमृतरसाची पाणपोई उघडून ठेवतो. स्वतःच्या पत्नीकडे तो कोणाला मान वर करून पाहूं देत नसला तरी तो जगाला त्याच्या काल्पनिक प्रणयिनीच्या सहवासांत रमावयास अडवीत नाहीं. काव्यानंदाची चर्चा करीत असतां त्याला आपल्या परीक्षेचें–कर्तव्याचें भान राहात नाहीं. मानवी बंधनें त्याला खुळेपणाचीं वाटूं लागतात. आपल्या मूर्खपणावर तो ज्ञानाचा रंग चढवीत असतो. लोकवस्तीपेक्षां स्मशानें, माळरानें, दऱ्याखोऱ्या हीं त्याला अधिक प्रिय वाटतात. मग अशा कवीं-विषयीं जनतेला तरी प्रेम–आदर कां वाटावा? त्यांच्या कृतीकडे लोकांनीं उपेक्षेनें नव्हे पण तिरस्कारानें पाहिलें तर त्याबद्दल जबाबदार कोण?

बरें! तो कवि आपल्याप्रमाणेंच व्यवहाराच्या गाड्याला जुंपलेला आहे; आपल्यासारख्याच मनोवृत्तीचा आहे; आपल्याप्रमाणेंच संसारांतील सुखदु:खांनीं, हर्षखेदानें व्याकुल होणारा आहे, हें जर त्याला आढळलें तर त्याच्या पूर्व–कल्पनांना फार मोठा धक्का बसतो. आपल्या पुस्तकी कल्प-नांचा फोलपणा प्रत्यक्ष अनुभवानें पटल्यामुळें त्या सर्व कल्पना तो विषा-दानें एकदम गुंडाळून फेकून देतो.

जी स्थिति कवींविषयीं तीच त्यांच्या काव्यांविषयींहि असते. काव्याचे हेतु अनेकांनीं अनेक प्रकारें सांगितलेले आहेत. सर्वमान्य साहित्यशास्त्रज्ञ मम्मट म्हणतो, “ काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतयेसद्यःपर निवृत्तये कांतासंमितयोपदेशयुजे.” काव्यानें यश मिळतें, धन मिळतें, अशुभ गोष्टींपासून रक्षण होतें. काव्यवाचनामुळें व्यवहाराचें ज्ञान होतें, काव्यामुळें आपणांवर आदळूं पाहणाऱ्या अशुभ गोष्टींचें निवारण होतें, काव्यानें उच्च आनंदाचा लाभ होतो, कांता ज्याप्रमाणें रुचेल, पचेल अशा मधुर सौम्य रीतीनें पतीला उपदेश करते त्याप्रमाणेंच काव्यहि करते. इतक्या गोष्टी काव्यामुळें प्राप्त होत असतील तर ज्यांना गणमात्रा जुळवून काव्य–रचना करण्याची हिंमत वाटते, त्यांनीं आपली सर्व शक्ति, सर्व कौशल्य, कविता लिहिण्यांत खर्च करण्याचें ठरविलें, तर तें असमंजसपणाचें

कसें होईल ? काव्य म्हणजे जणु कल्पवृक्ष. वर दिलेल्या गोष्टींशिवाय आणखी अधिक कोणत्या गोष्टींची कल्पवृक्षाकडून तरी अपेक्षा करावयाची ? आणि मग इतक्या गोष्टी देणाऱ्या काव्यकामधेनूची सेवाचाकरी करणें ज्याला शक्य आहे त्यानें ती कां करूं नये ? एवढी काव्याची उपयुक्तता आहे, हें पटल्यावर काव्यदेवता प्रसन्न करून घेण्याकरितां कोणता बुद्धि असलेला माणूस झटून प्रयत्न करणार नाहीं ?

असा प्रयत्न करणारे कविवर व त्यांचें भक्तमंडळ काव्य–परिणामाचे गोडवे गाऊं लागतात. काव्यानें मिळणाऱ्या उपरिनिर्दिष्ट गोष्टींविषयीं प्रत्यक्ष अनुभवानें कवींची पूर्ण निराशा झाली, तरी आपल्या काव्यरसगंगेचें महत्त्व तें दुसऱ्याच्या मनावर ठसविण्याचा सारखा प्रयत्न करीत असतात. ' काव्यानें संसृतिबंधन तुटतें. त्यामुळें भगवंताचा साक्षात्कार होतो. तें अखिल मानव जातीवर प्रेम करावयाला शिकवितें. त्यानें देशाभिमान जाग्रत होतो. मनुष्याच्या हृदयांतील कोमल भावनांचा त्यामुळें विकास होतो. अमुक हितप्रद गोष्ट त्यानें होत नाहीं असें नाहीं. काव्यानेंच मानवी संस्कृति जिवंत ठेवली आहे. फार काय त्यानेंच माणसाला मानवत्व दिलें आहे.'

ही जाहिरातबाजी जितकी अनावर होते तितकीच तिची प्रतिक्रियाहि बेसुमार होते. " कालिदास हा कविकुलगुरु आहे. जर्मन महाकवि गटे त्याचें शाकुंतल डोक्यावर घेऊन नाचला " असें एकानें म्हणतांच दुसरा त्याला उत्तर देतो, " दरमहा ५०–७५ रुपये मिळविण्याकरितां संस्कृतभाषेच्या ज्ञानाची पाणपोई उघडणाऱ्या दोनचार अध्यापक–प्राध्यापकांशिवाय माझ्या लाख वस्तीच्या गांवांत दुसऱ्या कोणींहि शाकुंतलाचें पान उघडलेलें नाहीं." " शेक्सपिअरची योग्यता सर्व ब्रिटिश साम्राज्यापेक्षां मोठी आहे " असें एकानें म्हणतांच ज्यांच्या जोरावर ब्रिटिश साम्राज्य टिकलें आहे, त्या कामगार–शिपाई लोकांकडे बोट करून दुसरा म्हणतो, " शब्दच्छल करणाऱ्या भाषेच्या मूठभर अभ्यासकांपेक्षां इतरांना

या ब्रिटिश साम्राज्याच्या आधारस्तंभांना तुमच्या शेक्सपिअरची काय कदर वाटते, तें विचारा ना जरा !"

क्रियेला योग्य प्रतिक्रिया झाली हें आपण गृहीत धरलें तरी काव्याच्या उपयुक्ततेविषयीं इतक्या भरमसाट अपेक्षा कां निर्माण झाल्या हा प्रश्न मनांत आल्याशिवाय रहात नाहीं. काव्याची इतकी अपरिहार्य उपयुक्तता आहे हें सर्वसामान्य जनतेनें दीर्घ काल मुकाट कां मान्य केलें ? पूर्वी गद्य लिहिण्याचा फारसा प्रघात नव्हता. जें लिहावयाचें तें बहुधा पद्यमयच लिहावयाचें. यामुळेंच पद्यरचनेचे एवढे गोडवे गाईले गेले कीं याचें दुसरें कांहीं कारण असणें शक्य आहे !

एक गोष्ट पहिल्यानें लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ह्या ज्या विलक्षण अपेक्षा काव्यापासून केलेल्या आहेत त्या आमच्याकडेसच विशेषत्वानें प्रचलित आहेत. इतर देशांत काव्याची इतकी विलक्षण उपयुक्तता मानलेली सहसा दिसत नाहीं.

आपण जर या गोष्टीचें मूळ शोधूं लागलों तर जरा विचारानें तें आपल्या सहज लक्षांत येईल. वाल्मीकि–व्यास हे आमचे आद्यकवि. आणि काव्याच्या उपयुक्ततेविषयीं आमच्या ज्या भरमसाट अपेक्षा निर्माण झाल्या आहेत, त्याचें मूळ कारण त्यांच्याकडून घडलें आहे. विशेषतः तें व्यासाकडून घडलें आहे.

रामायण–महाभारत हे काव्यग्रंथ पहिल्यानें प्रामुख्यानें आमच्यासमोर आले. या काव्य–ग्रंथांनीं आम्हांला त्यांचें महत्त्व तर पटवून दिलेंच पण त्यांच्यामुळेंच काव्याच्या श्रेष्ठत्वाविषयींहि आमच्या कल्पना विलक्षण बनल्या. विशेषतः महाभारतानेंच आमच्या मनांत काव्याच्या उपयुक्ततेविषयीं अफाट अपेक्षा निर्माण केल्या.

महाभारत हें काव्य आहे हें निर्विवाद असलें तरी त्याचें मोल तो एक तत्त्वग्रंथ आहे याच दृष्टीनें अधिक आहे. श्रीव्यास हे अलौकिक प्रतिभासंपन्न कवि तर होतेच पण कवीपेक्षां दिव्य दृष्टीचा तत्त्वज्ञ म्हणूनच

त्यांना अधिक मानावयास पाहिजे. आपलें तत्त्वज्ञान ऐतिहासिक कथानकाच्या आधारें, आपल्या उज्ज्वल प्रतिभेच्या साहाय्यानें, अशा काव्यमय रीतीनें त्यांनीं लोकांना शिकविलें कीं, महाभारत हा तात्त्विकग्रंथ आहे याची आम्हांला ओझरतीहि कल्पना येऊं नये. त्यांतील जो भाग तात्त्विक होता तो भाग प्रसंग–चातुर्यानें त्यांनीं निरनिराळया व्यक्तींच्या तोंडी घालून संभाषणद्वारें मोठया कौशल्यानें वर्णन केला आहे. ह्यांतील तात्त्विक क्लिष्टता मोठया चतुराईनें त्यांनीं कमी केली आहे. गीता कृष्णाच्या तोंडीं घातली. अनुशासनपर्व भीष्माकडून वदविलें. राजनीति सांगण्याचें काम विदुराकडे दिलें. नारद–धौम्य यांना निरनिराळया प्रसंगीं उपदेशकांची भूमिका दिली. दिव्य दृष्टि देऊन संजयाला युद्धवर्णन करण्यास सांगितलें; यांतील कौशल्य तर विलक्षण आहे. आणि एवढें सर्व भारत लिहूनहि त्यांनीं आपली तटस्थाची भूमिका क्षणभरहि चळूं दिली नाहीं.

जगांतील दुसऱ्या कोणत्याहि काव्यग्रंथामध्यें महाभारतासारखें सर्वंकष तत्त्वज्ञान आढळत नाहीं. आम्ही नेहमीं म्हणतो, "व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम् !" याचा अर्थ असा कीं महाभारतामध्यें आलें नाहीं असें नवीन कांहींच असणें शक्य नाहीं. आम्ही हे उद्गार केवळ आंधळया अभिमानानें काढीत नाहीं. महाभारत हा तात्त्विक ग्रंथ आहे, तो दिव्यग्रंथ आहे, तो इतिहास आहे, त्यांत अद्भुतता आहे, त्यांत विवाद्य सामाजिक प्रश्नांची सांगोपांग चर्चा आहे, त्यांत नवविचारांचा शाश्वत झरा असा तात्त्विक ग्रंथ–गीता आहे आणि विशेष हें कीं, महाभारत हा एक अत्यंत मनोरंजक काव्यग्रंथ आहे. श्रीव्यासांनीं आपल्या दिव्य प्रतिभेच्या साहाय्यानें या सर्व गोष्टी अशा रसाळपणें वर्णिल्या आहेत कीं, महाभारत हा एक काव्यग्रंथ आहे, व श्रीव्यास हे एक फार थोर कवि होते, एवढेंच आमच्या लक्षांत राहातें.

या दिव्य काव्यग्रंथाच्या दर्शनानें काव्याच्या उपयुक्ततेविषयींच्या कल्पना आम्हीं अफाट बनविल्या. महाभारतानें जितक्या विविध गोष्टी

आम्हांस दाखविल्या तितक्याच इतर काव्यग्रंथांनींहि दाखविल्या पाहिजेत असें आम्हांला वाटूं लागलें. हातांत येणाऱ्या प्रत्येक काव्यग्रंथानें आमच्या कल्पना फोल ठरत गेल्या तरी भावी आशेवर आमचीं मनें तरंगूं लागलीं. आणि काव्याची उपयुक्तता ठरवितांना अजूनहि त्याच कल्पनांचा निकष आम्ही काव्यग्रंथांना लावूं पाहतों. दुसऱ्या कोणत्याहि देशामध्यें काव्या-संबंधीं एवढ्या बेसुमार अपेक्षा नाहींत. याचें कारण त्यांच्यासमोर महा-भारतासारखा अलौकिक, दिव्य काव्यग्रंथ प्रथमदर्शनींच काय पण केव्हांच आला नाहीं हें आहे.

हातांत येणाऱ्या कोणत्याच काव्यग्रंथानें हा काव्यहेतु सफल होत नाहीं असें पुढें लोकांच्या प्रत्ययास येऊं लागलें; इतकेंच नाहीं तर काव्याचा बहुतेक प्रवाह शृंगाराकडेच वाहात जाऊं लागला आहे असेंहि त्यांना दिसूं लागलें. काव्य आणि गायन यांचा फार निकट संबंध असल्यामुळें व कांहीं काव्य–गीतांचा गायक–गायिकांनीं गातांना उपयोग करावयास सुरवात केल्यामुळें, मनुष्य वैतागानें "रंडागीतानि काव्यानि" असें म्हणूं लागला. हे विषादाचे उद्गार अपेक्षाभंगामुळें निघालेले होते. काव्यांत अतिशयोक्ति हा अलंकार आहे. काव्याच्या उपयुक्ततेविषयीं वर्णन करितांना काय किंवा अनुपयुक्ततेविषयीं उद्गार काढतांना काय याच अलंकाराचा लोक उपयोग करूं लागले. क्रियेला तितक्याच जोराची प्रतिक्रिया झाली. पुढें ही स्थिति पालटली व काव्यापासून सौम्य, पचतील अशा आपापल्या मनोवृत्तींप्रमाणें निरनिराळ्या अपेक्षा माणसें बाळगूं लागलीं. या अपेक्षांचें दिग्दर्शन मागील लेखांत सविस्तर केलें आहे.

प्रत्येक व्यक्ति आपल्या अपेक्षेचें समर्थन करण्याचा प्रयत्न करीत असते. मनोवृत्तीप्रमाणें म्हणजेच पर्यायानें मनोविश्वाप्रमाणें ह्या अपेक्षा असतात. वादानें ह्या अपेक्षा सहसा बदलत नाहींत; कारण वादामुळें मनोविश्व बदलणें कठिण असतें. तरीपण तात्त्विक चर्चेनें परस्परांचीं मतें कळून भलत्याच अभिनिवेषाला मर्यादित स्वरूप प्राप्त होतें. आपल्या

मताभिमानाच्या धुंदींत प्रतिपक्षावर तीव्र शाब्दिक प्रहार करण्याची अगर वैयक्तिक उखाळ्या-पाखाळ्या काढण्याची प्रवृत्ति कमी होते व हा प्रामाणिक मतभेद आहे असें वाटूं लागतें. त्यामुळें साहजिकच मनुष्य दुसऱ्याच्या मताकडे सहिष्णुत्वानें पाहूं लागतो.

काव्यापासून ह्या ज्या अपेक्षा केल्या जातात त्यांच्या मूळाशीं आपल्या आवडत्या तत्त्वज्ञानाचें अगर भावनांचें प्रतिपादन व्हावें, त्यांचा प्रचार–प्रसार व्हावा ही वृत्ति असते. आपल्याला जें रुचत नाहीं त्याचा तीव्र निषेध व आपल्याला जें पाहिजे आहे त्याचें दिलखेचक विवेचन त्यांत पाहिजे असें प्रत्येकाला वाटत असतें; एवढेंच नाहीं तर त्याप्रमाणें परिणामहि घडून यावयास पाहिजे अशी त्याची अपेक्षा असते. थोडक्यांत स्पष्ट सांगावयाचें तर काव्य हें मतप्रतिपादनाचें व मत–प्रसाराचें साधन होय अशी समजूत करून घेऊन पुष्कळ लोक काव्याकडे पहातात असें म्हणणें भाग पडतें. हें विधान वाचतांच कांहींजण एकदम भडकतील; पण जरा शांतपणें विचार केला तर अशी अपेक्षा आपण करितों हें त्यांना आपल्या मनाशीं निर्विवाद कबूल करावें लागेल.

काव्यप्रकार हें मतप्रकाराचें साधन कितपत होऊं शकेल ? मतप्रतिपादन करून आपल्या आवडत्या गोष्टींचा प्रसार करितांना मनुष्याला दुसऱ्या व्यक्तीच्या विचारशक्तीला चालना द्यावयाची असते. भावनेपेक्षां बुद्धीला, हृदयापेक्षां मेंदूला त्याला आपलीं मतें पटवून द्यावयाचीं असतात. भावना जागृत करून, हृदयाला डिंवचून तो जागृतीचें कार्य करणार नाहीं असें नाहीं, पण तसें करण्याकरितां त्याच्या पद्धतींत विलक्षण आवेश व आवेग पाहिजे. अत्यंत तीव्रतेनें हल्ला करून अयोग्य वाटणाऱ्या मतप्रणालीचा धुव्वा उडवून, हितप्रद मतें मनुष्याला पटवून देण्याचा त्यानें प्रयत्न केला पाहिजे. प्रसंगीं योग्यायोग्य कारणांची शांतपणें पण आकर्षक भाषेत

चर्चा करावयास पाहिजे. आणि मला वाटतें या तऱ्हेचें कार्य व्हावयाला गद्य–प्रकारच योग्य आहे; काव्यप्रकार अपेक्षित फल देणारा होणार नाहीं.

काव्य हें कलाकुसरीचें काम आहे. त्यांत अनेक बंधनें पाळावयाचीं असतात. गद्याशीं तुलना करितां काव्यवाङ्मयाचीं बंधनें कितीतरी अधिक वाटतात. लगाम असलेल्या घोड्याला उघड्या माळरानावरहि चौफेर उधळतां येणें कठीण आहे. ठराविक चाकोरीनें, पुढेंमागें, आजूबाजूला पहात पद्याला चालावें लागतें आणि असें चालत असतांना त्याला कलेच्या तालावर अत्यंत जपून पावलें टाकावयाचीं असतात. मग मतप्रसाराला हवा असलेला आवेश गद्य–वाङ्मयाइतका पद्यवाङ्मयामध्यें पूर्णतेनें न आढळला तर तें दोषास्पद होईल काय ? इतकी कसरत करीत असतां तो साध्य झाला तर नको कोण म्हणेल ? पण तें कितपत शक्य आहे ? आजपर्यंत जागृतीचें अगर अपेक्षित गोष्टी मनावर बिंबविण्याचें कार्य गद्यवाङ्मयाच्या आधारानेंच निरनिराळ्या थोर व्यक्तींनीं केलें आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पद्याचा आधार त्यांनीं फारसा घेतलेला नाहीं.

काव्य हें नृत्यांगनेच्या पदविन्यासासारखें असतें. हलवा तयार करणाऱ्या बोटांचा हलुवारपणा त्यांत असतो. वीणेच्या झंकारांतील नियमित कंपन त्यांत असतें. असें असतां त्यानेंच लाथ मारून पाणी काढणें, थप्पड मारून डोळ्यांपुढें काजवे चमकविणें अगर त्याला तुतारी म्हणून त्याच्या कर्णकर्कश स्वरांनीं दिग्भाग दणाणून सोडणें, कसें शक्य व्हावें ! नाजूक शस्त्रक्रियेच्या अमूल्य हत्यारांचा भाजी चिरण्याकरितां उपयोग करितां येणार नाहीं असें नाहीं, पण तें कितपत युक्त होईल ! कोणत्या समंजस माणसाला तें रुचेल ? फुलांचा मारा करून प्रबल शत्रूला नामोहरम करणें कसें साधेल ? मदनाशिवाय कोणीहि फुलांचे बाण फेकण्याचें व अपेक्षित गोष्टी साधण्याचें आजपर्यंत मनांत आणलें नाहीं.

गद्यवाङ्मयाला पुरुष म्हटलें तर पद्यवाङ्मयाला स्त्री म्हणतां येईल.

पौरुष हें पुरुषाचें भूषण, कोमलता हें स्त्रीचें भूषण. कवितेला स्त्रीप्रमाणेंच नटण्यामुरडण्याची आवड असते. दागिन्यांनीं शरीर भूषविण्याचें दोघींनाहि वेड असतें. दोन्ही लचकत-मुरडत चालतात. त्यांच्याकडून शतकानुशतकें आमच्या मनावर जुलूम करणाऱ्या रूढीराक्षसीला ठार मारण्याचें काम कसें होईल ? सामाजिक अन्यायावर प्रहार करण्याचें काम त्यांच्याकडून किती आवेशानें होईल ? रेशमाची गांठ फार घट्ट बसते म्हणून मदोन्मत्त हत्तीला रेशमानें बांधून ठेवण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद होणार नाहीं काय ? आतां कांहीं रशियन स्त्रियांप्रमाणें पौरुषगुणांनीं युक्त ललना आढळणार नाहींत असें नाहीं, तरी पण त्यांची संख्या व बल हीं अत्यंत मर्यादितच राहातील !

गद्याशीं तुलना करितां काव्यें हीं पक्वान्नांप्रमाणें मानलीं पाहिजेत. गद्याच्या भातभाकरीपेक्षां पक्वान्नांची योग्यता आपण खूप मोठी मानीत असलों तरी आपल्या रोजच्या जेवणाला आपणांला भात-भाकरीच पाहिजे. सणावारींच आपण पक्वान्नांचा उपयोग करितों. पाहुणा आल्यास आमची समर्थता दाखविण्याकरितां आम्ही पक्वान्न करितों, पण म्हणून त्याची उपयुक्तता भात-भाकरीसारखी व भातभाकरीइतकी आपण मानीत नाहीं.

काव्यापासून केलेल्या अपेक्षा साध्य होत असल्या तर त्या होऊं नयेत असें कोणीच म्हणणार नाहीं हें पुन्हा सांगूनहि मी म्हणतों कीं, अशा मतप्रसाराबद्दच्या अपेक्षा साध्य होणें बरेंच कठीण आहे. काव्याचा मुख्य हेतु प्रचाराचा नाहीं.

काव्याचा मूळ हेतु आनंद देण्याचा, मनोरंजन करण्याचा आहे. त्यांच्या उपयुक्ततेची किंमत ठरविण्याचें साधन नाहीं हें मागें आलेंच आहे; पण अनेक अत्यंत उपयुक्त गोष्टींपेक्षांही आनंदप्राप्तीचें महत्त्व फार मोठें आहे. कित्येक उपयुक्त गोष्टी आनंदप्राप्तीच्या आशेनें अगर मनोरंजनानंतर प्राप्त होणाऱ्या उत्साहानें आम्हांला मिळवून दिल्या आहेत.

सारांश, आपण सुखानंद प्राप्तीकरितां जी दगदग सहन करीत असतों, जो त्रास भोगीत असतों, सतत जी धडपड करीत असतों, ती धडपड न करितां, तो त्रास भोगावा न लागतां, ती दगदग सहन करण्याची पाळी न येतां, दिवसभराच्या श्रमानें थकलों असतां, आधिव्याधींनीं जर्जर झालों असतां, निराशेनें निस्तेजून विषण्ण बसलों असतां, सहज रीतीनें क्षणभर का होईना, काव्यवाचनानें दुःखाची विस्मृति होते व मनाला निरागस आनंदाची प्राप्ति होते. हाच कवितेचा मुख्य उपयोग आहे. इतर अपेक्षा साध्य होत असतील तर दुधांत साखर पडेल, पण त्या न साध्य झाल्या तरी ह्या उपयुक्ततेचें मोल कोणत्याच प्रकारें कमी ठरणार नाहीं.

# काव्य–कलेची उपासना ६

" आणि शिकवोनी काय कवी होतो ?"—चंद्रशेखर.

" Poets are born, not made." शेक्सपिअर.

पूर्वकाळीं काव्याकडे पहावयाचा जो दृष्टिकोन होता, तोच दृष्टिकोन हल्लीं राहिलेला नाहीं. पूर्वी काव्याकडे नीति अगर सत्य यांच्या चष्म्यांतून पाहिलें जात असे; शक्य तों काव्याचा संबंध ईश्वराकडे अगर त्या काळच्या प्रचलित धर्मतत्त्वाकडे पोंचविला जात असे. मनुष्य–स्वभाव शृंगारप्रिय असल्यामुळें त्या वेळेसहि शृंगारपर–उत्तानशृंगारपर कविता लिहिली गेली; पण तसलीं काव्यें ईश्वरविषयक कल्पनांचा बुरखा घालून बाहेर पडत असल्यामुळें जनता त्यांच्याकडे निराळ्या दृष्टीनें पाहत असे. हल्लीं काव्याकडे कलेच्या दृष्टीनें पाहिलें जातें. त्यामुळें पूर्वीपेक्षां काव्याचें क्षेत्रहि आतां बरेंच विस्तृत झालें आहे.

कोणत्याहि कलेंत पारंगतता मिळवावयाची असल्यास एकनिष्ठपणें त्या कलेची सेवा केली पाहिजे. नैसर्गिक गुणांचा विकास होण्यास शिक्षणाची किती जरूरी आहे हें नव्यानें सांगावयास नको. कोणत्याही कलेकडे नैसर्गिक प्रवृत्ति असली तरी ती कला हस्तगत करून घेण्याकरितां कलाप्रिय माणसानें सतत प्रयत्न करावयास पाहिजे.

एकादा सुंदर विणकामाचा नमुना अगर छानदार नकसकाम पाहून आपणांस आनंद होतो. कारागिराच्या कलाकुशलतेची आपण मोकळ्या मनानें प्रशंसा करूं लागतो. पण कलेंत प्राविण्य मिळविण्याकरितां त्या कारागिरानें किती वर्षें सतत प्रयत्न केला असेल हा विचार आपण बहुशः करीत नाहीं. गोड गळ्याची देणगी ईश्वरदत्त असते. मधुर स्वर कानावर आले म्हणजे मनाला आनंद होतो, पण त्या स्वरांनाच ताल आणि साथ यांची बरोबर जोड मिळाल्यास त्यांपासून होणारा आनंद मधुरतर असतो.

भावोद्दीपक गाणें गावयाचें असल्यास गायनशास्त्राविषयीं ज्ञान असावयास पाहिजे. शोकरसाचें अगर करुणरसाचें एकादें गीत झंपा तालांत म्हटल्यास गाणारा कितीहि चांगला असला तरी प्रेक्षकांच्या हृदयांत अनुकूल भाव उत्पन्न होणार नाहींत. त्या प्रसंगीं बिचाऱ्या प्रेक्षकांना हसावें कीं रडावें हेंच कळणार नाहीं. अतिशय चपल असणाऱ्या माणसानें नृत्यकला मी एका क्षणांत साध्य करीन असें म्हणून नाचावयास सुरवात केल्यास प्रथमप्रसंगीं तरी विदूषकाकडून ज्या प्रकारची करमणूक होते त्याच प्रकारची करमणूक प्रेक्षकांची होईल. मोत्यांच्या दाण्याप्रमाणें चांगलें अक्षर सुरवात केल्याबरोबर काढतां येत नाहीं; तसें तें काढतां येण्यास कित्येक वर्षें कित्ता गिरवावा लागतो.

अचूक नेम मारणें ही सतत व्यासंगानें साध्य होणारी एक कला आहे; पण तिचेहि अनेक प्रकार आहेत. प्रथमच बंदूक हातांत घेऊन मी निशाणाचा पहिल्याच गोळीनें वेध करीन असें अर्जुनासारख्या धनुर्धाऱ्यालासुद्धां म्हणतां येणार नाहीं; याच्या उलट तिरकमठ्यांतील खड्यानें भिरभिरणारें पाखरूं खालीं पाडणाऱ्या निशाणबाजालाहि चेंडू नेमका फेंकून क्रिकेटचे स्टम्प्स् उडवितां येणार नाहींत. ज्यानें ज्या गोष्टीचा अभ्यास केला असेल तीच त्याला साध्य होईल. तत्सम दुसरी कलाहि अभ्यासाशिवाय साध्य होणार नाहीं. प्रयत्न केल्यावर मात्र या असल्या लोकांना इतरांपेक्षां त्या कलांत लवकर प्राविण्य मिळवितां येईल एवढेंच.

यावरून हें लक्षांत येईल कीं, कोणतीही कला साध्य करून घ्यावयाची असल्यास कष्ट करावयास पाहिजेत. आतां काव्याकडे जर कलेच्या दृष्टीनें पहावयाचें तर प्रारंभीं दिलेल्या विधानांत सत्यांश किती, अशी शंका येते. काव्यसुद्धां इतर कलाप्रमाणें प्रयत्नसाध्य आहे काय, असा प्रश्न ओघानेंच उत्पन्न होतो.

भावानुकूल भावना वाचकांच्या अगर श्रोत्यांच्या अंतःकरणांत उत्पन्न व्हाव्या अशी कवीची इच्छा असते. अर्थातच कवितेची रचनाच अशी

व्हावयास पाहिजे कीं, वाचकांचें अगर श्रोत्यांचें लक्ष तिजकडे वेधेल. शब्दांना काव्याचें शरीर समजतात. हृदयस्थ सौंदर्यापूर्वी जनतेचें नेहमीं बाह्य सौंदर्याकडे लक्ष जातें, कारण प्रथम तेंच दृष्टीस पडतें. रसिकांची वृत्ति तल्लीन करावयाची असल्यास, काव्याचें बाह्यसौंदर्य-शरीर मोहक असलें पाहिजे. काव्याचें शरीर आकर्षक होण्याकरितां शब्दांची योजना चतुराईनें झाली पाहिजे. एकाच अर्थाचे अनेक शब्द पुढें असतात. त्यांतून रसाला व भावनेला अनुकूल असे शब्द निवडावयाचें काम बरेंच कठीण आहे. शब्दांचें सूक्ष्म ज्ञान असल्याखेरीज ही गोष्ट साध्य होणार नाहीं. रसानुकूल शब्दांची रचना करण्याचें कौशल्य नैसर्गिक असतें असें मानिलें तरी अभ्यासानें तें जर वाढलें नाहीं तर मूळ गुण निष्प्रभ होईल. कवी-जवळ शब्दांचें दारिद्य असल्यास त्याची मूळ प्रतिभा तिच्या दरिद्री वेषांत उदास व खिन्न भासेल. तिचा ओघ एकाद्या महानदीप्रमाणें संथ, गंभीर न भासतां, खडकांनीं वारंवार अडल्यामुळें आक्रोश कर-णाऱ्या एकाद्या नदीनाल्याप्रमाणें वाटेल.

योग्य शब्दांचा उपयोग झाल्यास कविता अतिशय आकर्षक होते. " कसें हाकारूं-शीडाविण दुर्बल तारू " या बालकवींच्या कवितेंतील दुर्बल हा शब्द काढून त्याच्या ठिकाणीं विनायकांनीं ' दुबळें ' हा शब्द घातला. नवीन बनलेली ओळ पहिल्या ओळीपेक्षां किती मधुर आहे हें रसिकांना सांगावयाची जरूर नाहीं. शब्दांचा बिनचूक उपयोग करण्यास मला पंतांनीं शिकविलें म्हणून विनायक नेहमीं म्हणत असत. शब्दांची योजना भावोत्कर्षक करावयाची असल्यास अभ्यासाची किती जरूरी आहे हें या एका उदाहरणावरून स्पष्ट होईल. कवितेची रचना करितांना शब्दांबरोबर कवीनें चालीचाहि विचार करावयास पाहिजे. भावनेला अनुकूल अशी चाल निवडल्याशिवाय कवितेचा अन्तःकरणावर परिणाम होणार नाहीं. याकरितां रसानुकूल वृत्तें कोणतीं याचेंहि कवीस ज्ञान हवें. वीररसाला रडकी चाल व श्रुतिमनोहर शब्द, शृंगाराला कटु कर्णकठोर

शब्द व विलक्षण घावतें वृत्त काय उपयोगाचें ? शोकरसाला हृदयाला पीळ पाडणाऱ्या शब्दाबरोबर भावना थरारून सोडणारें वृत्तहि पाहिजे.

बाह्यांगानंतर अंतरंगाच्या सौंदर्याकडे वळावयाचें. कवितेंतील मूळ विचार, अगर मुख्य कल्पना याला कवितेचें अंतरंग म्हणतां येईल. नवीन कल्पना अगर विचार प्रतिभेच्या साहाय्यामुळें अंतःकरणांत उत्पन्न होत असतील तरी त्याला दृश्य स्वरूप कसें द्यावयाचें हा कवीपुढें प्रश्न असतो. कल्पना व विचार पुष्कळांना सुचतात, पण त्या सर्वांना ते व्यक्त करतां येतातच असें नाहीं. कांहींना व्यक्त करतां आले तरी ते आकर्षक रीतीनें व्यक्त करतां येणें कठीण जातें. याच्या उलट मूळ विचार अगर कल्पना दुसऱ्याकडून घेतलेली असूनहि कांहीं कवि इतक्या आकर्षक रीतीनें ती पुढें मांडतात कीं ती पुष्कळदां नवीन व सुरम्य भासते. शेक्सपिअरनें आपल्या बहुतेक नाटकांकरितां जुनीं कथानकें घेतलीं आहेत. कालिदासाला मेघदूताची कल्पना रामायणांतील मारुतीच्या कथेवरून सुचली आहे; शाकुंतलाची मूळ कल्पना त्यानें महाभारतांतून घेतली आहे. पण त्यावर उभारलेलीं त्यांचीं काव्य–मंदिरें इतकीं सुंदर व भव्य झालीं आहेत कीं, तीं जगाच्या अंतापर्यंत टिकावीं व रसिकांना प्रतिक्षणीं त्यांत नवें सौंदर्य प्रतीत व्हावें !

निरनिराळ्या काव्यांतील मूळ विचाराकडे अगर कल्पनेकडे दृष्टी फेकल्यास आपणांस असें आढळून येईल कीं, त्या कल्पनेंत अगर विचारांत फारसें नाविन्य नाहीं; पुष्कळदां तर काव्याची मुख्य कल्पना अगर विचार ज्या प्रसंगावर अधिष्ठित असतो तो प्रसंग सर्वांच्याच परिचयाचा असतो. पण त्या प्रसंगाचें रेखाटण कवीकडून इतक्या कौशल्यानें होतें कीं, त्यानें रसिकांच्या हृदयाला गुंगवावें. कांहीं सुंदर गीतें घेऊन आपणांस यासंबंधीं अधिक स्पष्टीकरण करितां येईल.

गडकऱ्यांच्या राजहंस व मुरली या सर्वमान्य अत्युत्तम गीतांतीले मूळ कल्पना सर्वांना ठाऊक अशा आहेत. ‘ एकुलत्या एका मुलाच्या मृत्यूबद्दल एक विधवा माता शोक करते ’ ह्या परिचित कल्पनेवर पहिलें काव्य

रचलें गेलें आहे व राधा-कृष्णाच्या शृंगार-वैराग्यभावनावर दुसऱ्याची गुंफण गुंफिली गेली आहे. दोघांहि काव्यांच्या मूळ कल्पना परिचित असूनहि त्यावर रचिलेलीं हीं गीतें वाचकांना वेड लावितात. बालकवींचा निर्झर म्हणजे कित्येकदां आपण पाहिलेला डोंगराळींतून वाहाणारा झरा. पण त्या निर्झराचें बालकवींनीं रेखाटण केल्यावर तो रसिकांना मोहवितो. केशवसुतांच्या तुतारींतील कित्येक विचार आगरकरांनीं केशवसुतांपूर्वी जनतेपुढें मांडले होते. वास्तविक पाहिलें तर केशवसुतांची तुतारी म्हणजे आगरकरांच्या सुधारणावादाच्या रणभेरीचे पडसाद. पण केशवसुतांची भेदक रीति हृदयाला पीळ पाडते व रसिकांना तें एक सुंदर गीत वाटतें.

संस्कृत नाटकांतील बऱ्याच नाटकांचीं कथानकें महाभारत-रामायण यांवरून घेतलीं असलीं तरी कवींच्या कौशल्यामुळें त्या कथांना सर्वप्रियता व चिर-सौंदर्य लाभलें आहे. यावरून हें लक्षांत येईल कीं, मूळ कल्पना अगर विचार जुना किंवा चिरपरिचित असला तरी कवीच्या कौशल्यानें तो नवीन व मधुर भासतो, व म्हणून काव्यांतील अगर लिखाणांतील मूळ कल्पनेपेक्षां ती कल्पना रेखाटण्यांतच लेखकाचें खरें कौशल्य असतें. ही कला ज्याला चांगली साधली आहे तो मनुष्य प्रतिभासंपन्न मानला जातो. हातीं घेतलेला विषय रेखाटण्याचें हें कौशल्य संवयीनें व अभ्यासानें वाढतें. कोणत्याही नामांकित कवीच्या प्रथमावस्थेंतील कवितांत आणि नंतरच्या कवितांत ठळक फरक आढळतो याचें कारण हेंच आहे. प्रथमावस्थेंत धडपडणारी, खळखळत वाहाणारी, कोठें कोठें अडल्यामुळें आक्रोशानें ओरडणारी काव्यनदी पुढें संथपणें गंभीरतेनें वाहातांना दिसते. अभ्यासानें कवितेचें अंतरंगहि बाह्यांगाप्रमाणें मधुरतर करितां येतें हें यावरून मान्य व्हावयास हरकत नाहीं.

म्हणून एखाद्याला प्रतिभेची देणगी जरी परमेश्वरानें दिली असली तरी तिच्यावर संस्कार व्हावयास पाहिजेत. खाणींतून हिरा काढला तरी त्या हिऱ्याची त्याच्या नैसर्गिक अवस्थेंत किंमत कळत नाहीं व त्याचें तेजहि

गारगोटीप्रमाणें वाटतें. काचमणीहि त्यापेक्षां जास्त तेजस्वी व आकर्षक भासतात. पण त्या हिऱ्याला पैलू पाडल्यावर मात्र त्याची किंमत व तेज अनंत पटीनें वाढतें. प्रतिभेच्या बाबतींतही असेंच म्हणतां येईल. तिच्यावर संस्कार न झाल्यास तिच्यांतील चमक व तेज दृष्टीस पडणार नाहीं व एखाद्या रत्नपारख्याला तें तिच्यांत असल्याचें प्रत्यंतर आलें तरी तें त्याला अंधुक व अस्पष्ट असेंच आढळेल.

याच्या उलट प्रतिभेची देणगी नसूनही मनुष्य काव्यरचना करूं शकतो. पण असल्या काव्यांत प्रतिभेचा स्फुल्लिंग आढळणें शक्य नसतें. त्यामध्यें तळमळ नसते. हृदयाचा या रचनेशीं संबंध नसतो. ती फक्त शाब्दिक करामत असते. अशा प्रकारची कविता रचनेच्या दृष्टीनें ठीक असली तरी ती टिकत नाहीं. राजे–महाराजे यांच्या राज्यारोहणासंबंधीं व पुस्तकांच्या अर्पणपत्रांसंबंधीं केलेल्या शब्दांच्या कसरतीनें हें स्पष्ट होईल. असल्या रचनाकाराला कवीच म्हणतां येत नसल्यामुळें त्या विषयीं जास्त विचार करण्याची जरूर नाहीं; फक्त एवढेंच म्हणतां येईल कीं, अभ्यासानें तो कवितेचें शरीर बनवूं शकतो, पण प्रतिभेच्या संजीवनीच्या अभावीं त्याला त्या देहांत चैतन्य घालतां येत नाहीं.

यावरून लक्षांत येईल कीं, कवि शिकवून तयार होत नसला तरी शिक्षणाच्या अभावीं त्याची प्रतिभा विकसून फुलणार नाहीं, ती करपूं लागेल. म्हणून अभिजात प्रतिभेचा विकास होण्याकरितांहि शिक्षण मिळा-वयास पाहिजेच, नाहीं तर ती प्रतिभा जनतेच्या डोळ्यांत भरणार नाहीं. 'बऱ्याच दिवसांत कविता लिहिली नाहीं, व्यासंग सुटल्यामुळें अलीकडे लिहिलेल्या दोन कविता कांहींशा ओबड धोबड वाटतात. त्यांत सफाईदार-पणा कमी वाटतो.' असें बालकवींनीं आपल्या एका मित्राला पत्रांतून कळविलें आहे. बालकवींसारख्या प्रतिभासंपन्न कवीलाहि व्यासंगाचा अभाव जाणवतो. मग इतरांनीं त्याला महत्त्व न देऊन कसें चालेल ?

' मी प्रतिभासंपन्न आहे, माझी कल्पनाशक्ति तरल आहे, मला अधिक

अध्ययनाची काय जरूर आहे ? कवि शिकवून तयार होत नाहीं.' असें म्हणून स्वतःच्या मोठेपणाच्या कल्पनेनें वेडे झालेले कांहीं कवि म्हणून मिरविणारे लोक आढळतात. त्यांच्यांत प्रतिभेचा स्फुल्लिंग आढळत नाहीं असें नाहीं. पण स्वतःच्या मोठेपणाच्या भरमसाट कल्पनेमुळें ते इतरांच्या कृतीकडे तुच्छतेनें पाहतात. आपणांस व्यासंगाची कांहीं जरूर आहे असें त्यांना वाटत नाहीं. आपण लिहूं तें बरोबर असलेंच पाहिजे. अगदी काळ्या दगडावरची रेघ अशी त्यांची दृढ समजूत असते. अशा लोकांच्या कवितेकडे निरीक्षक दृष्टीनें पाहिल्यास तींत प्रथमावस्थेंत आढळणारी प्रतिभेची ज्योत हळूहळू क्षीण होत चालल्याचें दिसून येतें. स्वच्छ पाणी असलेल्या विहीरींतून बरेच दिवस पाण्याचा उपसा न झाल्यास तें ज्याप्रमाणें बिघडतें त्याप्रमाणें व्यासंगाच्या अभावीं प्रतिभेची स्थिति होईल.

काव्य स्वतःच्या समाधानाकरितां असेल कदाचित्, पण खरोखर कवीला रसिकांनां आनंदित करावयाचें असतें. रसिकांवाचून काव्याच्या कागदाला अक्षर वळणाकरितां काढलेल्या खर्ड्याइतकीहि किंमत मिळणार नाहीं. अशी स्थिति असतां रसिकांच्या भावनेचा कवीनें विचार करावयास नको काय ? सुंदर विचार असलेलें गीत सुंदर भाषेंत लिहिलेलें असल्यास दुधांत साखर पडल्यासारखें होईल. रत्नाला सोन्याचें कोंदण मिळाल्यानें त्याचें तेज द्विगुणित होईल.

असें जर आहे तर, "तुम्हीं आम्हाला ही 'रि' दीर्घ करा येथें अनुस्वार द्या, अशी वाचाळता करून शास्त्रांचीं बंधनें कां पाळावयास लावितां ?" असें केशवसुतांनीं जरी म्हटलें तरी त्या म्हणण्याला काय किंमत ! रसिकांकरितां जर काव्य गुंफावयाचें तर रसिकांच्या मनोवृत्तीकडे लक्ष दिलेंच पाहिजे.

सारांश, काव्याकडे जर कलेच्या दृष्टीनें पहावयाचें तर इतर कलांप्रमाणें ही कलासुद्धां हस्तगत करून घेण्याकरितां प्रयत्न केला पाहिजे. अंगच्या कौशल्यामुळें अगर नैसर्गिक आवड असेल त्याप्रमाणें कलेंत प्राविण्य

मिळविण्यांत यश येतें. एकाच चित्रकाराजवळ बरोबर अध्ययन करणारे विद्यार्थी सारखेच कुशल चित्रकार होणार नाहींत. द्रोणाचार्यांजवळ शेंकडों विद्यार्थ्यांनीं शिक्षण घेतलें तरी अर्जुनाची सर कोणालाच करितां आली नाहीं; त्याप्रमाणेंच या कलेचेंहि आहे. नैसर्गिक प्रतिभेची देणगी ज्या प्रमाणांत प्राप्त झालेली असेल त्या प्रमाणांत अध्ययन करणारांमध्यें श्रेष्ठ-कनिष्ठ असे वर्ग पडतील. पण त्यानें अभ्यास अगर व्यासंग केलाच पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. प्रतिभा ही दैवी शक्ति असली तरी यक्षिणीची कांडी फिरवितां बरोबर हवें तें घडवून आणण्याची जादुगिरी तींत नाहीं. तिच्याकडून वाटेल तेव्हां हुकमी काव्यालंकार उत्पन्न होणें शक्य नाहीं.

---

चरित्र पाहिजे असल्यास कविता मिळणार नाहींत, कविता हव्या असल्यास चरित्र मिळणार नाहीं. माझें चरित्र इतकें विलक्षण आहे कीं, तें कळल्यावर कोणासहि माझी कविता वाचावयाची इच्छा होणार नाहीं. —विनायक

हल्लीं निरनिराळया कवींच्या पुस्तकांचीं परीक्षणें प्रसिद्ध झालेलीं वाचावयास मिळतात. त्यांत बहुतेक टीकाकार पुस्तकांतील कवितांवरून कवींच्या मनाची ठेवण कशी असावी हें हुडकून काढण्याचा खटाटोप करतांना दृष्टीस पडतात. कवितांमध्यें ज्या भावना व्यक्त झालेल्या असतील त्या भावनांवरून कवीच्या मनोवृत्तींचा कयास केल्यास तो बरोबर असेल काय? चरित्राची मुळींच माहिती नसतां, कवितेमध्यें व्यक्त झालेल्या भावनेचा, कवीच्या शीलाशीं दृढ संबंध असला पाहिजे असा समज करून घेऊन कवीच्या शीलाविषयीं अनुमान करणें योग्य होईल काय? वरील प्रश्न मनांत उद्भवल्यास कवितांवरून कवीच्या मनोवृत्तींचा थांग काढूं इच्छिणारा टीकाकार अगर चौकसबुद्धीचा रसिक क्षणभर तरी स्तब्ध बसल्याशिवाय राहाणार नाहीं.

दत्तांनीं विनायकांकडे कवितांची व चरित्राची मागणी केली असतां, त्यांनीं दत्ताला पाठविलेलें उत्तर प्रारंभीं दिलें आहे. विनायकांचें चरित्र सर्वश्रुत आहे. "कवीचें मन व तो करतो त्या कविता यांचा कांहींच संबंध नसतो काय?" असें विनायकांचे बालमित्र धुळ्याचे देव, विनायकांच्या देशभक्तिपर कविता ऐकून त्यांना म्हणत. स्वसमर्थनार्थ त्यावर विनायक आवेशानें उत्तर देत असत कीं, तसा संबंध नसला तर त्याला आपले भाव सुंदर रीतीनें रेखाटतांच येणार नाहींत. पण त्यांच्या ह्या उत्तरानें त्यांच्या

सहवासांत असणाऱ्या रा. देवांचेंही जर समाधान होणें शक्य नव्हतें तर इतरांचें कसें व्हावें ? त्यांच्या कवितांमध्यें ज्या भावना व्यक्त झालेल्या आहेत, त्यांवरून त्यांच्या शीलाचा अगर त्यांच्या मनोवृत्तींचा विचार केल्यास, त्यांचें आपणांला जें चरित्र माहीत आहे त्यापेक्षां कितीतरी उदात्त व भव्य चरित्रचित्र आपणांस पहावयास मिळेल !

स्मशानांतील गाणें, घुबड, वीरमरणाचें गाणें वगैरे भेसूर व हृदयभेदक गीतें गाणारे गोविंदाग्रज अत्यंत भित्रे होते. मध्यरात्रीं प्रेक्षकांना व रसिकांना स्मशानांत नेणाऱ्या गोविंदाग्रजांच्या अंतःकरणाचा, गजबजलेल्या शहरांतील रस्त्यानें रात्रीं जातांना थरकांप होत असे. एकदां नाटक पाहून परत घरीं जातांना भीति वाटत होती म्हणून नाक्यावरच्या शिपायाला दगड मारून त्याला आपल्या मागें घरापर्यंत पळवीत आणून सोबत केल्याबद्दल त्याचे गडकऱ्यांनीं आभार मानल्याचें प्रसिद्धच आहे. असले गडकरी मध्यरात्रीं स्वप्नांतसुद्धां स्मशानांत जावयास धजतील काय ? रसिक वाचक त्यांच्या पाठराखणीला असले तरी ते असलें धाडस करणार नाहींत. सरकारच्या नुसत्या भीतीनें त्यांनीं त्यांचें ‘ गर्वनिर्वाण ’ हें नाटक जाळून टाकलें. जनतेच्या क्षोभाच्या कल्पनेनें आपल्या प्रेम-संन्यासाचा शेवट जाणून बुजून शोककारक केला. गडकऱ्यांच्या कवितेवरून त्यांच्या मनोवृत्तींचा विचार केल्यास ते निधड्या छातीचे, बेछूट आचारविचारांचे बेडर गृहस्थ असले पाहिजेत असेंच अनुमान करावयास पाहिजे.

केशवसुतांची हृदयभेदक व समाजांतील अन्याय तीव्रतेनें जनतेसमोर मांडणारीं गीतें वाचून त्यांना समाजसुधारक म्हणून आगरकरांच्या नजीकच्या खुर्चीवर बसविणारे बरेच रसिक दृष्टीस पडतात. केशवसुत बरींच वर्षें खानदेशांत होते व त्यांचें त्यांच्या पत्नीशीं जें तऱ्हेवाईक वर्तन असल्याबद्दलचें मत इकडे जनतेंत पसरलें आहे, तें त्यांच्यासारख्या समाजांतील कीड नष्ट करूं इच्छिणाऱ्याच्या वर्तनाशीं विसंगत आहे. रेव्हरंड टिळक म्हणजे मुलाफुलांचे कवि; अतिशय हळव्या अंतःकरणाचे. फुलाला सुई

बोंचली तरी त्यांच्या डोळ्यांत अश्रु तरारावयाचे ! पण त्यांनींच आपल्या-करितां रात्रंदिवस तळमळणाऱ्या जीवाविषयीं किती बेपर्वाई दाखविली आहे हें स्मृतिचित्रांवरून दिसून येईल. लक्ष्मीबाईसारख्या कुशल व प्रेमळ पत्नीकडून तें लिहिलें न जातां, जर एखाद्या त्रयस्थाकडून लिहिलें गेलें असतें तर रे. टिळकांविषयींच्या कित्येक रसिकांच्या भावना दुखावल्या गेल्या असत्या.

'रेंदाळकरांची कविता' या काव्यचर्चेमध्यें प्रसिद्ध झालेल्या अनन्त-तनयांच्या लेखांत रेंदाळकरांच्या कवितांतील निरनिराळे उतारे घेऊन, अनन्ततनयांनीं त्यांच्या मनोवृत्तीचें व शीलाचें रेखाटन केलें आहे. प्रत्यक्ष कवीच्या काव्यांतील उतारे दाखवून हा जयद्रथ व हा सूर्य दाखविणाऱ्या श्रीकृष्णाच्या आवेशानें अनन्ततनय छातीवर हात ठेवून विधानें करितात. रेंदाळकरांच्या हीन वैषयिक भावना, कुजकें मन, प्रसिद्धीची अनिवार लालसा वगैरे अनेक जावईशोध लावून त्यांनीं कवीच्या चरित्रावर 'प्रकाश' पाडला आहे. ज्या कवीशीं अनंततनयांचा परिचय होता त्या कवीचें शील ठरविण्याचा प्रयत्न त्याच्या काव्यावरून करण्याची त्यांना काय जरूरी होती ! आपल्यांचे हे जावई–शोध कसे भ्रामक होते, हें रा. नवरे ( कवि नागेश ) या रेंदाळकरांच्या निकटवर्ती मित्रानें दाखविलें आहे.

कवितांवरून कवीचें शील ठरविण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी रा. अनंत-तनयांनीं जर स्वतःच्या दर्पण व सीमोल्लंघन [ हृदयतरंग भाग १ ] ह्या कविता वाचल्या असत्या आणि क्षणभर विचार केला असता कीं, या कवितेवरून एकाद्यानें आपलें चित्र रेखाटलें तर तें कसें होईल तर त्यांनीं 'रेंदाळकरांची कविता' हा लेखच लिहिला नसता. सीमोल्लंघन या कविते-वरून कवीचें जें चित्र रेखाटलें जाईल तें पाहून अनंततनयांना शिसारी येईल. विशिष्ट भावनेच्या भरांत आपण ही कविता लिहिली आहे, तिचा आपल्या मनोवृत्तीशीं नेहमींचा कांहीं संबंध नाहीं असें सिद्ध करण्याचा ते अट्टहासानें प्रयत्न करतील.

तांब्यांची बरीच कविता शृंगारपर आहे. कांहीं कवितांतून उत्तान शृंगारहि दृष्टीस पडतो. त्यांच्या कांही कवितांतील कित्येक ओळी इतक्या भडक वाटतात ( कांहीं लोक त्यांचा परमेश्वराकडे संबंध जोडण्याचा प्रयत्न करतात तें सोडून देऊं ) कीं, हा कवि कांहीं दिवसांपूर्वी महाराष्ट्रांत जन्मला असता तर यानें प्रभाकर, होनाजी बाळ, सगनभाऊ यांच्यावर ताण केली असती असें एकाद्यास वाटल्यास नवल नाहीं. त्या कवितांकडे बोट दाखवून व ' हमे दोजखहि प्यारा है ' या त्यांच्या सदा तोंडीं असलेल्या शब्दांना पुढें करून एकाद्यानें त्यांच्या मनोवृत्तीचें दिग्दर्शन केलें तर...... ! पण त्यांच्या उच्च मनोवृत्तींना बीभत्स शृंगाराचा स्पर्शहि होणें शक्य नाहीं अशी त्यांचा सहवास असणारे त्यांचे निकटवर्ती ग्वाही देतील.

' आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोंहिकडे, ' म्हणून वाङ्मयक्षेत्रांत आनंदानें वेडावून खरोखरच एकाद्या लहान बालकाप्रमाणें नाचणाऱ्या बालकवींचें हृदय व जीवन सुखपूर्ण असावयास पाहिजे. पण या जगांतील त्यांचीं थोडीं वर्षें त्यांना कशीं व्यतीत करावीं लागलीं हें त्यांनीं मोकळ्या मनानें लिहिलेल्या त्यांच्या पत्रांतून आढळून येतें. त्यांचीं पत्रें वाचून डोळ्यांत अश्रु येणार नाहींत असा रसिक क्वचित् आढळेल. ते ' कवीचें अंतरंग ' या कवितेंत लिहितात कीं, सागरांतून शिंपाच बाहेर येतात. मूल्यवान् रत्नें तो झाकून ठेवतो.

" हृद्‌मंजूषीं भाव गुप्त जे भरले जनसंमर्दी-कथील का कधि उच्च रवानें कविहृदयाचा दर्दी ?" म्हणूनच दुःखानें करपलेली बालकवींची हृदयवीणा मधुरपणेंच शक्य तों गात असावी.

परदेशस्थ कवींच्या अगर लेखकांच्या चरित्राचें व कलाकृतींचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास त्यांतहि साम्य आढळेलच असें नाहीं. जनतेसमोर सतेज नवविचार आवेशपूर्ण भाषेंत मांडणाऱ्या व तिला नवीन मार्ग दाखविणाऱ्या विद्वानांच्या कलाकृतींचा मेळ त्यांच्या चरित्रांशीं जुळेलच असें नाहीं. बेकन, रूसो या तत्ववेत्त्यांच्या सुंदर ग्रंथांचें त्यांच्या चरित्राशीं

किती साम्य आढळेल ? शेक्सपिअर तर निष्णात धंदेवाईक होता. शॉची व्यवहारी वागणूक तऱ्हेवाईक वाटते.

पत्नीवियोगानें ज्यांच्या डोळ्यांतून गंगायमुनांचे पूर वाहूं लागले, ज्यांना जीवित भारभूत झालें, सुंदर जग स्मशानाप्रमाणें वाटून हृदयाला शांति देणारें कांहींहि न आढळल्यामुळें जे ऊर बडवूं लागले, तेच थोड्या दिवसांत प्रथम पत्नीच्या आसनावर दुसरीला बसवून तिच्याभोंवतीं पिंगा घालतांना दिसतात. पत्नीविरहावर तीव्र शोकगीत लिहिणारा एकादा असाहि कवि आढळेल कीं, बिचाऱ्याच्या लग्नाला अजून ठिकाण नाहीं.

कवीनें धारण केलेल्या नांवावरूनहि त्याच्या वृत्तीचा अगर शीलाचा अंदाज करण्यांत येतो. पण हे अंदाजी घोडे कोणीकडे उधळतील याचा नेमच नाहीं. ज्या अर्थी कवीनें गोविंदाग्रज नांव धारण केलें त्या अर्थी त्याची आपल्या बंधूच्या ठिकाणीं कृतज्ञ बुद्धि असली पाहिजे. ज्या कवीनें BEE हें टोपण नांव घेतलें आहे त्याची वृत्ति भ्रमराप्रमाणेंच असली पाहिजे. आनंद कवि आनंदाचा मूर्त अवतार असेल म्हणूनच तसें नांव धारण करितो वगैरे अनुमानें कितपत मान्य करावयाचीं ?

याच्या उलट प्रकारहि केव्हां केव्हां आढळेल. मुलाविषयीं कविता लिहीत असतां, स्वतःचें गोजिरवाणें चिमणें मूल जवळ येऊन त्रास देऊं लागल्यास, समाधिभंगाबद्दल संतापून त्याच्या गोड गुलाबी गालांत मारणारे, कवितेंत कोमल फुलावरून अगर कोंवळ्या मुग्ध कळीवरून जिवाची कुरवंडी करणारे पण प्रत्यक्ष हातांत फुलें अगर कळ्या आल्या असतां तुच्छतेनें त्या कुस्करणारे व कोणी कारण विचारल्यास दिडकीला सतरा फुलें व पंचवीस कळ्या मिळतात म्हणून दिमाखानें उलट उत्तर देणारे, स्त्री ही परमेश्वराची मूर्ति आहे, तिची देवतेप्रमाणें पूजा करावी, म्हणून लिहीत असतांच पत्नीनें चहा जरा उशीरां आणला म्हणून तिची पायपोसानें पूजा करावयास तयार होणारे अनेक कवि सापडतील. उलट फूल

दिसलें म्हणजे मध चाखण्याकरितां भ्रमर तेथें जाणारच ! परमेश्वरनिर्मित सौंदर्याचा अमक्यानेंच उपभोग घ्यावा असा ईश्वराचा निर्बंध आहे कीं काय ? गोड फळाला पक्षी टोचणारच ! असें बोलणारा पण नीति–नियमांचीं बंधनें चुकून सुद्धां उल्लंघिलीं जाऊं नयेत म्हणून खबरदारी घेणाराहि कवि आढळेल.

समुद्राच्या पाण्यावर कांहीं पडल्यास त्यावर तरंग उत्पन्न होतात. पण समुद्राचें अंतरंग बदलत नाहीं. त्याप्रमाणें तात्पुरती भावनांची खळबळ झाली तरी शीलसमुद्राच्या अंतरंगांत बदल होत नाहीं, असें कवि यशवंत आपल्या भावना व शील या कवितेंत लिहितात. एखादें दृश्य पाहिलें म्हणजे अंतःकरणांत कांहीं भाव उसळतात. ते भाव कवि व्यक्त करण्याचा प्रयत्न करितो. हे भाव सुव्यवस्थित रीतीनें व्यक्त होईपर्यंत त्याला इतर गोष्टी सुचत नाहींत; एखादे वेळेस तो खाणेंपिणेंही विसरेल. पण याचा अर्थ असा नाहीं कीं, तो भाव त्याच्या अंतःकरणांत कायम असतो. त्या भावनांचा त्याच्या मनोवृत्तीशीं संबंध असेलच असें नाहीं. एखादा पाषाणहृदयी मनुष्यहि क्षणिक भावनेच्या भरांत देवतांइतका दयाळू बनेल; उलट कोमल मनोवृत्तीचा व विचारी मनुष्यहि क्षणिक भावनेनें बेहोष होऊन एखादें अविचाराचें कृत्य करील; विशिष्ट प्रसंगीं भावनावश होऊन एकादा साधुवृत्तीचा सज्जनहि दुर्वर्तनास प्रवृत्त होईल. पण त्या भावनाविवश क्षणिक मनस्थितींत घडलेल्या कृत्यावरून त्या माणसाच्या शीलाविषयीं केलेलें अनुमान निश्चित मानणें योग्य होणार नाहीं.

एकाद्याच्या वृत्ति मूळच्याच कोमल असल्या तर त्याच्या अंतःकरणांत कोमल भावना तीव्रतेनें जागृत होणें संभवनीय आहे, व त्या भावना त्यानें रेखाटल्या तर त्याचें लिखाण त्याच्या अन्य भावनात्मक लिखाणापेक्षां केव्हांहि अधिक सरस व सुंदर उतरेल. खरोखरच देशाविषयीं रात्रंदिवस तळमळणाऱ्या एखाद्या कवीनें राष्ट्रविषयक काव्यें गाइलीं तर तीं त्याच्या इतर काव्यांपेक्षां जास्त हृद्य होतील. मनोवृत्तीला प्रतिकूल असणाऱ्या

भावना जींत चित्रित केल्या आहेत त्या कवितेपेक्षां मनोवृत्तीला अनुकूल असणाऱ्या भावना जींत रेखाटल्या आहेत ती कविता केव्हांहि श्रेष्ठ दर्जाची ठरेल व म्हणूनच गोविंदाग्रजांचीं प्रेमगीतें त्यांच्या इतर कवितांपेक्षां श्रेष्ठ आहेत व बालकवींचीं निसर्गगीतें त्यांच्या राष्ट्रीय गीतांपेक्षां अनेक पटींनीं मधुर आहेत. असें जरी असलें तरी कवीच्या केवळ काव्यांवरून त्याच्या शीलाविषयीं अगर मनोवृत्तींविषयीं सरसकट अनुमान करणें केव्हांहि श्रेयस्कर ठरणार नाहीं. दुःखानें पोळलेल्या, आप्तेष्टांनीं टाकलेल्या, एकुलत्या एक पुत्राच्या मरणानें हृदय करपलेल्या एकाद्या विधवेनें दुसऱ्या एकाद्या अनाथ व पोळलेल्या विधवेस पाहिल्यास तिच्या डोळ्यांत क्षणांत अश्रु दिसूं लागतील. पण त्या पोळलेल्या विधवेस पाहून ज्यांच्या ज्यांच्या डोळयांत अश्रु उभे राहातील ते सर्व पूर्वोल्लेखिलेल्या विधवेप्रमाणेंच दुःखी–कष्टी असतील, असें विधान करणें हास्यास्पद होईल.

बहुतेक काव्यग्रंथांतील स्त्रियांच्या भावना पुरुष कवींनींच रेखाटलेल्या आढळतील व त्यांचें रेखाटन आकर्षक झालेलें दिसून येईल. कित्येक कवींच्या नायिका नायकापेक्षां सरस वठलेल्या दिसतील; म्हणून त्या कवीचें हृदय स्त्रीसुलभभावमय असलें पाहिजे हें म्हणणें अयोग्यच नव्हे तर वेडे-पणाचें होईल. तानाजींचें मध्यरात्रीचें गडारोहण हिमतीनें वर्णन करणारा कवि हिंमतबाज असेलच असें नाहीं; रात्रीं आठ वाजतांही बाहेर जावयाचें झाल्यास त्याला कंदील घेऊन बरोबर चालणारी एकादी व्यक्ति मदतीस लागत असेल. उमर खय्यामच्या रुबांयाचें भाषांतर करणाऱ्या कवीला दारूची बाटली व कवितेची वही घेऊन एकाद्या झाडाखालीं कविता लिहीत बसण्याइतकें कांहींच आवडणें शक्य नाहीं, कुबेराच्या संपत्तीवर लाथ मारणारे कवि योगीश्वर होण्याइतके निस्पृह असले पाहिजेत, दुष्ट जनतेपासून दूर जाऊन प्रियेसह रानांत राहूं इच्छिणारा खरोखरच रानांत गेला असेल अगर प्रियेच्या विरहानें वेडा झालेला ठाण्याच्या इस्पितळांत आढळेल असें म्हणणारालाच खरोखर ठाण्याच्या इस्पितळांत पाठवावें लागेल.

सारांश, कवीच्या केवळ काव्यावरून त्याच्या स्वभावाचा, शीलाचा अगर मनोवृत्तीचा कयास करून त्याच्या चरित्राचा मनोरा उभारल्यास त्या मनोऱ्याचा पाया कच्चा असल्यामुळें तो केव्हां ढासळून पडेल याचा नियम नाहीं. कवीचें चरित्र माहीत नसल्यास कवितेवरून कवीची मनोवृत्ति अगर शील ठरविणें केव्हांहि बरोबर होणार नाहीं; पण पुष्कळदां काव्यपरीक्षक आधीं कळस मग पाया याप्रमाणें कवीच्या कवितांवरून त्याच्या मनोवृत्तीचा कल पाहण्यांत गुंग झालेले दिसतात. वास्तविक कवीसुद्धां इतरांप्रमाणेंच व्यवहाराच्या गाड्याला जुंपलेला एक प्राणी आहे. इतरांप्रमाणेंच भावनाविकार त्याच्याही अंतःकरणांत जागृत होतात. इतरांना ते भावविकार व्यक्त करण्याचें सामर्थ्य नसतें, अगर असलें तरी तें कमी असतें. कवीचें हें सामर्थ्य इतरांपेक्षां जास्त असतें. हे भाव व्यक्त करण्याचें सामर्थ्य जसें कमीजास्त असेल तशी कवीची योग्यता ठरते. कवि हा बेजबाबदार, स्वछंदी अगर वेडा प्राणी असतो असेंहि नाहीं किंवा तो इतरांपेक्षां श्रेष्ठ, उच्च मनोवृत्तींच्या प्रांतांत विहार करणारा थोर महाभाग असतो असेंहि नाहीं. परमेश्वरानें निरनिराळ्या व्यक्तींना निरनिराळ्या देणग्या दिलेल्या आहेत. कवीच्या वाट्याला भाव व्यक्त करण्याचें सामर्थ्य आलें आहे. इतरांच्या वाटयास अन्य गुण गेले असतील. कवि नसूनहि कांहीं माणसें कवीपेक्षांहि जास्त भावनाप्रधान असतात. त्यांच्या हृदयसतारीच्या तारा इतक्या कोमल असतात कीं, त्यांच्यावर बाह्य गोष्टीचा किंचित् आघात झाला तरी त्या कंपित होतात. पण तारा कंप पावल्यावर उत्पन्न होणाऱ्या क्षीण आवाजाचें मधुर निनादांत रूपांतर करणारा भोपळा—भावना व्यक्त करण्याचा गुण—त्या सतारीला नसल्यामुळें तो नाद इतरांना कळत नाहीं.

क्षणिक भावनेच्या भरांत मनोवृत्तीशीं विसंगत असा भाव अगर विचार कवि व्यक्त करणार नाहीं असें नाहीं. एकच नाटककार धीरोदात्त, गंभीर नाटकाचें चित्र जितक्या कुशलतेनें व हळुवार हातानें रंगवितो, तितक्याच किंबहुना त्यापेक्षांहि जास्त कुशलतेनें तो सैतानाप्रमाणें हृदयहीन असलेल्या

खलनायकाचेंहि चित्र रेखाटतो. त्या नाटककाराचें मात्र नायकाशींहि साम्य नसतें व त्याच्या अंतःकरणांत प्रतिनायकाचे दुर्गुणहि धुडगूस घालीत नसतात. कुशल वक्ता विषयाच्या दोन्हीहि बाजू सारख्याच जोरदार पद्धतीनें मांडूं शकतो. त्याचें दोन्हीहि बाजूंचें समर्थन ऐकून त्याच्या वृत्तीचा कल सांगतां येणें कठीण जाईल. त्याचप्रमाणें कवींनीं लिहिलेल्या नुसत्या कवितेवरून त्यांच्या मनोवृत्तीचा अगर शीलाचा विचार केल्यास तो बरोबर असण्यापेक्षां चुकण्याचा संभव जास्त. कवीच्या चरित्राचा व मनोवृत्तीचा पडसाद त्याच्या कवितेंत आढळणें शक्य आहे. आणि त्याचें चरित्र माहीत असल्यास त्याचा व त्यानें लिहिलेल्या कवितांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला तर तो युक्त होईल. पण चरित्र फारसें माहीत नसतां निव्वळ कवीनें लिहिलेल्या कवितांवरून त्याच्या चरित्राची, शीलाची अगर मनोवृत्तीची कल्पना करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे वाऱ्याचे भारे बांधणें होय.

प्राचीन कवींच्या कवितांतील उतारे घेऊन त्यावरून त्यांच्या चारित्र्याविषयीं अशींच अनुमानें केलीं तर तीं मोठीं मजेचीं होतील. रामदासांनीं मनाला उपदेश केला त्या अर्थीं त्यांचें मन ओढाळ असलें पाहिजे. तुकाराम तर तोंडानेंच कबुलीजबाब देतात कीं, आम्ही युगींचे दुर्जन आहोंत. एकदां ते म्हणतात 'भिक्षापात्र अवलंबणें—जळो जिणें लाजिरवाणें,' तर दुसऱ्या वेळेस सांगतात 'मागावें हें अन्न तरी भिक्षा थोर—वस्त्रासी हे भार चिंध्या बिदीं' हीं परस्परविरुद्ध विधानें लिहिणाऱ्या कवीच्या मनोवृत्तीचा त्यांच्या केवळ कवितांवरून अंदाज करणें धोक्याचें होणार नाहीं काय? मोरोपंतांचें पाप ऐकून गंगेच्या तोंडून सुद्धां 'अगाई' असे उद्गार बाहेर पडतात व ती कानांवर हात ठेवते, हें मोरोपंतच सांगतात.

कवीचें चरित्र कसेंही असलें तरी त्याचा त्यानें लिहिलेल्या काव्यातील रसाशीं फारसा संबंध नसतो. खंडकाव्यांत व नाट्यगीतांत हें तेव्हांच दिसून येतें. पण भावगीतांचा सुद्धां विचार करतांना येवढेंच म्हणतां येईल कीं, कवि जो भाव रेखाटीत असतो त्याची त्या क्षणापुरती त्याच्या

अंतःकरणाला पकड बसलेली असते. त्या क्षणानंतर तो नेहमींचा व्यवहारी मनुष्य शिल्लक राहातो.

या लेखांत कवींवर वैयक्तिक टीका करण्याचा उद्देश नाहीं. दोष सर्वांच्या अंगीं असतात; त्यांतून कवि कसा सुटेल? उलट हेंच सांगावयाचें आहे कीं, कवीचें काव्य वाचतांना कवीच्या वैयक्तिक जीवनाकडे लक्ष देऊं नये. फळाफुलांनीं बहरलेल्या उद्यानांतील वृक्षलतांना कोणत्या प्रकारचें खत दिलेलें आहे याबद्दल विचार करणें अयोग्य आहे. सुंदर चित्राकडे पहात असतां त्या चित्राच्या जनकाच्या रूपाचा विचार करणें रसिकतेला रुचणार नाहीं. कमळ चिखलांत उगवत असेल अगर गोड गाणाऱ्या कोकिळेचा रंग काळा असेल, पण त्यामुळें कमळाचें सौंदर्य कमी होत नाहीं अगर कोकिळेचा सूर कर्कश वाटत नाहीं. म्हणूनच स्वतःवर वैयक्तिक टीका झाली असतां टीकाकाराला गडकऱ्यांनीं उत्तर दिलें आहे कीं, कालिदास, वाल्मीकि, शहाजहान यांच्या चरित्रचित्रावर पडदा टाकून रसिक त्यांच्या सुंदर कृतीपासून आनंदाचा उपभोग घेत असतात. आपल्या दोषांचें गालबोट आपल्या वाङ्मय–अपत्याला लागूं नये म्हणून ते सांगतात.

'कांटे सुकले फांदीवरती धन त्यांची झाली राना ।
गुलाब देवा, [ रसिका ] तुम्हां वाहिला गोड करुनि तो कां घ्याना ॥'

या लेखांतील वैयक्तिक उल्लेखामुळें कोणाला वाईट वाटल्यास त्यांना एवढीच विनंति आहे कीं, केवळ काव्यावरून कवीच्या अंगीं नसते गुणावगुण चिकटविले जातात; तसें होऊं नये म्हणून हा लेख लिहिला आहे. कोणावरहि वैयक्तिक टीका करण्याचा लेखकाचा उद्देश नाहीं.

---

# आमची राष्ट्रीय कविता व तिचें यशोमापन ८

अलीकडे प्रेमाचीं पांचट काव्यें भरमसाटपणें लिहिलीं जात असून ज्या काव्याची आजच्या परिस्थितींत अत्यंत आवश्यकता आहे अशी स्वदेशाभिमानप्रेरक काव्यें फारच थोडीं लिहिलीं जात आहेत, अशी हाकाटी सगळीकडून ऐकूं येते. प्रेमकाव्यांचा सुळसुळाट शिसारी येण्याइतका माजला असला तरी प्रेमकाव्य म्हटलें कीं, तें त्याज्यच, असें म्हणतां येणार नाहीं. पण वरील हाकाटीमुळें दिशाभूल होऊन, चांगले समंजस म्हणविणारे रसिक लोकहि कित्येकदां आपला गैरसमज करून घेतात व भलत्याच गोष्टींना महत्त्व देतात.

ज्याची आवश्यकता आहे असें काव्य पुष्कळांना पाहिजे असतें. काव्याच्या वाचनानें स्वाभिमानशून्य अंतःकरणांत अभिमानाची ज्वाला भडकावयास पाहिजे. पराक्रमहीन, नेभळ्या तरुणांत वीरश्रीचा :संचार व्हावयास पाहिजे. दुबळ्या, दुर्मुख माणसानें दुर्दम आवेशानें राष्ट्राच्या संकटसागरांत उडी घ्यावयास पाहिजे. व्यसनाधीनांनीं व्यसनपराङ्मुख झालें पाहिजे, वरिष्ठासमोर उभे राहतांनाहि थरथर कांपणाऱ्या नवजवानानें स्वाभिमान सांभाळावयास शिकलें पाहिजे व प्रसंगीं त्या वरिष्ठाच्या थोबाडींत भडकावली पाहिजे. लचकत मुरडत चालणाऱ्या तरुणींनीं झांशीच्या राणीलाहि मागें टाकण्याचा पराक्रम केला पाहिजे. पुरुषाच्या नजरेला नजर भिडतांच लाजून खालीं वळणाऱ्या त्यांच्या दृष्टींत बेगुमान आवेश थरथरला पाहिजे. देशाभिमानपूर्ण काव्यांनीं त्यांच्या दुबळ्या हृदयाला उत्साही व बलपूर्ण केलें पाहिजे.

काव्यापासून वरील गोष्टींची अपेक्षा जे करितात त्यांची अपेक्षा गैर आहे असें म्हणण्याचें धाडस करणें कठीण आहे. काव्यांत बोधवाद युक्त कीं अयुक्त याबद्दल या लेखांत विचार करावयाचा नाहीं. बोध-

वादाची अपेक्षा करणारेच लोक काव्यानें राष्ट्रीय भावना जागृत व्हावयास पाहिजे असें म्हणतात असें नाहीं. बऱ्याच रसिकांनाहि तसें वाटतें. देशाला आग लागली असतां, अज्ञात सुन्दरीवर, काल्पनिक प्रणयिनीवर अगर कृत्रिम लताकुसुमांवर कविता लिहिणें त्यांच्या मनोवृत्तीला रुचत नाहीं व दुसऱ्यांना रुचत असलेलें त्यांना पटत नाहीं. त्यांना विषाद वाटतो. दुसऱ्यांच्या कोत्या समजुतीबद्दल कित्येकदां ते खूप चिडतात.

काव्यापासून वर दर्शविलेली अपेक्षा परिपूर्ण होणार असली तर कोणाला आनंद होणार नाहीं ? पण जो अनुभव येतो तो भिन्न आहे व त्याबद्दलच या लेखांत विचार करावयाचा आहे.

वरील अपेक्षेचा कवींवर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. सामान्य जनतेला त्याचप्रमाणें कांहीं थोर राष्ट्रपुरुषांना काव्यानें राष्ट्राभिमान जागृत व्हावयास पाहिजे आहे असें वाटतें, हें दिसतांच ' मागणी तसा पुरवठा ' या व्यापारी तत्त्वाप्रमाणें काव्यप्रांतांतहि निर्मिति सुरू झाली. उदयोन्मुख कवींची गोष्ट तर सोडूनच द्या; पण कांहीं स्वयंनिष्ठ कवीसुद्धां या पुरांत वाहून भलतीकडेच झुकले. कांहीं तर्कशुद्ध विद्वानांनाहि या गोष्टींनीं पछाडलें. मासिकाचें नांव ' सह्याद्रि ' ठेवावयाचें म्हणून सह्याद्रीचें महत्त्व-वर्णनपर कविता पाहिजे आहे असें म्हणणें कशाचें द्योतक आहे ? अशी जी हेतुपुरस्सर विशिष्ट दृष्टिकोनानें कविता लिहिली गेली, तिचें महत्त्व किती समजावयाचें व तिनें कार्य किती घडतें हें पाहणें अत्यंत आवश्यक आहे. मात्र तें भावनेच्या आहारीं न जातां विचारपूर्वक झालें पाहिजे.

आतांपर्यंत मराठीमध्यें पुष्कळच राष्ट्रीय कविता लिहिली गेली आहे. तिच्या स्वरूपाकडे पाहिल्यावर तिच्यापासून ही जी अपेक्षा केली जाते ती कितपत साध्य होत असावी याची जबर शंका उत्पन्न होते. काव्याच्या कसोटीला ती कितपत उतरेल हा प्रश्न जरी निराळा असला व तो जरी विचारांत घेतला नाहीं तरी तिच्यापासून इच्छित भावना जागृत होते कीं नाहीं, झाल्यास कितपत होते, हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

खोटा मोठेपणा मदिरेपेक्षांहि माणसाला जास्त बेहोष करितो. थोर गुणांचें शब्दांनीं प्रदर्शन करणें जितकें सोपें आहे तितकेंच ते गुण अंगीं आणणें कठीण आहे. पूर्वजांच्या गुणांचें गायन करणें प्रत्येक राष्ट्रवासियाचें कर्तव्य आहे. त्यांच्याविषयीं आदर बाळगणें सर्वांस अवश्य आहे. त्यांच्या दिव्य गुणांचें अनुकरण करतां येत नसलें तरी त्या गुणांविषयीं पूज्य-भाव प्रत्येकास वाटावयास पाहिजे हें खरें; पण पूर्वजांच्या गुणांचें प्रदर्शन करितांनाहि मर्यादा सुटावयास नको.

त्यांच्या गुणांनीं आमचे अवगुण झांकून त्यावर सद्‌गुणांचा रंग चढावयास नको. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचें वर्णन करीत असतां आम्ही त्यांचे वंशज तसेच आहोंत असें स्वतःच्या बढाईचें ढोलकें बडवणें केव्हांहि योग्य ठरणार नाहीं. पूर्वजांच्या नांवानें स्वतःच्या हीन गुणांवर पडदा टाकून स्वतःला मोठें समजणें समंजसपणाचें होणार नाहीं.

हिंदुस्थान एका काळीं सुवर्णभूमि असली तरी आज ती कंगालभूमि आहे. हिंदुस्थानांतील वीरपुरुषांनीं पराक्रमानें दुसऱ्यांना दिपविलें असलें तरी त्यांच्या वंशजांना आज स्वतःच्याच अवगुणांमुळें गुलामगिरींत खितपत दिवस काढावे लागत आहेत. दिल्लीच्या सम्राटापुढें त्याच्या भर दरबारांत शिवाजी महाराजांनीं मान झुकविण्यास अवमान केला असला तरी दुसऱ्यांची थुंकी झेलण्यांत अहमहमिकेनें त्याच शिवाजीचे महाराष्ट्रीय पुढें येत आहेत. धर्माकरितां प्राणावर तिलांजली सोडणार आमचे पूर्वज असले तरी आमच्यामध्यें धर्माभिमानशून्यता बोकाळली आहे. मानास प्राण समजणारांचे आम्ही वंशज असलों तरी आम्हांला मान म्हणजे काय याची फारशी ओळख नाहीं. असें असतां त्यांच्यामुळें आम्ही थोर आहोंत, आम्ही त्यांचेच वंशज आहोंत, त्यांच्याप्रमाणेंच आमच्या अंगीं गुण आहेत, असें म्हणणें व त्यामुळें झिंगून बेताल होऊन बडबड करणें कितपत योग्य आहे?

आमच्या राष्ट्रीय कवितेपैकीं बरीच कविता अशी आहे. शब्दांचा कैफ

चढल्यामुळें आम्ही आमच्या पूर्वजांच्या वास्तव गुणांचेंहि अवास्तव वर्णन करितों व त्याबरोबर आमच्याहि मोठेपणाचें लटकें प्रदर्शन करीत असतों. आमच्या हिमालयाइतकेच आम्ही उंच आहोंत. आमच्या गंगायमुना इतक्या पवित्र व पतितपावन आहेत कीं, त्यामुळें आमचें श्रेष्ठत्व सर्वांनाच पटलें पाहिजे. आमच्या देशावर परमेश्वराची स्पेशल (!) कृपादृष्टि आहे. हा 'आनंदकंद हिंददेश' आमचा आहे, असें म्हणतांना आमची मान अभिमानानें किती ताठ होते याची कल्पनाच इतरांना होणें शक्य नाहीं.

ही अशी राष्ट्रीय कविता ऐकून आम्ही पुष्कळदां नागाप्रमाणें डोलूं लागतों. ऐतिहासिक प्रसंग घेऊन त्यावर चार वऱ्यावाईट ओळी लिहून आम्ही त्या थोर लोकांचेच वंशज आहोंत, आमचाहि अभिमान तितकाच तीव्र आहे, त्यांच्याप्रमाणेंच आम्हीहि तळहातावर शीर घेऊन देशाकरितां सर्वस्व समर्पण करूं, असें आम्ही म्हणूं लागतों, नव्हे बडबडूं लागतों. पण कृतीच्या नांवानें शून्य. आमच्या भावनांची तीव्रता फार झालें तर ती कविता म्हणण्यापुरती दिसते. परक्यांना शिव्या देणें, त्यांना हीन व त्याज्य समजणें व स्वतःला सर्वश्रेष्ठ मानणें अशी आमची रीत होऊन बसली आहे. ऐतिहासिक अगर राष्ट्रीय विषय अगर प्रसंगच प्रथम आम्हांला मोहिनी घालतो. तसा प्रसंग भडकपणें रंगविला कीं, सवंग लोकप्रियता प्राप्त होण्यास वेळ लागत नाहीं. या अशा कवितांमुळें खऱ्या राष्ट्रीय कवितेची मुस्कटदाबी होते.

चहा, चिरूट, सिगारेटमुळें झालेली राष्ट्रहानि गर्जना करून सांगणारे गणेशोत्सवाचे कवि सोडून दिले तरी काव्यप्रांतांत मानाची मनसब मिळविणारेसुद्धां त्यांच्याप्रमाणें बेताल होतात हें पाहून हा कैफ किती अनावर असतो ही खात्री पटते. औरंगजेबाला 'औरंग्या' अगर अफझुलखानाला 'अफजुल्ल्या' म्हटल्यानें शिवाजीला 'डोंगरांतील चुव्वा' म्हणणारांना जशास तसें उत्तर दिल्याचें समाधान होईल. पण तें उत्तर देण्याचा काव्य हा प्रांत आहे असें मला वाटत नाहीं. अफझुलखानासारख्याला लोळ-

दिल्यावर शिवाजीची योग्यता वाढली. औरंगजेबाच्या हातावर तुरी दिल्यामुळें तर शिवाजीची अलौकिक बुद्धिमत्ता जगाला पटली. असें असतां सामान्य जनतेला घटकाभर मौज वाटते म्हणून 'औरंग्या' 'अफजुल्ल्या' म्हणणें बरें होईल काय ? व त्या कवितेला राष्ट्रीय कविता म्हणतां येईल काय ?

आमचें एक सर्वमान्य राष्ट्रगीत 'आनंदकंद ऐसा' यांतील ओळी वाचून त्यांचा अर्थ (!) काय करावा हेंच कळत नाहीं. आजहि हिंदुस्थानला 'थोरांत थोर समजा' असें म्हणणें म्हणजे आपल्या नालायकीचें उघडें प्रदर्शन करणें होय.

अशी कविता लिहिणारांकडून खऱ्या गोष्टीकडे मुद्दाम दुर्लक्ष केलें जातें. ज्यांनीं अशी कविता लिहिली त्यांना सत्यस्थितीचें ज्ञान नसतें असें नाहीं; पण पुष्कळदां लोकप्रियतेला बळी पडून त्यांच्याकडून अशी रचना होते व असल्या कवितांचा बोलवाला होतो हें पाहून नवीन कवि त्यांचें अनुकरण करतात. सत्य परिस्थितीवर कल्पनेचा साज चढविल्याशिवाय काव्यांत रमणीयता येणें शक्य नाहीं हें खरें असलें तरी कोणत्याहि गोष्टीला मर्यादा ही असायलाच पाहिजेच.

आई व मातृभूमि यांविषयीं ज्यांच्या मनांत प्रेमादर नसेल तो पशू होय. पण आईविषयीं आपल्या मनांत जें प्रेम असतें त्या प्रेमाची कार्यकारणसंगति आपण लावूं इच्छित नाहीं. ती आपली आई आहे या पलीकडे इतर कारणांची आम्हांला जरूरी भासत नाहीं. तिच्या श्रेष्ठतेचें वर्णन करतांना आपण नसते गुण तिच्या अंगीं चिकटवून तिला हास्यास्पद करूं इच्छित नाहीं. 'माझी आई अप्सरेप्रमाणें सुंदर आहे, झांशीच्या राणीसारखी शूर आहे, अत्यंत बुद्धिमान् आहे,' अशा प्रकारचे तारे तोडून एखाद्यानें तिचें वर्णन केलें व त्यामुळें ती मला प्रिय आहे असें सांगितलें तर त्याची महामूर्खांत गणना केली जाईल. हा जो विवेकाचा तोल जननीच्या बाबतींत आपण सांभाळतों तो मातृभूमीच्या बाबतींत कां

सुटावा हें कळत नाहीं. प्रेम—तें कोणत्याहि प्रकारचें असो—आंधळें आहे असें म्हणतात. प्रेमाच्या ठिकाणीं असलेले दोष दिसत नाहींत. दिसले तरी प्रेम करणारी व्यक्ति त्या दोषांना महत्त्व देत नाहीं. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, तिच्या दोषांनाहि सद्‌गुण समजावयाचे !

मराठींत चांगली राष्ट्रीय कविता नाहीं असें नाहीं, पण ती थोडी आहे व तिचें महत्त्व ज्यांना पटलें आहे असे रसिक तिची योग्यता जाणून आहेत. आमच्याकडे उच्च दर्जाची राष्ट्रीय कविता लिहिली गेली आहे. पण असें आढळून येतें कीं, राष्ट्रीय कविता पाहिजे असें अट्टाहासानें सांगणाऱ्या बऱ्याच लोकांकडून त्या कवितेची उपेक्षाच केली जाते. जे रसिकतेच्या दृष्टीनें कवितेकडे पहातात ते त्या कवितेची किंमत पूर्णपणें जाणतात. पण तसे थोडे मार्मिक सोडून दिल्यास खरी राष्ट्रीय कविता पुष्कळांच्या दृष्टिपथांतहि आलेली नाहीं असें दिसून येईल. राष्ट्रीय कवितेच्या नांवाखालीं हल्लीं जो माल खपविला जातो त्याकडे एकदां दृष्टि फेंकली म्हणजे हें सहज लक्षांत येईल.

विनायकाच्या अगर गोविंदाच्या कवितेचें समीक्षण करतांना एकादा रसिक तिचें राष्ट्रीय दृष्ट्या असलेलें महत्त्व स्पष्ट करतो, पण यापेक्षां त्या कवितेला सर्वमान्य राष्ट्रीय स्वरूप देण्याचा विशेषसा प्रयत्न केलेला दिसून येत नाहीं. राष्ट्रीय म्हणून जिभेवर खेळणारीं, रस्तोरस्तीं ऐकूं येणारीं, सभा-समारंभांत म्हटलीं जाणारीं कांहीं गीतें वरील कवींच्या गीतांशेजारीं ठेविलीं तर त्यांतील फरक विशेषत्वानें दिसून येईल व त्यांचें महत्त्व आमच्या डोळ्यांना पटेल. पण राष्ट्रीय कविता म्हणण्याचा अगर गाण्याचा व हृदयाचा कांहीं संबंध आहे, हें आम्हांला नीट पटेल तेव्हां हें कार्य होईल. तें मनाला पटल्यावर मग स्वतःविषयीं बोलतांना आम्हांला ‘ थोरांत थोर समजा ’ असें आम्ही ताठ्यानें म्हणणार नाहीं. ‘ दैवा, डिवचुनि पाही खुशाल ’ असे गर्वोद्धत उद्‌गार आमच्या तोंडून निघणार नाहींत. ‘ साथी त्या दिलजानांचे ’ अशा खोट्या अभिमानाची धुंदी

आमच्या डोळ्यांवर येणार नाहीं. आमचें हृदय तडफडून म्हणूं लागेल, 'कारटीं करंटीं तियें, मातृशोणितें, स्वतःला लाली, आणाया धावली.' अंतःकरण पिळवटून आमच्या तोंडून आर्त स्वर निघतील, 'कन्हैया, तार या कालीं—हरि, वाजिव गीतामुरली.'

मग 'चरखा करीं धरोनी आम्ही स्वराज्य घेऊं' असें आम्ही म्हणणार नाहीं, तर आमचें मन म्हणेल, 'फसे जी गाळीं-गाय चेंपत चालली.' मग आम्ही, 'सिंहाचे छावे आहोंत' असें म्हणणार नाहीं तर 'आमचे पूर्वज सिंह होते, पण......, असे खेदोद्गार आमच्या तोंडून निघतील. मग आमचे शाहीर मोडकीं तोडकीं गीतें म्हणून 'लाल तोंड्या,' 'बंदर,' 'लांडा' असल्या शब्दावर टाळी मिळवणार नाहींत व आम्हीहि तसल्या कवितांना महत्त्व देणार नाहीं.

भावनांचा, शब्दांचा हृदयाशीं असलेला संबंध आम्ही जोंपर्यंत ओळखणार नाहीं तोंपर्यंत हीं असलीं अर्थहीन गीतेंच राष्ट्रीयत्वाच्या नांवाखालीं खपतील. असल्या गीतांना अर्थहीन म्हणण्याचें कारण उघड आहे. ज्यांच्या अर्थाचें सुवर्ण, परिस्थितीच्या व सत्याच्या कसोटीवर हिणकस नव्हे तर मातीमोल ठरतें त्यांना अर्थ आहे असें कसें म्हणतां येईल ! पूर्वी लढाई संपल्यावर विजयी सैन्याच्या बरोबर असलेले बाजारबुणगे सर्व देशांत धुमाकूळ घालीत असत. त्या बाजारबुणग्यांप्रमाणेंच आजच्या आमच्या राष्ट्रीय म्हणविल्या जाणाऱ्या बऱ्याचशा कवितेनें काव्यप्रांतांत धुमाकूळ घातला आहे.

कोणत्याहि देशांतील मनुष्य असो, त्याला आपल्या जन्मभूमीबद्दल स्वाभाविक प्रेम वाटतें. तें कारणातीत असतें. निर्जल वाळवंटांतील अरबांना त्यांच्या ओसाड मातृभूमीविषयीं वाटणारें प्रेम अगर मरुभूमींत राहणाऱ्या रजपुतांचें देशप्रेम युनायटेड स्टेट्सुसारख्या सुपीक देशांत राहणाऱ्या लोकांच्या देशप्रेमापेक्षां अणुभरहि कमी असत नाहीं. ज्या

देशांत मनुष्य जन्मतो तो कसाहि असला तरी त्याला प्रिय असतो. त्या प्रेमाचें प्रदर्शन भलत्याच रीतीनें करणें बरें नाहीं.

एकाद्या कवितेचें परक्या भाषेंत भाषांतर केलें गेलें तर त्या परक्या लोकांनाहि तें पटावयास पाहिजे. या दृष्टीनें आपल्या राष्ट्रीय म्हणविल्या जाणाऱ्या कांहीं कवितांचें भाषांतर झाल्यास परके लोक त्याकडे कोणत्या दृष्टीनें पहातील, याचा वाचकांनीं जरा तटस्थपणें विचार करून पहावा.

स्वाभिमान पाहिजे, पूर्वजांविषयीं आदर अवश्य हवा; मात्र त्यांच्या मोठेपणावर स्वतःस विकून घेऊन बडे बापके बेटे म्हणून बडे म्हणवून घेणें योग्य नाहीं. आमच्या अभिमानाचें स्वरूप असें तऱ्हेवाईक दिसतें. वाङ्मयाच्या इतर भागापेक्षां काव्यभागामध्यें तें भरमसाट रीतीनें व्यक्त केलें जातें यामुळें विषाद वाटतो. एकाद्या कोट्यधिशाच्या कंगाल पुत्रानें आपल्या वडिलांच्या श्रीमंतीचा अभिमान बाळगला तर तें कदाचित् गैर होणार नाहीं. पण त्याच्याप्रमाणें स्वतःला श्रीमंत समजून लाखांच्या गोष्टी बोलणें सहज शक्य असलें, तरी त्याच्या बडबडण्याला काय किंमत येणार आहे ? तो गर्भश्रीमंत असला तरी दारिद्र्यावस्था प्राप्त झाल्यानंतरचें त्याचें श्रीमंतीचें प्रदर्शन, त्याच्या नादानपणाचें व मूर्खपणाचें प्रदर्शक होईल. अगदीं थेट तशीच आमची स्थिति झालेली आहे. एकाद्या दिवाळखोरानें आपण पूर्वीप्रमाणेंच श्रीमान् आहोंत असें दाखविण्याचा यत्न केल्यास, त्याच्या अकलेचेंहि दिवाळें वाजल्यासारखें दिसून येईल. आमच्या राष्ट्रीय, कवितेपैकीं बरीच कविता आमच्या सारासार विचारशक्तीचें दिवाळें वाजल्याचें सिद्ध करीत आहे. आमच्या पूर्वजांच्या नांवावर आम्ही स्वतःस विकून घेण्याचा प्रयत्न करीत आहोंत. त्यांच्याप्रमाणें होण्याचा प्रयत्न करणें निराळें व त्यांच्याप्रमाणें आपण आहोंत असें समजून वागणें निराळें. सिंह व सिंहाचें कातडें पांघरून सिंहाचा आव आणणारा प्राणी यांत जितका फरक दिसेल तितकाच फरक त्यांच्यांतहि आढळेल. झोंप-लेल्यास जागें करितां येतें पण झोंपेचें सोंग आणणाराला जागें करणें

शक्यच नसतें. त्याप्रमाणेंच या बाबतींतहि आहे. आपण देशाभिमानी आहों हें बोलून दाखविणें फार सोपें आहे.

देशाभिमान आज तरी लौकिक यशाची गुरुकिल्ली आहे; म्हणून पुष्कळच देशाभिमानी होतात. या अशा प्रकाराला आळा घालणाऱ्या विचारी मनुष्याला पुष्कळदां मूर्ख, स्वाभिमानशून्य अशीं विशेषणें मिळून तो नादान ठरतो. अशाच देशभक्तांच्या काव्यरसिकतेमुळें असल्या कवितेची भरमसाट वाढ होते. पण तसल्या कवितेच्या यशाचा विचार केल्यास निराश व्हावें लागतें. खऱ्या राष्ट्रीय कवितेच्या प्रसाराच्या आड ही अशी कविता येते. आज राष्ट्रीय म्हणून मानानें मिरविणाऱ्या कवितेच्या स्वरूपाकडे पाहिलें म्हणजे तिच्याकडून अपेक्षिलेलें उद्दिष्ट साध्य होणें फार कठीण आहे हें पटूं लागतें. या असल्या कवितेनें राष्ट्रीय कवितेची गळचेपी केली आहे.

जुलमाचा प्रतिकार जींत व्यक्त झाला आहे त्या कवितेला राष्ट्रीय कविताच म्हणावयास पाहिजे. तो जुलूम राजकीय असेल, धार्मिक असेल अगर सामाजिक असेल. त्याचा प्रतिकार वीर वृत्तीनेंच केलेला असतो. अशा कवितेला ऐतिहासिक पार्श्वभूमि नसली तरी तिला राष्ट्रीय कविता मानावयास पाहिजे. दीनदुबळयांच्या दुःखानें तळमळून त्यांच्या मदतीकरितां धडपडणाऱ्या मनोवृत्तीला राष्ट्रीय न मानणें कितपत योग्य होईल? आपल्या देशबांधवांच्या दुःखानें तळमळून त्यांच्या मुक्ततेकरितां प्रयत्न करणारा राष्ट्रपुरुष व धरणीकंपानें त्रस्त झालेल्या अर्धमृतांना वाचवावयास स्वतःचा जीव धोक्यांत घालून धावत जाणारा डॉक्टर या दोहोंच्या वृत्तींत तत्त्वतः फारसा फरक पडत नाहीं. एकाच्या कृतीला इतिहासाची पार्श्वभूमि असते. दुसऱ्याच्या कृतीला ती नसते. आगींत जळणारांना वाचविण्याकरितां आपल्या प्राणाची पर्वा न करतां धाव घेणाऱ्या निर्भय व्यक्तीच्या मनोवृत्तीचें जींत वर्णन आहे, ती कविता सकृद्दर्शनी राष्ट्रीय न वाटली तरी तिला राष्ट्रीय न मानणें अयोग्य होणार नाहीं काय?

भ्रामक अगर केवळ ऐतिहासिक पार्श्वभूमि पाठीमागें आहे म्हणून राष्ट्रीयत्वाची मिरासदारी मिरविणाऱ्या कलाकृतींपेक्षां या कृतींची योग्यता मोठी मानली पाहिजे. व्यक्तीच्या अंगच्या ज्या गुणांनीं राष्ट्राचा गौरव होईल, त्याचें महत्त्व वाढेल, अगर त्याच्या उज्ज्वल संस्कृतींत भर पडेल त्या गुणांना राष्ट्रीय मानून, ते गुण कारण असलेले प्रसंग, ज्या कविता-चित्रांत दिग्दर्शित केले असतील त्या कवितांना राष्ट्रीय म्हणून आम्हीं ओळखावयास नको काय? अर्थातच केवळ तसल्या प्रसंगांमुळें त्यांना महत्त्व द्यावयाचें असें नाहीं. त्या कविता कलागुणांनीं श्रेष्ठ असावयास पाहिजेतच. हा दृष्टिकोन मान्य झाल्यास आपल्या लक्षांत येईल कीं, आज राष्ट्रीय न वाटल्यामुळें उपेक्षणीय वाटणाऱ्या कांहीं कविता खरोखर राष्ट्रीय आहेत.

खऱ्या राष्ट्रीय कवितेला उत्तेजन देणें, तिचें योग्य स्थान तिला मिळवून देणें व तिचें महत्त्व सर्वांना पटविणें हें कार्य महाराष्ट्रीय टीका-कारांना अजून करावयाचें आहे.

---

# आमचीं जानपदगीतें 

पूर्वी जी आमची कविता देवि देवतागृहांतून, वनोपवनांतून, कळ्या-फुलांतून, चंद्र-तारकांसह हसत खेळत विहार करीत असे; तीच आतां मधून मधून मजुरांच्या झोपडींतून, शेतकऱ्यांच्या ढवळ्यापवळ्यासह, त्यांच्या शेतमळ्यांतून फिरतांना आढळते. राजेमहाराजांच्या भव्य प्रासादांत रमण्याचा तिला वीट आला नसला, तरी केव्हां केव्हां जुन्या कुडाच्या भिंतींतून जीर्ण झोपडींत डोकावून पहाण्याची तिला इच्छा होऊं लागली आहे. त्रिभुवनसुंदरींच्या नवनीतसदृश कोमलांगाचें वर्णन करण्यांत रंगून गेलेली प्रतिभा देवि, आतां एकाद्या भांगारवाडींतील संताजी पाटलाच्या रंगूच्या भरदार बांध्याकडे पहातांना थबकून उभी राहूं लागली आहे. पूर्वी ज्या लांबसडक बोटांनीं वीणेचा झंकार काढण्यांत ती भान विसरत असे, त्याच बोटांनीं आतां ती क्वचित् कोठें तरी गोवऱ्या थापतांना दृष्टीला पडते. नेहमीं कुसुमकोमल झिरझिरीत वस्त्रांच्या अवगुंठनांत राहणारी व विशाल महालांतूनहि क्वचितच फिरणारी कविता देवि आतां केव्हां केव्हां नाटीचें सुताडें आवळून शेताच्या पाऊलवाटेनें उघड्या माळावरून आपल्या घरधन्याची न्याहारी घेऊन मळ्याकडे जातांना दिसत असते. पूर्वी चपल अश्वांच्या गतीनें धावणाऱ्या रथांतून आपल्या प्रियकराबरोबर जाणाऱ्या राजकन्यांच्या पाठराखणीचें काम करणारी काव्य देवि, आतां खुशींत आलेल्या समिंदरावर गोऱ्या भाळावर लाल चिरी लावून लालभडक किनारीची साडी नेसलेल्या काळ्यासावळ्या कोळ्याच्या पोरीबरोबर कुज-बुज करतांना दिसते. पूर्वी साळूमैनांबरोबर तुणतुण्यावर कलगीचें गाणें गात हिंडल्यामुळें तिच्यावर पडलेला अस्पृश्यतेचा बहिष्कार आज नष्ट झालेला दिसत आहे. हंस, मोर, गरुड यांच्याबरोबर फिरण्याचा कंटाळा

आल्यामुळें ती कावळ्याचिमण्यांबरोबर मधून मधून चिवचिवूं लागली आहे. एका काळीं ती वीणेच्या नादावर तरंगत होती; टाळमृदंगावर रंगत होती. आतां ती ढोल-डफांच्या गर्जनेंत लेझिम खेळूं लागली आहे. मदालसेच्या कटाक्षांनीं प्रणयी जनांना घायाळ करणारी, रतीच्या रसरंगांत गढून गेलेली प्रतिभा, केव्हां केव्हां उंच माळ्यावर उभी राहून, आपल्या हातांतील गोफणींतून दगड भिरकावून पाखरांचा थवा हाकून देण्यांत व्यग्र झालेली दिसते. खेड्यापाड्यांतील माणसांकडे क्वचितच ढुंकून पहाणारी प्रतिभा देवि आतां त्यांच्या हातांत हात घालून, त्यांच्या सुखदुःखांत रमूं लागली आहे.

हें पाहून सामान्य माणसांना समाधानाचा सात्त्विक आनंद न होणें अशक्य आहे. थोडींशीं शहरें सोडलीं तर आपला बहुतेक जनसमाज खेडयांपाडयांतूनच पसरलेला आहे. शेती हा त्याचा मुख्य धंदा असून, विशिष्ट स्थलपरत्वें त्याच्या धंद्यांत थोडाफार फरक दिसतो. कोकणांत समुद्रकांठीं कोळ्यांची वस्ती बरीच असून ते मच्छीमारीचा धंदा करितात. शेतीच्या धंद्याला आनुषंगिक असलेला गुराख्याचा धंदा स्वतंत्रपणें करणारे कांहीं लोक असले तरी त्यांना निराळें मानण्याचें फारसें कारण नाहीं. बरेच लोक शेतीवर मजुरी करून पोट भरतात; तेहि एक प्रकारें शेतकरीच असतात. या लोकांच्या भावना, सुखदुःखें ग्रामगीतांतून व्यक्त करावयास सुरवात करून, आमच्या कवींनीं एका जिव्हाळयाच्या प्रश्नाला चालना दिली, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

शहरांतील कोंदटलेल्या वातावरणांत उबगलेल्या कविमनाला खेड्यांतील मोकळ्या हवेंत हायसें वाटलें तर नवल नाहीं. शहरांतील जीवनक्रम ठराविक साच्याचा, वर्षानुवर्षें बदल न होणारा असतो. खेड्यांतील जीवनांत क्षणोक्षणीं सुखदुःखाचे कढ येत असतात. शहरांतील नागरजनता आपल्या भावनांचें संयमन करितांना दिसते, तर खेड्यांतील सर्वच कारभार दिलखुलास असतो. खेड्यांतील लोक जितके प्रेमळ असतात तितकेच भांडखोर

असतात. आपल्या शेजाऱ्याकरितां ते जीव देतील व प्रसंगीं त्याचा जीवहि घ्यावयास तयार होतील. कोणी थोडासा आपलेपणा दाखवतांच त्याच्या-करितां ते रात्रंदिवस झटतील, आपल्याजवळ जें असेल नसेल तें त्याला देतील, तर टिचभर जागेकरितां सख्ख्या भावाशीं जन्माचा उभा दावा करतील. आंतबाहेर त्यांना ठाऊक नसतें. त्यांचीं मनें त्यांच्या शेतासारखींच असतात. पाऊस पडला कीं, तीं हसूं नाचूं लागतात; ग्रीष्म तापला कीं, तीं तडकूं लागतात. कोठें थोडासा प्रेमाचा अनुभव आला कीं, त्यांचेंहि हृदय भारावून जातें; पण कोणीं जरा डिवचलें कीं, ते खवळून धांवतात. शहरां-तील आपल्या ‘ वकिला ’कडे अगर आपल्या मुलाच्या ‘ सर ’कडे केव्हां-तरी कप अर्धा कप चहा मिळाल्यामुळें तो इतका खूष असतो कीं, त्यांना सहकुटुंब सहपरिवार आपल्या मळ्यांत हुरडा खायला तो अगत्यपूर्वक आमंत्रण देतो; हातांतलें कामधाम सोडून गड्याप्रमाणें दोन दिवस त्यांच्या तैनातींत राबत असतो; आणि आपल्या बैलगाडींतून त्यांना परत शहरांत पोंचविल्याशिवाय त्याला समाधान वाटत नाहीं. बहरलेल्या पिकाकडे पाहून हसणारा शेतकरी केव्हां एकदम मुसळधार पाऊस पडल्यामुळें, तर केव्हां टोळधाड आल्यामुळें, अगर पिकांवर कीड पडल्यामुळें क्षणांत दुःखानें रडूं लागतो. इतकी विविधता शहरांत कोठून आढळणार ? अशा या भूमातेच्या साध्याभोळ्या, कणखर, प्रेमळ, उदार, दरिद्री, सुष्टदुष्ट सत्पुत्रांच्या वर्णनांत प्रतिभा न रंगली तरच आश्चर्य ! भावनांची तीव्रता हें प्रतिभेचें विलासस्थान असतें. खेड्यांइतकी भावनांची खळबळ शहरांतून आपल्याला सहसा आढळणार नाहीं.

या अशा खेड्याच्या विविध वातावरणांत आमची काव्य देवि खरोखर पूर्वींच रमावयास पाहिजे होती; हा ग्रामीण गीतांचा काव्यप्रकार आमच्या-कडे फार उशीरा सुरू झाला. पूर्वीं आमच्या काव्यदेवीची ओळख एका विशिष्ट मनोवृत्तीच्या लोकांशीं झालेली होती, हें कदाचित् ह्याचें कारण असेल. पूर्वींच्या लोकांचा खेडवळ वातावरणाकडे फारसा ओढाच नव्हता.

दीनदुबळा शेतकरी काव्यविषय होण्याला त्यांना योग्यच वाटत नव्हता. अलीकडे वाङ्मयांत नवीन विचारप्रवाह सुरू झाले त्यामुळें म्हणा, किंवा महात्माजीसारख्या पुढाऱ्यांनीं खेड्याकडे दृष्टि वळविण्याचें महत्त्व जनतेला पटवून दिलें म्हणून म्हणा, शहरांतील सुशिक्षितांचें खेड्यापाड्यांतील जनतेकडे लक्ष वेधलें गेलें आहे. त्यांपैकीं कांहीं लोक क्षणभर का होईना आपला नागरी बुरखा बाजूस सारून त्यांच्याबरोबर रमूं लागले आहेत. त्यांच्या मनांत या कुणबीकोळ्यांविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली आहे.

तात्त्विकदृष्ट्या विचार केला तर आमच्या खेड्यांतील समाज व शहरांतील समाज एकच आहे; पण परिस्थितीमुळें त्यांच्यामध्यें विभिन्नतेचा मोठा तट उभारलेला दिसतो. शहरांतून सुशिक्षित पांढरपेशा वर्गाची वस्ती विशेषत्वें असते. तर खेड्यांतून अडाणी शेतकरी वर्गाची वस्ती प्रामुख्यानें आढळते. दोघांमध्यें सांस्कृतिक दृष्ट्या बराच फरक पडल्यामुळें त्यांना एकमेकांविषयीं विशेष आकर्षण वाटत नाहीं. शहरांतील लोक खेड्यांतील माणसांकडे कांहींसें उपहासानें, कांहींसें तिरस्कारानें पहातात; तर खेड्यांतील माणसें शहरांतील लोकांकडे भांबावलेल्या साशंक नजरेनें ओशाळून पहातात. एकांत थोडासा अहंगंड आढळतो तर दुसऱ्याला न्यूनगंडानें पछाडलेलें असतें. त्यामुळें हे दोन वर्ग परस्परांजवळ आलेच तर परस्परांची प्रेमानें विचारपूस करण्याऐवजीं, एकमेकांशीं फटकून वागणेंच अधिक पसंत करीत असतात.

ग्रामीण चित्रें आपल्या लिखाणांतून रेखाटण्याला सुरवात करून आमच्या लेखक—कवींनीं या दोन वर्गांमध्यें सलोख्याचा जिव्हाळा उत्पन्न करण्याचा प्रयत्न चालविला आहे. खेड्यांकडे ढुंकूनहि न पहाणारा शहरवासी आतां खेडुतांच्या भावनांकडे लक्ष देऊं लागला आहे; आणि आपल्याविषयीं शहरांतील माणसांना सहानुभूति वाटते हें पाहून खेड्यांतील माणसांनाहि, त्यांच्याकडे पाहून बिचकण्याचें कारण नाहीं, हें पटूं लागलें आहे. एकादी सुशिक्षित कॉलेजकन्या आपल्याकडे आली असतां, तिच्याकडे

१०१

आदरानें पण परकेपणानें पहाणाऱ्या खेडवळ स्त्रीला, ती जर त्यांच्या चुलीजवळ बसून भाजी चिरून तिला स्वयंपाकांत मदत करूं लागेल तर साहजिकच तिच्याविषयीं प्रेम व जिव्हाळा वाटेल. पूर्वीच्या कवितेंत जानपदगीतें शिरल्यामुळें तिच्या नव्या स्वरूपाकडे पाहून खेडयांतील लोकांना तिच्याविषयीं त्याच प्रकारचा आपलेपणा वाटूं लागला आहे.

ही रचना जितकी अधिक होईल तितका या दोन वर्गांमध्यें अधिकाधिक जिव्हाळा, प्रेम व आपलेपणा निर्माण होईल. जानपदगीतांनीं शहरें व खेडीं यांतील अंतर कमी करण्याचा प्रयत्न चालविला आहे व कोणालाहि त्याबद्दल आनंदच होईल.

जानपदगीतांचा खरा परिणाम पांढरपेशा वर्गावर व्हावयास पाहिजे आहे व तो तसा कांहीं लोकांवर तरी होऊं लागला आहे ही समाधानाची गोष्ट आहे. जानपदगीतांतून ज्या दलित, दीन, दुबळया शेतकऱ्यांचीं—गाबितांचीं जीवनचित्रें रेखाटलेलीं असतात त्यांचा ते स्वतः नेहमींच अनुभव घेत असतात. शेतकरी दरिद्री आहे, तो गांजलेला आहे, सावकार त्याला पिळून काढीत आहे, कोळयाचें जीवन अत्यंत धोक्याचें आहे, त्याचा एक पाय मृत्युलोकाबाहेर पडलेला असतो, त्याच्या मुलांना धड औषधपाणी मिळत नाहीं, ह्या गोष्टी खेडयांतील लोकांना मुद्दाम सांगण्याची का आवश्यकता आहे ! ज्या गोष्टींचा रात्रंदिवस कटु अनुभव त्यांना मिळतो त्या शब्दांनीं सांगून त्यांना त्यांत कांहीं विशेष का कळणार आहे ? बऱ्याचशा जानपदगीतांतील विपन्नावस्था शेतकरी स्वतः अनुभवित का नसतो ? त्यांतील दृश्यें तो आपल्या भोंवतीं नेहमीं पहात का नसतो ?

हीं गीतें ऐकून त्याला आपल्याविषयीं सहानुभूति बाळगणारें कोणीतरी आहे हें पटतें, हेंच महत्त्वाचें आहे. आपली दुःसह अवस्था पाहून तळमळणारीं हृदयें आहेत, हें दिसतांच त्याचा डोळा ओला होऊं लागतो. त्याच्या घरधनिणीशीं कोणालाहि न कळत त्यानें ज्या शृंगारचेष्टा

केलेल्या असतात त्या रेखाटलेल्या आढळतांच, "अरे वा!" असे त्याच्या तोंडून एकदम उद्गार निघतात.

जानपदगीतांनीं शहरांतील पांढरपेशा वर्गात, खेड्यांतील वातावरणाचा अनुभव नसलेल्या सुखवस्तु जीवनांत प्रवेश करून, त्यांना या खेडवळ उपेक्षणीय लोकांविषयीं विचार करण्यास लाविलें आहे. 'जगाला अन्न पुरवणारा अन्नदाता स्वतः उपासमारीनें तळमळत आहे. ज्यांच्या जिवावर आपण चैन करितों, तो भीषण दारिद्र्यांत पिचत पडला आहे. आपल्याप्रमाणेंच त्यालाहि भावना आहेत. आपल्या कडक इस्त्रीच्या शर्टच्या आंत सुखदुःखानें व्याकुळ होणारें जसें हृदय आहे, तसेंच हृदय त्याच्या फाटक्या, चिंध्या झालेल्या अंगरख्याच्या आंतहि आहे. तो आपल्यासारखाच माणूस आहे. त्याच्या सुरकुतलेल्या, खंगलेल्या मलिन देहाकडे पाहून मान फिरविणें योग्य नाहीं. केवळ त्याच्या जीर्ण लक्तरांवरून त्याच्या हृदयाची पारख करणें चुकीचें आहे. तो दुर्बल असला तरी प्रेमळ आहे. तो भांडखोर असला तरी दिलदार आहे. तो लाचार झाला असला तरीहि रात्रंदिवस धडपडून जिवंत राहण्याचा प्रयत्न करतो आहे. ह्या गोष्टी जानपदगीतांनीं व ग्रामीण वाङ्मयानें शहरांतील जनतेसमोर मांडायला सुरवात केली आहे.

ज्या लोकांविषयीं पांढरपेशा वर्ग कधींच विचार करीत नव्हता, किंवा केवळ स्वार्थापुरताच विचार करीत होता, त्यांच्याकडे उपहासानें पहाणें योग्य नाहीं; त्यांच्याविषयीं सहानुभूति बाळगणें अवश्य आहे. ह्या गोष्टी सुशिक्षित शहरवासी वर्गाच्या मनावर बिंबविण्याचें कार्य ग्रामीण वाङ्मय करीत आहे. खेड्यांतील समाज आजपर्यंत उपेक्षणीय समजला जात असे. त्याच्यामध्यें व आपल्यामध्यें कांहीं संबंध नाहीं, अशी भ्रामक समजूत आजपर्यंत आमच्या मनांत खिळून बसली होती. ह्या समजुतीला धक्का देण्याचें काम ग्रामीण वाङ्मयानें व जानपदगीतांनीं केलें आहे. शहरांतील लोकांनीं, खेड्यांपासून अलिप्त राहातां यावें म्हणून स्वतःभोंवतीं

जो शिष्टपणाचा तट बांधिला होता, त्याला भगदाड पाडण्याचें काम जानपदगीतांनीं आपल्या कुवतीप्रमाणें करायला सुरवात केली आहे, आणि म्हणूनच मला वाटतें, जानपदगीतें हीं प्रामुख्यानें नागर जनतेकरितां आहेत. खेड्यांतील दलित, गलित, दीन, जर्जर लोकांकडे आपलेपणानें, सहानुभूतीच्या कळवळ्यानें, शहरवासियांना पहावयाला लावण्याचें कार्य जानपदगीतांचें आहे. तेवढें कार्य न झालें तर निदान तो वर्ग तिरस्कार करण्यास खचित योग्य नाहीं एवढें तरी नागर जनतेला पटवून देण्याचें कार्य त्यांच्याकडून व्हावयास पाहिजे.

आणि हें नजरेसमोर ठेवलें तर जानपदगीतें लिहितांना किती खबरदारी घ्यावयास पाहिजे, हें सहज लक्षांत येईल. तीं लिहावयाचीं तर ह्या जबाबदारीची जाणीव ठेवूनच लिहावयास पाहिजेत.

खांडेकर सुगीच्या प्रस्तावनेंत लिहितात, " शेतकरी दिसला कीं काढ फाउंटन पेन ! रात्रभर थंडीनें कुडकुडत गाडी हाकणारा पाहिला कीं, मारा हाका स्फूर्तीला. अशा रीतीनें जानपदगीतें लिहिलीं तर तीं कृत्रिम व नीरस होतील. " हें खरें आहे. तीं लिहायला खेडीं पाहिलीं पाहिजेत. त्यांतील आयुष्याशीं समरस झालें पाहिजे. खेड्यांतील जीवनाविषयीं कविता लिहिली तर ती लोकांना आवडते म्हणून कविता लिहिणें केव्हांही योग्य होणार नाहीं. प्रतिभेच्या साहाय्यानें कल्पनेच्या अश्वावर स्वार होऊन खेडवळ जीवन रेखाटलें तर सत्यसृष्टींत त्याचा मागमूसहि आढळणार नाहीं. ज्यांना खेड्यांतील जीवनाचा मुळींच अनुभव नाहीं ते अशा कल्पनारम्य कविता पाहून माना डोलावतील. पण त्या वातावरणांत राहिलेल्या अनुभविक माणसाला त्यांतील विपरीत वर्णनानें विषादच वाटेल.

या दृष्टीनें कविवर्य तांबे यांनीं लिहिलेलें " गुराख्याचें गाणें " हें सुरम्य, कल्पना–गीत डोळ्यांसमोर आणावें. गुराखी स्वतःशीं गात आहे.

कुवासना घालिती धिङगा तो महाल मी टाकितों.

* * *

समाधान हा परिस अहा मज रानांतच लाभतो,
दुःखाच्या लोहास लावितां सुखसोनें बनवितो,
चढल्या पडावयाची भिती !
गरिबा अहङ्कृती काय ती ?
काय करि त्यांचें खोटी स्तुति ?
परवशतेच्या बिडया रुप्याच्या पायांत न बांधतों.
निज हृदयाचा धनी धरणीचें धनित्व अवमानतों.

किती उदात्त, सुभव्य, कल्पना–रम्य चित्र आहे ! पण एकादा तत्त्ववेत्ता कवि शहरांतून पळून जाऊन ह्या गुराख्याच्या रूपानें प्रगटलेला दिसतो. त्यानें गुराखी क्वचितच पाहिलेला आहे. कोठेंतरी पूर्वींच्या त्याच्यासारख्या लेखकांनीं केलेलें गुराख्याचें वर्णन त्यानें वाचलें असेल इतकेंच.

‘ धनिका ताट रुप्याचें जरी
पांचहि पक्वान्नें त्यावरी
नाहीं गोडी मुखाला परी ’

असें बजावून सांगणाऱ्या या गुराख्याला श्रीमंताच्या अंतर्महालांतील गोष्टी बिनचूक माहित आहेत. ‘कशाला मन्दिल मज भरजरी’ असें म्हणतांना ह्या शेखमहंमदी गुराख्याचा आवेश मोठा प्रेक्षणीय वाटतो !

आतां, असा हा गुराखी पाहून कोणत्या शहरांतल्या माणसाला गुराखी व्हावेंसें वाटणार नाहीं बरें ! खऱ्या गुराख्याची, त्याच्या कष्टप्रद जीवनाची, त्याच्या त्रस्त मनाची या गीतानें कशी कल्पना येणार आणि त्याच्याकडे पाहतांना सहानुभूति बाळगण्याची आवश्यकता आहे हें कसें पटणार ? रा. वि. म. भुले यांना खेड्यांतील जीवनांचा अनुभव आहे; तरी त्यांचा गुराखी अलगुज वाजवीत, गाण्याच्या छन्दावर, सुरपारंबी खेळत, करवंदें–पिंपरें पाडीत, निंबुर खात, नामी इगूतीनें गुरें चारीत असतो. ह्या गुराख्याची ओळख झाल्यावर शाळेंतल्या कोणत्या मुलाला अभ्यासाचा ससेमिरा व मास्तरांची छडी चुकवून त्या गुराख्या-

बरोबर हिंडावेंसें वाटल्यावाचून राहील ? तो पिंपरें कां पाडतो हें न कळलें तरी (पिंपरें-एक लहान फळ; क्वचित् याची भाजी करतात.) त्याच्याबरोबर करवंदें खात फिरण्याचा मोह त्याला न होणें कठीण आहे. ह्या असल्या गुराख्याचें चित्र केवळ खेडवळ भाषेंत रेखाटलें तर त्याला जानपदगीत म्हणतां येईल काय ?

"आम्ही तर जंगलचीं पांखरें," (पां. श्रा. गोऱ्हे) म्हणून पांखरां-प्रमाणें नाचत गात फिरणारे शेतकरी कोठें दिसतील ? जंगलच्या मेव्याची (मधाची) माधुरी चाखीत, फळें खात बागडावें ! आपली कांदा–भाकरी मिटक्या मारीत यथेच्छ खात असता सुधेला तुच्छ मानून आपल्या कांदा–भाकरीवर सुरांची उडी पडेल म्हणून म्हणावें ! नवलाचें नाहीं का ? "राजा भिकारी माझी टोपी मागतो" असें म्हणणाऱ्या मुलांत व या जंगलच्या पांखरांत काय फरक आहे !

ओढ्याकांठीं जाऊन यथेच्छ न्याहरी करणें हें शेतकरी जीवनांतील आमच्या कवींना वाटणारें मोठें आकर्षण. शें–पन्नास मैलांतहि देशावर ओढे फारसे आढळत नाहींत. पण आमच्या जानपदगीतांत मात्र ते पावलोंपावलीं दिसतात. या ओढ्यांच्या कांठीं शेतकरी मजेंत यथेच्छ न्याहरी करतांना नेहमीं आढळतो. यथेच्छ न्याहरी करणें शेतकऱ्यांना माहीतच नसतें. दुपारची पोटांतली भडकलेली भुकेची आग शांत व्हावी म्हणून कशीतरी वेळ भागविण्याकरितां न्याहरी असते. तें जेवण नसतें. शेतकऱ्यांच्या जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला कवि न्याहरीचें असें वर्णन कधींच करणार नाहीं.

अशीं अनेक उदाहरणें दाखवितां येतील. या गीतांनीं दिशाभूल न झाली तरच आश्चर्य ! "भाजीभाकरी मिळत नसेल तर तूपसाखर खावी" असें सांगणाऱ्यांना दुष्काळग्रस्तांच्या दैन्याची जशी कल्पना येणें शक्य नाहीं, तशीच खेड्यांतील शेतकऱ्यांचें जीवन इतकें सुखपूर्ण असतें, तेथला गुराखी राजमहालाला तुच्छ मानतो, हें वाचून खेड्याच्या जीवनाची

माहिती करून घेणाऱ्या पांढरपेशांना तेथील हलाखीची, दुर्दशेची जाणीव होणें शक्य नाहीं. त्यांच्या कल्पनेंतील शेतकऱ्यामध्यें व त्यांच्यासमोर येणाऱ्या शेतकऱ्यामध्यें स्वर्ग–जमीन एवढा फरक आढळल्यावर मग या दुबळ्या गांजलेल्या शेतकऱ्याकडे त्यांचें लक्ष कां जावें ? त्याच्याविषयीं त्याला घृणा कां वाटूं नये ? त्यांनीं कां म्हणून त्याची प्रेमानें विचारपूस करावी ? हीं अशीं अनुभवावांचून लिहिलेलीं, कृत्रिम, भलतीच कल्पना मनावर बिंबवणारीं गीतें लिहिलीं जाण्यापेक्षां तीं अजिबात न लिहिलीं जाणें अधिक श्रेयस्कर नव्हे का ?

पण ही स्थिति लवकरच पालटेल अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. शिक्षणाच्या मक्तेदारीमुळें कांहीं विशिष्ट वर्गांतील लोकांवरच कृपा करणारी काव्य देवि आतां बंधमुक्त झाली आहे. शेतकरी–वर्गांतीलच, त्यांच्या ताटांत जेवलेले, त्यांच्या न्याहरींत भागीदार झालेले, त्यांच्या सुखदुःखाशीं सोयरसंबंधाच्या आपलेपणानें बांधले गेलेले, त्यांच्याबरोबर हंसले–खेळलेले, त्यांच्याबरोबर दुर्दैवाचा एकादा तरी चपाटा खाल्लेले, दिलाचे शेतकरी पण शिक्षणानें पांढरपेशे बनलेले व त्यामुळें शेतकऱ्यांच्या भावना नागर जनतेला समजावून सांगण्यास समर्थ असलेले ठोकळ, सुरेश, कोलते, सोपानदेव, ग. ह. पाटील यांच्यासारखे कवि हें कार्य करावयाला पुढें आले आहेत. जानपदगीतांच्या दृष्टीनें हें फार हितकारक आहे. अशा कवींची संख्या जसजशी वाढेल तसतशी जानपदगीतांविषयींची अपेक्षा अधिकाधिक पूर्ण होईल. रा. ठोकळांनींच जानपदगीतांचा पहिला अमूल्य प्रतिनिधिक संग्रह ‘ सुगी ’ प्रसिद्ध केला आहे.

राजकवि चंद्रशेखर यांची ‘उघडं गुपित’ ही प्रदीर्घ कविता या संग्रहाच्या प्रारंभींच सौभाग्यतिलकाप्रमाणें शोभत आहे. तिच्याबद्दल रा. खांडेकर लिहितात, “ हें खंड–काव्य म्हणजे ग्रामगीतांच्या बाजूनें केलेली उत्कृष्ट वकिलीच आहे.” या गीताची उत्कृष्ट जानपदगीत म्हणून पुष्कळ ठिकाणीं स्तुति केलेली आढळते. पण या गीताविषयीं निःपक्षपणें विचार केला तर

जानपदगीताच्या दृष्टीनें इतकें महत्त्व त्याला प्राप्त होण्याची आवश्यकता पटत नाहीं. जानपदगीतांत खेड्यांतील लोकांना आपलें चित्र दिसल्यामुळें आपुलकी वाटली पाहिजे व शहरांतील लोकांना खेड्यांतील जनतेचें सत्यस्वरूप कळावयास पाहिजे; हें जर खरें तर ह्या गोष्टी ह्या खंड-काव्यांत कितपत साधल्या आहेत? खेड्यांतल्या पुनर्विवाहाला म्होतूर म्हणतात. शहरांत व कुलवंतांत त्याची पद्धत नाहीं. जानपदगीत लिहावयाचें म्हणून म्होतूर विषय निवडला. साहाजिकच जानपदगीतांत कवितेचा अंतर्भाव झाला. संताजी व रंगू यांच्या तोंडच्या वाक्यांत काना-मात्रा ठीकठाक करून त्याला जरा नागर स्वरूप दिलें, तर तें एक अभिसारिकेचें प्रेम गीत होईल. संकेतस्थलीं प्रियकराला भेटावयास जाणाऱ्या अभिसारिकेंत व पूर्वसंकेतानें प्रियकराला भेटणाऱ्या रंगूमध्यें विशेष असा फरक नाहीं. रंगू व संताजीची पूर्वओळख होती म्हणावें तर तसें स्पष्ट कोठेंच दर्शविलेलें नाहीं. ओळख नव्हती म्हणावें तर म्होतुराकरितां उत्सुक जरी असली तरी कोणती घरंदाज घराण्यांतील गतभर्तृका, तिला मागणी घालूं इच्छिणाऱ्याला एकांतांत भेटेल व पहिल्याच भेटींत त्याची प्रेमविव्हलता पाहून इतकी बेफाम बनेल!

कवटाळुनिया तिनें तयाला अधरामृत पाजिलें
हितगुजरूपी प्रेमरसायन कानीं हें ओतलें.

खेड्यांतील घरंदाज कुलीन स्त्रिया, त्याहि संसाराचा भलाबुरा अनुभव घेतलेल्या व कांहींसा प्रौढपणा प्राप्त झालेल्या, इतक्या बेताल असतात हें का चंद्रशेखरांना सांगावयाचें आहे! त्यांना म्होतूर लावणें शक्य व अवश्य असलें तरी काय त्या आपल्याशीं म्होतूर लावण्याबद्दल विचारणाराची स्वतःच भेट घेतात व पहिल्याच भेटींत चुंबन-आलिंगनाचा रस रंग उडवूं लागतात?

पूर्ण अनुकूलता असलेल्या संताजीला 'उघड गुपित' ठेवण्याची जरूर काय होती? तें हेरायला, ह्या 'शान' पाटलाचें रडणें ऐकायला सखु कशाला पाहिजे होती? संताजीमध्यें व आधुनिक प्रेम-वीरांमध्यें काय फरक आहे?

हा संसाराचा बराच अनुभव घेतलेला प्रेमवीर रंगूला आपली हकीकत सांगतां सांगतां मूर्च्छित काय होऊन पडतो ! रंगू त्याला आलिंगन-चुंबन देऊन सावध करून धीर काय देते ! म्होतूर होऊन रंगू आणि पाटील एकांतांत। असतांहि व्याकुळतेनें पाटील तिला, "करुणा-ममता करून रहा" काय म्हणतो ! बायको घरीं आणल्यावर पुरणपोळीच्या जेवणाचें आश्वासन काय देतो ! मौज आहे. जेवणाचीं आश्वासनें द्यायला व त्यावर झुलत रहायला तीं काय शहरांतील मंडळी आहे होय ! संताजी सकूला 'सुकाची सावली' म्हणतो तर सकू संताजीला 'माजा जीव' म्हणते; आणि दोघेहि ही भाषा अनुभवलेल्या रंगूला ऐकवीत असतात. ठीक आहे झालं.

पहिल्याच भेटींत म्होतुराची व जानोशाची तयारी आहे असें सांगणाराला या विवाह-प्रकाराची माहिती कितपत असावी ? म्होतुरांत जानोसा असतो तरी का ! अशीच तऱ्हा वर्णनाचीहि आहे. "अंत्रामींच्या झऱ्याला पाझर फुटला असतां जिवाचा बत्तासा त्यांत विरून जावा" खेडवळांचें वर्णन करावयाचें म्हणून जर राजकवींनीं ठरविलें नसतें तर अशी 'गोड' उपमा त्यांनीं कधींच वापरली नसती. संताजी-रंगू वगैरेंचें प्रत्यक्ष बोलणें सोडलें तर या गीताची रचना अत्यंत संस्कृतप्रचुर गौरवास्पद अशी आहे. जानपदगीताची मागणी व अभिरुचि पुरविण्याकरितां चंद्रशेखरांनीं हें गीत लिहिलें आहे. खेड्यांतील माणसें घेऊन त्यांना खेडवळ भाषेंत बोलायला लावलें कीं पुरें ! झालें तें जानपदगीत. एवढीच पांढरपेशांची। अपेक्षा दिसल्यामुळें हा ढिलेपणा चंद्रशेखरासारख्या चोखंदळ कवीकडून झाला.

हें गीत वाचून कोठेंतरी रोमन कालची एक गोष्ट वाचल्याचें आठवलें. एका नामांकित मूर्तिकारानें एक फार सुंदर मूर्ति, अनेक दिवस झटून तयार केली; पण त्याच्या कलेचें चीज करणारा त्याला कोणीच भेटेना. तो फार उदास झाला. त्याचा एक हुशार मित्र होता. त्याला कलावंताची निराशा पहावेना. त्यानें हातोडीनें त्या मूर्तीचा एक हात उडविला,

पायाचीं बोटें तोडलीं, कांहीं ठिकाणीं तिचें अंग खरचटलें; आणि ती मूर्ति गुपचुप आपल्या शेतांत नेऊन पुरली. चार सहा दिवसांनीं त्यानें शेतांतून ती मूर्ति बाहेर काढली व प्राचीन रोमन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आपल्या शेतांत सापडल्याचें जाहीर केलें. मूर्ति पहायला लोकांचे थवेच्या थवे लोटले. अनेक कलावंतांनीं, रसिकांनीं मूर्तीच्या सौंदर्याची स्तुति केली. आपल्या प्राचीन कलेची चातुरी पाहून पुष्कळांची छाती अभिमानानें फुगली. ती मूर्ति आपल्या संग्रहीं ठेवण्याकरितां निरनिराळे धनिक द्रव्याच्या राशी ओतूं लागले. शेवटीं एका धनिकानें खूप पैसा देऊन ती मूर्ति विकत घेतली. कलावंताला अपेक्षेबाहेर द्रव्यप्राप्ति झाली. मूर्तीला थोडें विरूप करून, जरा निराळ्या स्वरूपांत दाखवितांच लोकांना तिच्या सौंदर्याचें महत्त्व वाटूं लागलें.

या गीताबद्दलहि मला तसेंच वाटतें. नागर भाषेंतील एका सुंदर प्रेम-गीतांतील पात्रांना खेडवळ पोषाक घालून, कांहीं शब्दांत मोडतोड करून वर्णनाला कोठें कोठें कल्पनेप्रमाणें कलाटणी देऊन, त्यांत शेतमळे, खबुतरें बोलावण्यांत आलीं व त्या प्रेमगीताचें जानपदगीत बनविण्यांत आलें. त्या कवितेचें जानपदगीत ह्या दृष्टीनें सविस्तर परीक्षण करण्याचें हें स्थान नाहीं. इतक्या विस्तारानें लिहिण्याचा हेतु, 'त्रिदलाचें' समीक्षक ज्याला उत्कृष्ट जानपदगीत म्हणून मानाचा मुगुट घालतात, त्यांत सुद्धां खेड्यांतील जीवनाचें कसें विपर्यस्त वर्णन आहे, हें स्पष्ट करून, खांडेकरां-सारख्या वास्तववादी, मार्मिक टीकाकाराचीसुद्धां कशी दिशाभूल होते हें दाखविण्याचा आहे. त्यांचा रशियन सरदार फ्रेंच व रशियन या दोन भाषांची खिचडी करीत असे. या गीतांत कवीनें सुसंस्कृत नागर भाषा व खेडुतांची भाषा यांचा खमंग चिवडा बनवला आहे. जानपदगीत लिहितांना राजकवीसारख्या थोर, विचारवंत, संयमी कवीला, पूर्ण माहिती करून न घेतां लिहिण्याचा जो मोह टाळतां आला नाहीं तो सामान्यांना टाळतां न आला तर विशेष नवल नाहीं.

खेड्यांतील लोकांचें विकृत स्वरूप दाखवून पूर्वींच्या ललित वाङ्मयांत विनोद उत्पन्न करीत असत. त्याचा निषेध करणारे खांडेकर 'उघडं गुपित' हें एक उत्कृष्ट जानपदगीत कां मानतात ? या गीतांतूनहि खेडुतांचें विकृत रूप दाखवून शहरांतल्या लोकांची एक प्रकारची करमणूक केली आहे, असेंच म्हणावें लागेल. हा असा प्रकार बऱ्याच जानपदगीतांतून आढळतो. याचें एक कारण जानपदगीतांना एवढी कसोटी लावलीच जात नाहीं, हें आहे. तो काव्यप्रकार नवीन असल्यामुळेंहि त्याविषयीं एवढी अपेक्षा वाचकांच्या मनांत नसेल. साधारण खेडवळ भाषा व खेड्यांतील प्रसंग हीं असलीं म्हणजे या प्रथमावस्थेंत वाचकांचें समाधान झाल्यामुळेंहि ही चालढकल तशीच चालू राहिली असेल. पण आतां तो प्रकार चालू राहणें योग्य नाहीं व इष्ट तर नाहींच नाहीं.

जानपदगीतांकडे कटाक्षानें पहाण्याची प्रवृत्ति असती तर ह्या प्रकाराला बराच आळा बसला असता. खेड्यांतील वर्णन करावयाचें या नांवाखालीं कित्येकदां नसलेल्या स्थितीचें भलतेंच वर्णन केलें जातें, तर कित्येकदां मोठें गमतीचें व अवास्तव गायन केलें जातें. शहरांतील लोकांना खेडयां-तील जीवनाची प्रत्यक्ष कल्पना नसल्यामुळें ते या गीतांना मान तुकवितांना दिसले कीं, वर्णन करणाराला हेतु-पूर्णतेचें समाधान वाटतें. पण तें भ्रामक असतें. माझे मित्र रा. ठोकळ हे जानपदगीतांचे उत्साही पुरस्कर्ते आहेत. जानपदगीतांचा पहिला संग्रह मराठी वाचकांच्या हातांत देऊन, त्या काव्य-प्रकाराला जोरानें गति देण्याचें श्रेय मराठी वाङ्मयांत त्यांनाच आहे. खेड्यांतील जीवनाची त्यांना स्वानुभवानें जाणीव आहे. तरी ते आपल्या 'गरिबीचा संसार' या कवितेमध्यें वस्तुस्थितीचा मोठा गमतीचा विपर्यास करितात. आपल्या भावी मालकिणीचा संसाराला होकार विचारतांना त्यांचा जवान म्हणतो, "माझ्या घरीं चार अवखळ बैल, गुरें, पवळी गाय हीं आहेत, औट बिघे शेती आहे, तिच्यांत पोटापुरतं पिकतं" आणि तो पुढें सांगतो, "चल, तीन दगडांचं चुलखंड मांड, माझ्या इथें

झोपायला खाट नाहीं, पांघरायला कांहीं नाहीं, पण आपल्याला परस्परांच्या मिठींत घट्ट उबारा येईल." आतां बाबुरावांनाच जर विचारलें, " का हो, चार बैल घरीं असणाऱ्या शेतकऱ्याची पांघरायला नसण्याइतकी आबाळ होत असते काय? तीन दगडांचें चुलखंड मांडून संसार करण्याची उतारकरूंसारखी त्याची स्थिति असते काय? खेडेगांवांत चार बैल बाळगणारे आसामी दोनचारच आढळतात व इतरांच्या मानानें ते बरेच सुस्थितींत असतात हें काय तुम्हांला ठाऊक नव्हतें?" ते हसून म्हणतील, "खरंच! लिहितांना भान राहिलं नाहीं बुवा!" जानपदगीतांच्या बाबतींत जितका चोखंदळ काटेकोरपणा लावणें योग्य आहे तितका लावला जात नसल्यामुळें, ओळखीच्या माहितगाराकडूनहि अशी ढिलाई होते.

जानपदगीतांतून खेड्यांतील जीवनाचें खरेंखुरें चित्र काढलें न जातां बऱ्याच वेळा तें आनंदप्रदच काढण्यांत येतें. त्याची वास्तव बाजू न दाखवितां काल्पनिक उज्ज्वल बाजूच दाखविली जाते. खेड्यांतील जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव नसला तरी कल्पनेनें व कांहीं माहितीनें त्याच्याशीं कांहीं प्रमाणांत समरस होतां येणें फारसें कठीण नाहीं. आणि त्यांच्या दुःस्थितीची कल्पना आल्यावर मग अशीं भ्रामक आनंददायक गीतें लिहिलीं जाणार नाहींत.

खेड्यांतील आयुष्यक्रमाबद्दल आमच्या लेखक-कवींनीं विलक्षण कल्पना आपल्या मनांत रुजवून ठेवलेल्या असतात, हें अशीं गीतें लिहिलीं जाण्याचें कारण आहे. सुगीच्या प्रस्तावनेंत जानपदगीतांचा परामर्ष घेतांना रा. खांडेकर लिहितात, "शहरांतील आयुष्यक्रमाला चटावलेला लेखक म्हणेल खेड्यांत आहे काय असं पहाण्यासारखं? मोडकीं तोडकीं घरं, घाणेरडे रस्ते आणि दरिद्री लोक. या मनुष्याचें पहाणें म्हणजे मुलगी पहाण्याचाच निराळा प्रकार. सौंदर्यजन्य आनंदाला आसावलेल्या अंतःकरणाला खेड्यासारखें दुसरें योग्य ठिकाण नाहीं. इथें पहाटे ट्रॅम गाड्यांनीं झोपमोड व्हायची नाहीं; उलट कुठल्या तरी देवळांतल्या चौघड्याचे मंद, शांत ध्वनि

झोपमोड न होईल अशा बेतानेंच वातावरणांतून पावलें टाकतील... खेड्यांत गजराचें घड्याळ कशाला हवें ? साद घालायला कोंबडा कधींच चुकायचा नाहीं. डोळे उघडून खिडकीबाहेर पाहिलें तर त्याची दृष्टि दगडाच्या बेडौल व अजस्र इमारतीवर कधींच पडणार नाहीं. प्रभातवायूच्या तालावर नर्तकीप्रमाणें नृत्य करणाऱ्या केळी आणि तें पाहून मान डोलवणारे माड त्याच्या स्वागताकरितां सज्ज झालेले दिसतील. त्या वेळीं पडणारें दंव पाहून जणूं कांहीं आकाश गुलाबपाणी शिंपीत आहे असाच त्याला भास होईल." आतां या कल्पना गृहीत धरून खेडयाकडे वरवरून पहाणाराला आंतील दुःखाचा डोंब कसा दिसेल ? शहरांतील खिडकींतून दिसणाऱ्या दगडी इमारतींना बेडौल म्हणायचेंच ठरवलें तर खेडयांतील खिळखिळया पडक्या झोपडयांचें दृश्य काय रम्यतर दिसेल ? नर्तन करणाऱ्या केळी, त्यांच्या तालावर नाचणारे माड, आणि गुलाबपाणी शिंपडणारें आकाश यांचा संबंध वास्तवतेपेक्षां लेखकाच्या कल्पना शक्तीशीं अधिक निकटचा नाहीं का ? देवळांतल्या चौघडयाचा ध्वनि मंद व शांत हें निश्चित म्हणायचें ठरल्यावर मग तो मधुर वाटणारच, व त्यामुळें झोपमोड होणार नाहींच. रा. खांडेकरांसारखे जानपदगीतांचा—खऱ्याखुऱ्या जानपदगीतांचा पुरस्कार करणारेहि 'खेडयांतील वातावरण फार सुंदर, आकर्षक असतें, सौंदर्यजन्य आनंदाला आसावलेल्या हृदयाला खेडयासारखें दुसरें योग्य ठिकाण नाहीं.' असेंच गृहीत धरूच चालतात मग इतरांना काय म्हणावें ! हरीभाऊ आपटे, फडके, गडकरी यांच्या वाङ्मयाला ते संगमरवरी वाङ्मय म्हणतात. त्यांनीं केलेल्या खेडयाच्या वरील वर्णनाला ते म्हणत नाहींत म्हणूनच संगमरवरी म्हणायचें नाहीं एवढेंच ! एकादा फटकळ म्हणेलहि कदाचित् ! अशा भ्रामक रीतीनें खेडयाचीं वर्णनें करण्यापेक्षां सदाशिवपेठी प्रत्यक्ष अनुभवलेलीं वर्णनेंच करणें चांगलें.

खेड्यांतील आयुष्यक्रमाची माहिती नसतां खेड्याविषयीं लिहिण्याची

इच्छा झाल्यामुळें जें लिहिलें जातें तें कसें चमत्कारिक व भ्रामक असूं शकतें, ह्याची रूपरेषा यावरून लक्षांत येण्यास हरकत नाहीं.

एक सावकार शेतकऱ्यांना म्हणत असे, "तुम्ही शेतकरी लोक किती सुखी ! आम्ही फार व्याज घेतों म्हणून तुम्ही लोक फुकट ओरडतां ! अरे, आम्ही शंभर रुपयांना वर्षाला फार तर पंचवीस तीस रुपये व्याज घेतों. पण तुम्ही लोक एक दाणा पेरतां आणि चार महिन्यांत चारशें दाणे असलेलें कणीस तुम्हांला मिळतें. चार महिन्यांत तुमचे एकाचे चारशें होतात. त्या मानानें आमचें व्याज किती कमी आहे. त्याची दामदुप्पट व्हायलाच चार वर्षें लागतात." नाहीं तरी कांय खोटें आहे यांत ? खेडे-गांवांतील शेतकऱ्यांविषयीं बऱ्याच शहरवासीयांच्या कल्पना वरच्या सारख्याच असतात.

याच्या उलट दुसरी एक तऱ्हा आहे. खेडेगांव म्हटलें कीं सर्व दुःखांचें आगर. तेथें हृदयभेदक किंकाळ्या, रडारड, तळमळ, हाहाःकार यांशिवाय कांहींच दिसणें शक्य नाहीं. तेथील लोक एकजात दारिद्र्यानें गांजलेले, सावकारांनीं पिळलेले, गांवगुंडांनीं छळलेले असेच असावयाचे. सर्वांवर प्रेतकळा आलेली. कोणी आजारी पडला कीं, औषधावांचून मरावयाचाच. तेथें चांगलें म्हणून दिसावयाचेंच नाहीं. पृथ्वीलोकावरील नरक म्हणजे खेडेगांव. ह्या व अशाच कल्पना मनांत बाळगणारे लोकहि कांहीं कमी आढळत नाहींत. ते तरी काय करतील ! खेडेगांवची सुधारणा करणें किती अवश्य आहे ! त्यांची स्थिति किती हलाखीची आहे ! ग्रामसुधा-रणेशिवाय हिंदुस्थानची उन्नति होणें कसें अशक्य आहे ! ह्याविषयीं तळमळून लिहिलेले थोरामोठ्यांचे लेख व निबंध त्यांनीं मनःपूर्वक वाचलेले असतात ना !

खेडेगांवांतील बरेच लोक दारिद्र्यानें पिळून निघालेले असले, मधून मधून कोसळणाऱ्या दुष्काळासारख्या आपत्तींनीं भाजून निघत असले, तरी

काय ते रात्रंदिवस दुःखानें तळमळतच असतात ? शेतकरी दरिद्री असला म्हणून काय तारुण्यसुलभ शृंगार त्याच्या हृदयांत खळबळत नाहीं ? त्याची तरुण घरधनीण काय नुसत्या काळया मातीची पुतळीच असते ? एकमेकांना धीर देऊन संकटप्रसंग साजरा करण्याची रीत काय शहरांतच आढळते ? वडील माणसांना चकवून शृंगाराची अनावर हौस भागविण्याची रीत काय नागर तरुणतरुणींनाच ठाऊक असते ? हंगाम बहरून डोलूं नाचूं लागला कीं आनंदानें हसणारा शेतकरी, मनुष्यस्वभावाप्रमाणें थोडीफार मौज करावयाला प्रवृत्त होणारच ! त्या वर्षीच्या जत्रेंत तो दोन पैसे जास्त उधळणारच ! आपल्या घरधनीणीकरितां नवी साडी घेऊन पोरांना दोन कपडे करणारच ! रंगपंचमीला थोडाफार रंग उधळणारच ! दिवसभर काम करून थकलेला असतांहि एकाद्या रात्रीं हुतूतूचा ( गबेटीचा ) डाव मांडणारच किंवा लेझीमडफाच्या तालाठेक्यावर नाचणारच !

पण ह्या साध्या गोष्टींचाहि कांहीं लोकांना विसर पडतो. " ग्रामीण जीवनांत मौज उपभोगतां येणेंच शक्य नाहीं, मौज करण्याच्या मनःस्थितींत शेतकरी नसतोच; तो नेहमीं उद्यांच्या विवंचनेंतच असतो." अशा प्रकारचा ते लोक समज करून घेतात. जानपदगीतें म्हणजे " हृदयस्पर्शी टाहो " एवढेंच त्यांना ठाऊक असतें.

हे लोक काय, किंवा पहिल्या प्रकारचे रसिक काय, एकाच तऱ्हेचे असतात. दोघांनाहि खेडेगांवांतील जीवनाची फारशी ओळख नसते. त्यांतील कांहीं खेडेगांवांत जात नाहींत असें नाहीं. तरीहि त्यांना तेथील जीवनाची खरी कल्पना येऊं शकत नाहीं. कित्येक वर्षें शेजारीं राहात असूनहि आपल्या शेजाऱ्याचें नांवहि माहीत करून घेण्याची आवश्यकता ज्या शहरवासीयाला वाटत नाहीं, तो खेडेगांवांत गेला तरी त्याला तेथील लोकांच्या अंतरंगांत कसें शिरतां येणार व त्याला खेडयाचा जीवनक्रम कसा कळणार ? म्हणूनच त्यांच्यापैकीं कांहीं खेडयाला स्वर्ग मानतात तर दुसरे कांहीं त्याला नरक समजतात. आणि गंमत अशी कीं, हे लोक जेव्हां

खेड्याविषयीं बोलूं–लिहूं लागतात तेव्हां अगदीं पोटतिडिक लागल्याप्रमाणें अभिनिवेषानें आपली समज पूर्ण खरी मानून बोलत असतात.

जानपदगीतें लिहावयाचीं तर खेड्यांतील जीवन–क्रमाचें अंतरंग कळणें अत्यंत अवश्य आहे, हें यावरून लक्षांत येईल. केवळ कल्पनेवर अगर उसन्या माहितीवर विसंबून ग्रामीणगीतें लिहिलीं तर तीं सुंदर होतीलहि, नाहीं असें नाहीं; पण त्यांत खेड्याचें खरें चित्र आढळण्या-ऐवजीं कवीचें कल्पनाचित्रच आढळण्याचा संभव अधिक.

जानपदगीतांचे दोन प्रकार केले जातात. नागर भाषेंत ग्रामीण जीवनाचें चित्र रेखाटण्याचा एक प्रकार व खुद्द शेतकऱ्यांच्याच भाषेंत लिहिलेल्या गीतांचा दुसरा प्रकार. या दोन प्रकारांपैकीं दुसरा प्रकार अधिक महत्त्वाचा समजला जातो. पहिल्या प्रकारांत रचनेचा साधेपणा व प्रसंग ह्यांना महत्त्व दिलें जातें. दुसऱ्या प्रकारांत खेडवळ प्रसंग व भावना हीं खेडुतांच्या भाषेंत लिहिलीं पाहिजेत अशी अपेक्षा असते.

शेतकऱ्यांचीं गीतें लिहावयाचीं तर तीं त्यांच्याच भाषेंत ,लिहावयास पाहिजेत. शेतकऱ्यांच्या भावना, शेतकऱ्यांचीं सुखदुःखें, त्यांच्या मनाची तगमग, तळमळ, त्यांचे आनंद-प्रसंग, त्यांची दुःस्थिति यांचें वर्णन त्यांच्या भाषेंतच अधिक हृदयस्पर्शी होतें. ही कल्पना या अपेक्षेच्या मुळाशीं असते. या अपेक्षेचें पुढीलप्रमाणें अनेक प्रकारें समर्थन केलेलें आपणांस आढळतें.

( १ ) बहुजनसमाजाच्या जीवनाचें चित्र बहुजन समाजाच्या भाषेंतच रेखाटावयास पाहिजे. शहरांतील मूठभर पांढरपेशा वर्गाकरितां बहुजनसमाजाच्या भाषेकडे दुर्लक्ष करून नागर भाषेंत रचना करणें केव्हांहि योग्य नाहीं.

( २ ) बहुजनसमाज निरक्षर आहे तरी तो उत्तम श्रोता आहे. त्याच्या भाषेंत त्याच्या भावना रेखाटल्या तर तो त्या भावनांशीं चटकन समरस होतो, व तो तीं गीतें आनंदानें गुणगुणूं लागतो.

( ३ ) कृषीवल–जीवन रेखाटतांना सत्याचा आभास उत्पन्न व्हावयास पाहिजे. सत्याचा आभास उत्पन्न होण्याकरितां कुणबाऊ भाषा वापरणें अवश्य आहे.

(४) शेतकऱ्यांच्या भावना नागर भाषेंत व्यक्त करणें म्हणजे मीठभाकरीच्या जेवणाकरितां कांटे-चमच्यांचा उपयोग करणें. एकाद्या रायबाची घरधनीण मडमेचा झगा घालून, डोक्यावर मातीची घागर घेऊन, पाणी आणावयास गेली तर कशी दिसेल ? नागर भाषेंत शेतकऱ्यांच्या भावना रेखाटल्या कीं, अगदीं तसें चित्र दिसतें. अँग्लोइन्डियन माणसाच्या घरच्या आयाप्रमाणें ती अर्धवट वाटते. तिच्याकडे पाहून आनंद होण्याऐवजीं विषादच वाटतो. एखादा कुणबी सुसंस्कृत भाषा बोलूं लागला तर तें वर्णन वाचतांना तो कुणबी डोळ्यांसमोर उभा राहत नाहीं.

( ५ ) जानपदगीतें खेडवळ भाषेंतच लिहिणें चांगलें. नागर भाषेंत तीं तितकीशीं परिणामकारक होत नाहींत. खेड्यांतील बहुजन–समाज नागरभाषेशीं समरसच होऊं शकत नाहीं. नागर भाषेंतील जानपदगीतें वाचून त्याचें अंतःकरण उचंबळून येत नाहीं, कीं त्या गीतांनीं त्याच्या भावना हेलावत नाहींत. तीं त्याच्या हृदयाचा ठाव घेऊं शकत नाहींत, कीं त्यांच्यामुळें त्याला भोंवतालच्या परिस्थितीचा क्षणभर विसर पडत नाहीं.

मुख्यतः वरील कारणांमुळें जानपदगीतांची भाषा खेडवळ असावी अशी अपेक्षा केली जाते. सहज वरवर पाहिलें तर तींत कांहींच अयोग्य दिसत नाहीं. त्यामुळें या बाबतींत सहसा मतभेद आढळत नाहीं.

जानपदगीतांच्या भाषेबद्दल अत्यंत आवेशानें बोलणारा एक विशिष्ट वर्ग आहे. शेतकरी वर्गांतीलच शिकून पांढरपेशा बनलेल्या कांहीं लोकांचा हा वर्ग होय. खेडुतांच्या गीतांत खेडुतांची भाषा असावी असें ते मोठ्या अभिमानानें प्रतिपादन करीत असतात. त्यांच्या विचारांतील उत्साहाचा आवेश मोठा श्रवणीय असतो.

त्यांत कोठें स्वार्थी राजकारणाचा आवेश असतो, तर कोठें खोट्या

अभिमानानें झिंगलेली बेताल वृत्ति आढळते. यांपैकीं बहुतेक विद्वानांना पांच मिनिटें शेतकऱ्यांसमोर शेतकऱ्यांच्या भाषेंत बोलावयास सांगितलें तर फारसें शक्य होणार नाहीं. केवळ शेतकऱ्यांकरितां लिहिलेले आपले लेखहि त्यांनीं नागर भाषेंतच लिहिलेले असतात. या अशा विद्वानांच्या विचार–सरणींत दिखाऊपणाचा खोटा बडेजावच आढळतो. तिला विचाराचा निकष लावण्यांत अर्थ नाहीं.

जानपदगीतांची भाषा ही खेडवळांची भाषा असावयास पाहिजे हा जो दृढमूल समज आहे, याबद्दल अधिक सूक्ष्मपणें विचार करणें जरूर आहे. केवळ भावनेच्या भरांत हा प्रश्न निकालांत काढणें तितकेसें योग्य होणार नाहीं.

बहुजनसमाजाच्या जीवनाचें चित्र बहुजनसमाजाच्या भाषेंतच रंगवावयास पाहिजे, याबद्दल कोणाचाहि मतभेद होणार नाहीं. महाराष्ट्रांतील बहुजनसमाज शेतकरी आहे, म्हणून शेतकऱ्यांच्या भावना शेतकऱ्यांच्या म्हणजे बहुजनसमाजाच्या भाषेंतच रेखाटावयास पाहिजेत हें खरें; पण महाराष्ट्रांत एक मोठी अडचण आहे. महाराष्ट्रांतील बहुजनसमाज शेतकरी असला तरी त्या सर्वांची भाषा एक नाहीं. घाटावरच्या शेतकऱ्यांची भाषा निराळी, कोकणांतील शेतकऱ्यांची भाषा निराळी, सातारा कोल्हापूरकडील भाषा निराळी, वऱ्हाडांतील भाषा निराळी, असे त्या भाषेंत अनेक प्रकार आहेत. नुसत्या पूर्वखानदेशांतच शेतकऱ्यांमध्यें दोन–तीन भाषा प्रचलित आहेत. अशी स्थिति असतां बहुजनसमाजाची भाषा कोणती समजावयाची ? खानदेशांतील लेवापाटीदारांची भाषा कोंकणांत कळणार नाहीं, कीं कोंकणची भाषा देशावर उमगणार नाहीं. जानपदगीतांची भाषा ही बहुजनसमाजाची भाषा पाहिजे म्हणून म्हणणें सोपें असलें, तरी महाराष्ट्रांतील या परिस्थितींतून मार्ग कसा काढावयाचा ? शब्दाशब्दावर टीप देऊन कविता लिहिणें कितपत योग्य होईल ? आणि अशा टीपा देऊन कविता लिहिण्यापेक्षां त्या पोटभाषेंत कविता न लिहिणें

बरें नव्हे का ? अशा टीपा देऊन लिहिलेल्या कवितेनें अपेक्षित परिणामाची आशा करणें कितपत योग्य होईल ? जेथें सहज वाचून अर्थ कळत नाहीं, तेथें आनंद कसा होईल ? भावना कशा उचंबळतील ?

महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाची जर एकच भाषा असती तर प्रश्न निराळा होता. निरनिराळ्या पोट–भाषांमध्यें थोडासाच फरक असता तरी ही अडचण उत्पन्न झाली नसती. पण तसें मुळींच नाहीं. महाराष्ट्रांतील कांहीं पोट–भाषांना आपण बहिणी-बहिणी आहोंत ही ओळख पटायलासुद्धां बरेंच कठिण जातें. अशा स्थितींत ग्रामीण गीतांकरितां बहुजनसमाजाची भाषा म्हणून कोणती भाषा ठरवावयाची ? आणि बहुजनसमाजाच्या भाषेंत जानपदगीतें लिहिलीं पाहिजेत हें म्हणणें कितपत योग्य होईल ? मूठभर पांढरपेशा वर्गाकडे दुर्लक्ष करून त्यांच्या भाषेंत लिहावयाचें नाहीं असें ठरविलें, तरी सर्वमान्य अशी बहुजनसमाजाची भाषा आपल्या महाराष्ट्रांत आहे काय ? बहुजनसमाजाच्या भाषेंत जानपदगीतें लिहिलीं पाहिजेत म्हणून टिरी बडविणारांनीं बहुजनसमाजाची भाषा निश्चितपणें ठरविली आहे काय ? निरनिराळ्या पोटभाषा बोलणारांची संख्या विचारांत घेऊन बहुजनसमाज व त्याची भाषा ठरवावयाचें झालें तर बहुजनसमाजाची भाषा कोणती ठरेल ? जरा विचार करून या प्रश्नाचें त्यांनीं उत्तर द्यावें. तें त्यांना प्रतिकूलच असेल.

शेतकऱ्यांचीं गीतें शेतकऱ्यांच्या भाषेंत अधिक हृदयस्पर्शी होतात हें मत कांहींशा पूर्व–ग्रहामुळें बनलेलें वाटतें. मराठी भाषेवर आतांपर्यंत अनेक संस्कार घडले आहेत. तिच्या स्वरूपाचा अनेक प्रकारें विकास होत आला आहे. मराठीच्या विशाल भाषावृक्षाशीं तुलना करून पहातां प्रांतिक पोटभाषा ह्या केवळ फांद्यांप्रमाणें आहेत. त्या फांद्यांमध्यें स्वतंत्र अस्तित्व व मूळ विशाल वृक्षाइतका जोम कोठून आढळणार ?

संस्कारपूर्ण नागर–भाषेपेक्षां ज्या पोट–भाषांना निश्चित स्वरूप मिळालेलें नाहीं, ज्यांची केवळ बाल्यावस्था आहे, त्यांतून भावनांचें व्यक्ती-

करण अधिक हृदयस्पर्शी होईल काय ! फार तर आपणांस असें म्हणतां येईल कीं, शेतकऱ्यांच्या भावना रेखाटावयाचा प्रयत्न करणारे जे कवि आज दिसत आहेत, त्यांची कदाचित् मराठी भाषेच्या दृष्टीनें तितकी तयारी नसल्यामुळें त्यांना शेतकऱ्यांच्या भावना मराठींतून उत्कटतेनें वर्णितां येत नाहींत. पण शेतकऱ्यांच्या भावना त्यांच्या पोट–भाषांतून अधिक हृदयस्पर्शी होऊं शकतात, हें म्हणणें फारसें पटत नाहीं. पोट-भाषांच्या मानानें अत्यंत संपन्न असलेल्या मराठींतून खेडुतांच्या भावना त्यांच्या खेडवळ भाषेइतक्या हृदयस्पर्शी होऊं शकत नाहींत असें ढोलकें वाजविण्याच्या मागें मागें कांहींतरी दुसरेंच कारण असलें पाहिजे असें वाटूं लागतें. वर दिलेल्या मतांचा सविस्तर विचार करून आपल्याला तें कारण शोधून काढण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे.

बहुजनसमाज निरक्षर असला तरी तो उत्तम श्रोता आहे. त्याच्या भावना त्याच्या भाषेंत रेखाटलेल्या असल्या कीं तो चटकन समरस होतो व तीं गीतें आनंदानें गुणगुणूं लागतो. सत्याचा आभास उत्पन्न करण्या-करितां कुणबाऊ भाषा पाहिजे, या म्हणण्यांत बरेंच तथ्य वाटतें पण विचार केल्यावर तें पटत नाहीं. शेतकऱ्यांच्या भाषेंत रचना असली कीं, तो समरस होईल, हें खरें असलें तरी नागर भाषेंत तो समरस होऊं शकत नाहीं, असा त्याचा अर्थ होत नाहीं. पण तसा समज करून घेऊन खेडुतांच्या भाषेचें भ्रामक महत्त्व वर्णन करण्याची पद्धत पडली आहे.

खेड्यांतील जनता सोप्या नागर भाषेंतहि समरस होऊन दंग होते. आतांपर्यंत तीन-चारशें वर्षें खेड्यांतील मंडळी तुकारामाच्या अभंगांच्या मोहिनीवर नाचत गात आली आहे. हे अभंग साधे सोपे असले तरी त्यांची रचना नागर आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याबरोबरच हेंहि लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं, तुकारामानें आपले अभंग पांढरपेशा वर्गा-करितां लिहिलेले नाहींत. त्यानें ते केवळ बहुजनसमाजाकरितां लिहिले आहेत, तरीहि त्यांची रचना त्यानें नागर भाषेंतच केली आहे. तुकाराम

स्वतः कुणबी असूनहि त्या वेळच्या कुणबाऊ बोलींत त्यानें अभंगरचना केली नाहीं व आज सुमारें चारशें वर्षें बहुजनसमाजाला त्या रचनेशीं समरस होण्याला कसलीच अडचण भासली नाहीं.

लावण्या–पोवाड्यांचें वाङ्मय मुख्यत्वें आमच्या बहुजनसमाजाकरितांच आहे. त्या वाङ्मयाच्या नादावर आमचा हा समाज वर्षानुवर्षें बेभान होऊन डोलत आला आहे. लावण्या-पोवाड्यांची रचना प्रायः नागर भाषेंतूनच झालेली आहे. मात्र त्या नागर भाषेचें स्वरूप मोरोपंती अगर वामन पंडिती थाटाचें नाहीं. तें अगदीं साधें सोपें आहे. प्रांतिक भाषेंतून लावण्या-पोवाड्यांची रचना क्वचितच झालेली दिसेल. आमचा बहुजन-समाज या नागर वाङ्मयावर बेहद्द खूष आहे व त्यांतील किती तरी ओळी तो नेहमीं गुणगुणतांना आढळतो ! त्यांच्या नादावर गुंगून सर्व दिवसभर मोट वाहण्याचें कष्टतर काम तो आनंदानें करीत राहतो.

महाराष्ट्रांतून कथा-कीर्तनाचा परिपाठ सर्वत्र आढळतो. हीं कथा-कीर्तनें ऐकतांना आमचा बहुजनसमाज अगदीं तल्लीन होतो. पांढरपेशा पुराणिकाचे पुराण चालू असतां वाती करण्याकडे लक्ष देणें सुलभ असेल; पण अशा कथा-कीर्तनांत रंगून गेलेल्यांना इतर कसलेंहि भान रहात नाहीं. हीं कथा-कीर्तनें नागर भाषेंतच चालतात. त्यांची भाषा बहुजनसमाजाला कळेल, पचेल इतकी सोपी असली तरी ती नागर असते हें विसरतां कामा नये. यावरून आमचा बहुजनसमाज त्याच्या बोलभाषेंतून गीत–रचना असली तरच समरस होऊं शकतो, असा गैरसमज करून घेण्याचें कारण नाहीं. हें कारण पुढें करून त्याकरितां जानपदगीतें खेडुतांच्या भाषेंत असलीं पाहिजेत हें म्हणणें कांहीं सयुक्तिक म्हणतां येणार नाहीं. बहुजनसमाज समरस होईल इतकी सोपी, साधी व सरळ रचना असली तर नागर भाषासुद्धां त्याच्या हृदयाला हात घालूं शकते.

यावरून लक्षांत येईल कीं, या कारणामुळें जानपदगीतांची भाषा खेडवळ असली पाहिजे, हें म्हणणें दुराग्रहाचें आहे. जानपदगीतांची भाषा

नागर असली तरी ती जर सोपी व साधी असली तर बहुजनसमाजाच्या हृदयाचा निःसंशय ठाव घेईल व त्याच वेळेस पांढरपेशा वर्गाला बहुजन-समाजाची नीट ओळख करून देईल.

शेतकरी निरक्षर असल्यामुळें जानपदगीतांची रचना त्याच्या बोलभाषेंत केली पाहिजे या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. तो जर साध्या नागर भाषेंत रंगूं शकतो, त्याला जर ती भाषा चांगली कळते, तर मुद्दाम बोल-भाषेंत ( त्या अनेक आहेत ) रचना करण्याचें कारण काय ? शिवाय निर-क्षर शेतकऱ्याला साक्षर करण्याचा प्रयत्न करणें आमचें अत्यंत अवश्य कर्तव्य आहे, हें आम्ही विसरावयास नको. तें काम केवळ प्रतिकूल परि-स्थितीमुळें दिरंगाईवर पडत आहे. अशा वेळेस शेतकरी निरक्षर आहे म्हणून त्याच्या बोलभाषेंत रचना करणें ठीक होईल काय ? शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचें काम करणाऱ्या वर्तमानपत्रांपैकीं एकाचीहि भाषा जर अशी बोलभाषा नसते, तर त्या लेखांच्यापेक्षां ज्यांना अधिक चिरस्थायित्व आहे, त्या गीतांची भाषा मात्र खेडवळ असावी हें म्हणणें कसें मान्य व्हावें ?

जानपदगीतांच्या रचनेच्या बाबतींत नागर भाषेचा जो बाऊ केला जातो, तो बराचसा अकारण आहे. पांचसहा वर्षांचें वय झालें कीं, खेडे-गांवांतील मुलगा शाळेंत शिकावयास येतो. त्याचा शिक्षक नागर भाषेंत त्याला शिकवतो. पहिल्यानें मुलाला थोडासा त्रास झाला तरी लवकरच त्या पांचसहा वर्षांच्या मुलालाहि शिक्षकाचें नागर बोलणें सहज समजूं लागतें. हें विचारांत घेतल्यावर जानपदगीतांची भाषा कुणबाऊ पाहिजे असा अत्याग्रह करणें कसें योग्य दिसेल ?

"जानपदगीतें नागर भाषेंत लिहिलेलीं पाहून विषाद वाटतो. मीठ—भाकरीच्या जेवणाला कांटे—चमचे वापरणें योग्य नव्हे." या म्हणण्यांत विचारापेक्षां समजुतीलाच अधिक प्राधान्य दिलेलें दिसून येईल. मीठ—भाकरीशिवाय इतर जेवण असूं शकत नाहीं असें नाहीं व त्यांना कांटे—चमचेच वापरतात असेंहि नाहीं. मीठ—भाकरीशिवाय जरा बदललेल्या

जेवणाला एकजात " खाना " समजणें कितपत मान्य करावयाचें ? आणि आपल्याच बागेंतील झकास केळीचें पान आणून त्यावर मीठ-भाकरीचें जेवण करण्यांत काय कमी मौज वाटेल ? रायबाची घरधनीण नाटी चोळीऐवजीं साडी, पातळ, पोलकें न घालतां काय एकदम मडमेचा झगाच घालील ? नागर भाषेंत व आपल्या बोलभाषेंत काय असें दोन ध्रुवांइतकें अंतर आहे ?

शेतकरी जीवनाचा आभास उत्पन्न करण्याकरितां कुणबाऊ भाषा वापरणें अत्यंत अवश्य आहे, असें कांहीं लोकांना वाटतें. कांहीं पांढरपेशे शेतकरी असतात तिकडे आपण दुर्लक्ष करूं या ! केवळ वरवर पाहिलें तर या म्हणण्यांत बराच अर्थ दिसतो. आपल्या महाराष्ट्रांत अनेक बोल-भाषा आहेत. हें क्षणभर बाजूला ठेवून जरी आपण सर्व शेतकऱ्यांची एकच भाषा मानली, तरी शेतकरी जीवनाचा आभास उत्पन्न करण्या-करितां कुणबाऊ भाषाच वापरली पाहिजे, हें म्हणणें मोठें चमत्कारिक वाटतें. मराठींतील विपुल शब्दसंपत्तीनें शेतकरी जीवनाचा जो आभास उत्पन्न करितां येत नाहीं, तो उत्पन्न करण्याकरितां बोलभाषा वापरणें ही चलाखी आहे; ती पळवाट आहे. त्या भाषेनें वाचकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याचें काम कवि करतो. नागर शब्दांनीं रेखाटतां न आलेलें चित्र काय कुणबाऊ भाषेंत अधिक यशस्वी होऊं शकतें ? त्या कुणबाऊ भाषेचा कोणी फारसा विचार करीत नसल्यामुळें व नेहमींच्या भाषेपेक्षां ती थोडीशी निराळी वाटल्यामुळें, तो आभास उत्पन्न झाल्याची समजूत होते. गडकऱ्यांनीं भावबंधनांत रंडु, गुंडु, कुंडु या केवळ कपोलकल्पित भ्रामक शब्दांनीं कानडीचा आभास उत्पन्न केला आहे. कानडी भाषा जाण-णाऱ्या माणसांना त्याचा फार संताप येतो. आम्हांला तेथें सत्याभास वाटतो, तो त्यांतील विक्षिप्तपणामुळें. त्यामध्यें सत्याचा आभास तर नाहींच, पण थोडासा चहाटळपणाच आहे. कांहींसा असाच आभास आमचे कांहीं कवि बोलभाषेनें उत्पन्न करतात. त्याकरितां पुष्कळदां रंडु,

गुंडु या शब्दांसारखीच तेहि चलाखी करितात. (त्याबद्दल पुढें विवेचन येणार आहे.)

बोलभाषेच्या नाविन्यानें गोंधळून गेलेल्या रसिकांकडून कवींना टाळी मिळते. पण अशा टाळी मिळालेल्या काव्यांत शेतकरी जीवनाचें प्रभावी चित्र आढळतेंच असें नाहीं. त्यांतील बोलभाषा काढून त्या ठिकाणीं नागर भाषेची योजना केल्यावर अगर त्या कवितेचे दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत भाषांतर झाल्यावर जर तिला टाळी मिळेल, तिच्यांतील काव्यगुण कमी होणार नाहीं, तिच्यांत शेतकरी जीवनाचें प्रतिबिंब कायम राहील, तर तें खरें जानपदगीत समजावयास हरकत नाहीं. केवळ दहा पांच कुणबाऊ शब्द कोंबून शेतकरी, गाडीवान, मजूर यांना पकडून कविता लिहिली कीं, तें जानपदगीत अशी आम्हीं समजूत करून घेतली आहे. एकादा लहान मुलगा आपल्या वकील असलेल्या बापाची पगडी व चष्मा घालून जसा वकील बनतो, तशी केवळ कुणबाऊ भाषेमुळें जानपदगीतांचा मानाचा तुरा मिळविणाऱ्या कांहीं कवितांची स्थिति असते. त्यांतील काव्यगुणांकडे मुळींच लक्ष दिलें जात नाहीं. कुणबाऊ भाषा हा त्या गीतांचा ट्रेड मार्क (!) असतो. एकाद्याच्या अंगावर भगवे कपडे दिसले कीं, आपण त्याला संन्यासी मानतों. पण तो खरा संन्यासी असतोच असें नाहीं. भगव्या कपड्यांनीं संन्यासी बनलेल्यांत लबाडच पुष्कळ असतात. ही कुणबाऊ भाषा म्हणजे जानपदगीतांची भगवी कफनी. ती दिसली कीं झालें जानपदगीत. पण हें कितपत योग्य होईल ? पायांत घुंगुर असले कीं, तिला नर्तकी समजायचें; विदुषकाची टोपी डोक्यावर ठेवलेली असली कीं, त्याच्या प्रत्येक वाक्यांत विनोद मानावयाचा; हातांत पुस्तकें दिसलीं कीं, त्याला विद्वान् समजायचें. हें जितकें युक्त तितकेंच केवळ कुणबाऊ शब्दांमुळें एकाद्या गीताला जानपदगीत मानणें युक्त. हातांत पुस्तक असणाराला अगदीं अडाणी खेडूत अजूनहि विद्वान् मानतात. आमचे शिकलेले, बुद्धिमान्, शहरवासी लोकहि कुणबाऊ भाषा

दिसतांच शेतकरी जीवनाचा आभास उत्पन्न होतो असें म्हणतात व त्यांच्यासारखीच चूक करितात.

केवळ बोलभाषांमुळें जानपदगीतांना महत्त्व देणें योग्य नाहीं, हें यावरून लक्षांत येईल. पण म्हणून बोलभाषा त्यांत असूंच नये हें म्हणणें कितपत योग्य होईल ? ग्रामीण–गीतांमध्यें बोलभाषा असावी असा पुरस्कार केला गेल्यामुळें, तशा प्रकारची रचना मराठींत बरीच झाली आहे. त्या रचनेंतील नागर व ग्रामीण भाषांच्या मिश्रणाच्या गंगाजमनी स्वरूपाकडे पूर्ण दुर्लक्ष केलें, तरी कांहीं गीतांतील बोलभाषेच्या बाबतींत कित्येकदां मोठी गंमत आढळते.

महाराष्ट्रांत अनेक बोलभाषा आहेत व एकाद्याला एक बोलभाषा येत असली तरी दुसऱ्या येतातच असें नाहीं. त्यामुळें बोलभाषेंत म्हणून जी रचना केली जाते ती खरोखर रूढ आहे कीं नाहीं हें कळणें मोठें कठीण जातें. कित्येकदां तर वाचणाराला कोणतीच बोलभाषा येत नसते. नागर भाषेपेक्षां कांहींशी निराळी रचना दिसली कीं, तो तिला बोलभाषा म्हणतो. त्याच्यापुढें आलेले शब्द बोलभाषेंत खरोखर आहेत कीं नाहींत, असल्यास ते कसे आहेत, याचा तो विचारहि करीत नाहीं. यामुळें कळत न कळत सोईची सवलत कवींकडून घेतली जाते. बहुजनसमाजाच्या तोंडीं नसलेले कांहीं शब्द कवींकडून त्याच्या तोंडीं घातले जातात. कित्येक बोलभाषेंतील शब्द चालींत बसतील असे बदलले जातात. तर कांहीं नागर भाषेंतील शब्द थोडेसे वेडेवाकडे करून बोलभाषेंतील म्हणून खपविले जातात. खरोखर जे शब्द बोलभाषेंत मुळींच नसतात, ते शब्द-सुद्धां बोलभाषेंतील म्हणून आमचे कवि रसिकांना दडपून सांगतात व आमचे रसिक त्यांना मुकाट मान्यता देतात. कित्येकदां एका बोलभाषेंत रचना असतां, दुसऱ्याच बोलभाषेंतील शब्द घुसडून दिलेले आढळतात. आणि त्याबद्दलहि रसिक बेफिकीर असतात. पुढील नमुने पहा.

सतंजीव व्हा, सुपूत होतील काय म्हंते तें पहा. ( चंद्रशेखर )

**अंत्रामीचा** पाजर फुटला झरा. ( चंद्रशेखर )

**स्मिर्ती** झाली मला मागली मालकिणीची भारी ( गिरीश )

जाड टाइपांतील शब्द माझ्या समजुतीप्रमाणें बोलभाषांत नाहींत. ते शतंजीव, सुपुत्र, अंतरात्मा व स्मृति या शब्दांपासून कवींनीं बनविले आहेत. कवींनीं आपल्या मर्जीप्रमाणें अशीं रूपें बहुजनसमाजाकरितां तयार केलीं आहेत. स्मिर्तीबद्दल खेडूत सय, याद, आठवन यांपैकीं एकादा शब्द घालील.

चालंल द्ये या **वख्ती** च्चोळीबी बांधत्वो कपाळाला ( चंद्रशेखर )

न्यारिचा **वकुत** व्होईल. मैतरणी बिगिबिगि चाल ( यशवंत )

परंतु ' आला **वक्त** तरी मी न्हाई तो इकनार ( गिरीश )

वाजते फटाफट गोफण **माच्यावरी** ( मायदेव )

उभी ही कोण **मावच्यावरी** ( कोलते )

ती दूर उभी पहा **माचव्यावरी** ( राजा बढे )

बैसतो खातच **माळ्यावरी** ( सुरेश ).

वखत व माळा यांचीं कवींनीं उपयोजिलेलीं रूपें पहा. यांतील एकादें बोलभाषेंत असलें तरी बाकीचीं रूपें कवींनीं आपल्या सोईप्रमाणें थोडी-फार बदलून बनविलीं आहेत.

**जित्राबाला** गोठा अपुरा ( घुले )

शिवारिं **जित्राप** नागावानी ( गिरीश )

जित्रब या शब्दांचीं हीं रूपें आहेत. याप्रमाणेंच शुक्र–सुकदेव–सुकीर, न्याहारी–न्यहारी–न्यारि–न्हिरी, जमिन–जिमिन–जुमिन अशीं अनेक निरनिराळीं रूपें कवींनीं वापरलीं आहेत. त्यांतील एकादेंच रूप बोलभाषेंत असतें.

उशिर न **अक्षी** लावा कांहीं
अटपा **बिगिबिगि** करा ग घाई
तठी नाहिं तर माज्या पायीं

रडल घरधनी–तुम्ही चाला व समद्या जनी ( प्रो. कोलते )

बिगि बांधा भारे··· तुम्ही चाला चाला व ( प्रो. भवानीशंकर पंडित )

या लेवा पाटीदारांच्या भाषेतील कवितांत अक्षी, बिगिबिगि व बिगि हे शब्द कां आले ? एकाच कडव्यांत एकाच अर्थाचा 'ग' हा नागर शब्द व 'व' हा बोलभाषेतील शब्द असे भिन्नपणें कां येऊं शकतात ?

जानपदगीतांतील भाषेबद्दल रसिकांनीं जर चोखंदळ वृत्ति ठेवली असती तर शब्दाशब्दाचा कीस काढणाऱ्या प्रा. कोलते व प्रा. भवानीशंकर पंडित यांच्यासारख्या भाषापंडितांकडून हें दुर्लक्ष झालें असतें का ? पण जोंपर्यंत आमच्या रसिकांचा शेतकरी न्यहारीला 'आम्टी, दहीं' घेतों, उसाच्या मळ्याचा व आंबराईचा धनी, आपल्या आवडत्या घरधनिणीला–कुलवंताच्या मुलीला 'जुन्या पटकुरांत' पाहून समाधान मानतो, शेतकऱ्याच्या स्त्रिया 'तणाचे भारे' बांधून विकायला नेतात, तोंपर्यंत अशी रचना न झाली, अशी हयगय न झाली तरच नवल !

कुणबाऊ भाषा लिहितांना उच्चाराप्रमाणें लिहिण्याचा प्रयत्न केलेला असतो. त्यामुळें तर ती वाचतांना अंधारांत चाचपडल्यासारखें होतें. उच्चाराप्रमाणें नागर भाषासुद्धां लिहिण्याची पद्धत नाहीं. 'सिंह' हा आम्ही 'सिंव्ह' असा लिहीत नाहीं. मराठींत अचा उच्चार ऱ्हस्व व दीर्घहि आहे, पण तो लिहिण्याची सोय नाहीं. 'कमळ' या शब्दांतील 'क मधील अचा उच्चार दीर्घ आहे, 'म' मधील अ प्रदीर्घ आहे व 'ळ' मधील ऱ्हस्व आहे. यांतील ऱ्हस्वदीर्घत्वाचा भेद जरी सूक्ष्म आहे तरी तो आहे हें निःसंशय. मराठींत तो लिहून दाखवितां येत नाहीं. 'कमळाला' असें म्हणतांच कमळ यांतील दीर्घ म ऱ्हस्व होतो. भगवान, तरवार हे शब्द भग्वान्, तर्वार् असे लिहिले पाहिजेत. नागर भाषा आम्ही उच्चाराप्रमाणें लिहिण्याचें अजून मनावर घेत नाहीं. पण बोलभाषा लिहितांना मात्र त्या गोष्टीला भलतेंच महत्त्व देतों. रातोरात, जातो, दें, हीं रूपें सरळपणें लिहा-

वयाचें सोडून अल्पशा उच्चार-भेदाकरितां आम्ही खुशाल रात्वोरात, जात्वो, ह्ये अशीं लिहून त्या शब्दांची घिंड काढतों.

बोलभाषांच्या अनिश्चित स्वरूपामुळें अशी विदूषकी तऱ्हा होते. आणि बोलभाषांचा नसता उमाळा जर थोडासा आवरून धरला तर हा प्रकार कांहीं चांगला नाहीं, हें मान्य व्हायला हरकत दिसत नाहीं. ज्या बोलभाषांच्या स्वरूपाच्या बाबतींत आपण सहज चकतों, त्या बोलभाषांनीं शेतकरी जीवनाचा आभास उत्पन्न होतो, या म्हणण्यांत तरी भावना-वशतेपेक्षां अधिक तथ्य कोणतें आहे ? कोणत्याहि बोलभाषेत नसलेले नागर भाषेंतील कांहीं शब्द घेऊन, त्यांना कानामात्रा जोडून, जरा वेडे-वाकडे बनवून जर ते बोलभाषेंतील म्हणून आमच्यासमोर एकाद्यानें ठेविले तर आम्ही त्या रचनेवर खूष होऊं व त्यामुळें सत्याचा आभास उत्पन्न झाला असें बेधडक म्हणूं.

शेतकरी जीवनाचा आभास उत्पन्न होण्याकरितां ग्रामीण गीतांमध्यें कुणबाऊ भाषा पाहिजे असें म्हणणारांच्या मनोवृत्तीचेंहि निरीक्षण करणें अनाठायीं होणार नाहीं.

यांत शेतकऱ्यांतील सुशिक्षितांपैकीं जे थोडेसे लोक आहेत ते सोडून दिले पाहिजेत. ते विचारापेक्षां विकारालाच बळी पडलेले दिसतात. त्यांना त्यांच्या बोलभाषांचेंच महत्त्व मराठी नागर भाषेपेक्षां जास्त वाटतें. त्यांच्या बोलभाषेचा ( अनेक बोलभाषांपैकीं कोणती हें त्याचें त्यांनाच सांगतां येत नाहीं. ) महाराष्ट्रांतच नव्हे तर बृहन्महाराष्ट्रांत प्रसार व्हावा असें त्यांना वाटतें. मात्र हें सर्व प्रसंगीं अभिमानानें सांगण्याशिवाय त्यांच्या हातून कांहींच कार्य होत नाहीं. त्यांच्या लेखांतून व बोलण्यांतून बोलभाषांची पूर्ण उपेक्षाच झालेली दिसते. ते स्वत: घरींदारीं नागर भाषाच बोलतात. मराठी जाणणारा गुजराथी अगर मारवाडी बाहेर मराठी बोलत असला, तरी घरीं अगर दुसऱ्या गुजराथ्याशीं-मारवाड्याशीं बोलतांना आपल्या मातृ-भाषेंतच बोलतो. शेतकरी वर्गांतील ह्या मताचीं दोन सुशिक्षित माणसें

भेटलीं तर तीं आपल्या बोलभाषेंत न बोलतां नागर मराठींतच बोलतात. यावरून या अभिमानाच्या दिखाऊपणाची कल्पना येईल.

पांढरपेशा वर्गांतीलहि बहुतेक सर्वच लोक जानपदगीतांतून बोलभाषेची अपेक्षा करितात. त्यांच्या या म्हणण्याचा विचार करण्यापूर्वी त्यांच्या मनोवृत्तीचीहि ओळख करून घेणें अवश्य आहे.

शेतकरी वर्गांतील एकादा सुशिक्षित या लोकांबरोबर बोलत असतां त्याच्या तोंडीं जर चुकून एकादा बोलभाषेंतील शब्द आला तर त्यांच्याकडून त्याची चेष्टा केली जाते. वेळीं अवेळीं त्या शब्दाचा उच्चार करून त्याला चिडविण्यांत व डिवचण्यांत त्यांना फार आनंद होतो. ग्रामीण भाषा बोलणारांपेक्षां आपण श्रेष्ठ आहोंत असा भ्रामक अहंभाव त्यांच्या मनांत असतो, व परिस्थितीमुळें पुष्कळदां त्यांचा तो भाव दृढमूल होतो. बोलभाषेची अवहेलना करण्यांत आनंद मानणाऱ्या या लोकांकडून ग्रामीणगीतांत बोलभाषा असावी असें आवेशानें प्रतिपादिलें जातें. विचार केल्यावर त्यांच्या त्या प्रतिपादनाचें महत्त्व कसें पटावें ? त्यांच्या अपेक्षेच्या प्रामाणिकपणाबद्दल जर एकाद्यानें संशय घेतला, तर तो अगदींच निराधार म्हणतां येईल काय !

शेतकऱ्यांतील एका सुशिक्षित गृहस्थाशीं याविषयीं बोलत असतां तो मला म्हणाला, "लिखाणांतून बोलभाषेची अपेक्षा करणारे पांढरपेशा वर्गांतील लोक 'ढोंगी, बदमाश अगर बावळट' असतात. बोलभाषेबद्दल त्यांना प्रेम अगर सहानुभूति मुळींच वाटत नाहीं. त्यांच्यापैकीं कांहीं जानपदगीतांबद्दल बोलणें निघालें कीं, त्या भाषेच्या अवश्यकतेबद्दल प्रेमाचा पान्हा फुटल्याप्रमाणें तळमळून बोलतात, ते ढोंगी होत. दुसरे कांहीं बोलभाषेची चेष्टा करण्याची हौस पुरवून घेतां यावी म्हणून तसें समर्थन करण्याचा आव आणतात, ते बदमाश असतात. कित्येकांना सत्याचा आभास उत्पन्न व्हावा म्हणून त्या गीतांतून बोलभाषा असावी असें खरोखरच वाटतें; पण त्यांच्या ह्या वाटण्याच्या मुळाशीं विचार नसून

पारंपारिक समज तेवढा असतो; त्यांनीं आपलें मत विचारपूर्वक ठरविलेलें नसतें. हे रूढ विचारांची री ओढणारे लोक बावळट होत." या विधानांतील चिडखोर वृत्तीची अत्यंतिकता मनाला न रुचली तरी त्यांत तथ्य नाहीं असें म्हणतां येत नाहीं.

'वऱ्हाडचा पाटील' हें नाटक पाहून आपल्या मनांत जे विचार उसळले ते त्यानें मला अत्यंत त्वेषानें सांगितलें. "त्यांतील पंढरी पाटील, विटोबा पाटील हे नागर मराठी बोलत असतात, व त्याबद्दल कोणालाहि विषाद अगर नवल वाटत नाहीं. पंढरी पाटलांचा आश्रित रंगभूमीवर वेळीं अवेळीं वऱ्हाडी शब्द उच्चारून हंशा पिकवीत असतो. ते शब्द, त्यांची उच्चारण्याची तऱ्हा, त्यांचा अर्थ यांत थोडीशीं वास्तवता असली तरी त्यांनीं होणारा परिणाम मात्र अत्यंत तिरस्करणीय वाटतो. त्या शब्दांनीं वऱ्हाडी भाषेचा आभास उत्पन्न करण्याऐवजीं केवळ विनोद निर्माण करण्याचाच लेखक प्रयत्न करतो. पांढरपेशा प्रेक्षकांचें त्यावेळीं हंसून हंसून पोट दुखूं लागतें. पण आमच्यासारख्या लोकांच्या मनाची स्थिति फार चमत्कारिक होते. ते शब्द रंगभूमीवर उच्चारिले जातांच पाठीवर चाबूक सडकल्याप्रमाणें मला दुःख होत होतें. माझ्याबरोबर असलेल्या मित्रांपैकीं एक-दोघे पांढरपेशे मित्र त्याच वेळेस गालांतल्या गालांत किंचित् हंसून माझ्याकडे पहात असत. तेव्हां जखमेवर मीठ चोळल्याप्रमाणें माझी तगमग होई. आमच्या बोलभाषांचा असा उपयोग पाहून, आनंदानें हसणारांनीं निराळा मुखवटा घालून त्यांच्या उपयुक्ततेचें समर्थन करावें हें क्षुद्र मनोवृत्तीचें लक्षण नव्हे काय? कोकणांतील ब्राह्मण लोक नाकांत बोलतात म्हणून आमच्यांपैकीं एकाद्यानें आपल्या लिखाणांत अनुनासिकांची पंचकडी त्या लोकांच्या बोलण्यांत नेहमीच येतां जातां कोंबून ती सत्याभासाकरितां आहे, म्हणून समर्थन केलें तर त्या लोकांना तें रुचेल काय?" या संतापांतील आततायी वृत्ति

मान्य केली तरी तो सकारण आहे हें कबूल करणें भाग पडतें; आणि पांढरपेशा वर्गांपैकीं बऱ्याच लोकांची बोलभाषांविषयींची कळकळ कोणत्या स्वरूपाची असते याची पण त्यावरून कल्पना येते.

तिसरा वर्ग खुद्द बहुजनसमाजाचा. हा समाज याबद्दल कांटेतोलपणें विचार करीतच नाहीं. अगदीं सोपी नागर भाषा असली तर त्याला चालते व बोलभाषा असली तरी ती त्याला रुचते. त्या समाजाला कळेल असें असलें म्हणजे त्याचें समाधान होतें.

या निरनिराळ्या लोकांच्या विचार–सरणीवरून काव्यांत बोलभाषेला महत्त्व देणें तितकेंसें सयुक्तिक वाटत नाहीं हें दिसून येईल. पण केवळ या लोकांच्या मतावरूनच आपल्याला ह्या प्रश्नाचा निकाल ठरविणें योग्य होणार नाहीं. पूर्ण निकाल देण्यापूर्वीं दुसऱ्याहि कांहीं गोष्टींचा विचार केला पाहिजे. बोलभाषांच्या अभिमानाचा व जिव्हाळ्याचा विचार करितांना भाषेच्या एकरूपतेचा विचार करणें आपणांस अत्यंत जरूर आहे.

निरनिराळ्या व्यक्तींमध्यें आपलेपणाचें नातें उत्पन्न होण्यास भाषा हें अत्यंत प्रभावी साधन आहे. परदेशांत आपली भाषा बोलणारा भेटला असतां हें फार लवकर पटतें. केवळ एका भाषेमुळें दोन माणसांमध्यें चटकन आपुलकीचा जिव्हाळा उत्पन्न होतो. भाषेच्या एका ताटांत बसणारांमध्यें एकमेकांविषयीं विश्वास व प्रेम हीं उत्पन्न व्हावयास वेळ लागत नाहीं. भाषेंतील विभिन्नत्व एकमेकांना जवळ जवळ आणण्यास अंतरायाप्रमाणें कारण होतें. निराळ्या भाषेचा पडदा मध्यें असला तर परस्परांची ओळख होण्यास वेळ लागतो. राष्ट्रीय एकीकरणाला एका भाषेची किती जरुरी आहे हें आज सर्वांना पटलें आहे.

अशा वेळेस मराठींतील बोलभाषांना नसतें महत्त्व देऊन त्यांचा व नागर भाषेचा सवता सुभा निर्माण करणें कितपत योग्य होईल! आमच्यामध्यें जातिभेद आहेत तेवढे पुरे झाले! आणखी भाषाभेद उत्पन्न व्हावयाला नकोत. आजच त्यामुळें खोट्या श्रेष्ठत्वाच्या भावना उत्पन्न झालेल्या

दिसतात. पांढरपेशा वर्ग व बहुजनसमाज यांच्यामधील अविश्वास व दूरत्व कमी होऊन ते एकमेकांच्या अधिक जवळ यावयास पाहिजेत असें जर आम्हांस प्रामाणिकपणें वाटत असेल, तर खेडुतांच्या नांवाखालींसुद्धां असे भाषाभेद वाढविण्याचें विष समाज-शरिरांत प्रवेश करणार नाहीं, याची आम्ही खबरदारी घ्यावयास पाहिजे.

आज कानडी, गुजराथी, इंग्रजी या भाषा मराठीवर थोडेफार आक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मराठीला त्यांना तोंड द्यावयाचें आहे. अशा वेळेस आपसांतील पोटभेदांचें समर्थन करून वादंग माजविणें बरें होईल काय ? बहुजनसमाजाची भाषा लिहिण्यास व तिला ग्रांथिक रूप देण्यास कांहींच हरकत नाहीं; असें म्हणून त्याप्रमाणें जर वागावयाचें ठरविलें, तर महाराष्ट्रांत बहुजनसमाजाची एक भाषा नसल्यामुळें, निरनिराळ्या भागांत निरानिराळ्या भाषा लिहिण्याची पद्धत सुरू होईल आणि बोलभाषांची बजबजपुरी माजेल.

बोलभाषांचें समर्थन करीत असतां पुढील एक गोष्ट नजरेसमोर ठेवली तर त्यांच्याविषयींच्या अभिमानानें जड झालेलें पारडें थोडेसें हलकें झाल्याशिवाय राहणार नाहीं.

बहुजनसमाजांतील स्त्रिया आपल्या करमणुकीकरितां अगर जात्यावर म्हणण्याकरितां ओव्या रचतात. त्यांच्या समजाप्रमाणें त्या ओव्यांची रचना करितात. नेहमींच्या भाषेपेक्षां कवित्वांत-ओव्यांत अधिक प्रसाद, अर्थगौरव व भारदस्तपणा असावा असें त्यांना वाटत असतें. म्हणून बोलभाषेंत बहुशः रूढ नसलेले पण त्यांना माहीत असलेले नागर शब्द आपल्या ओव्यांमध्यें त्यांच्याकडून योजिले जातात.

मुखाशी लहान मुख-येक सबद बोला
माले समजावती-चुलते-राजस
माह्या मायच्या रान्हनींत-वहिनीबाई रांधे
कसें कोन्ह्या गाई जाता-जातां मायेचे मोहन

जलदीं या रामा–राजमंदिरीं येखली
भर्तोराचं ( भ्रताराचं ) राज–घेईन देईन
राज पुतराचं ( पुत्राचं )–हात वर्जित होईन
तुमच्या पोटचा गोया–माझ्या रत्नगिरी
रामलक्षिमन–तिसरी सितामाई–
खळे रुतती चरणा–दया कैकयीले नहीं.

वरील ओळी वऱ्हाडी स्त्रीगीतांतील आहेत. जाड शब्द वऱ्हाडी बोलभाषेंत रूढ नाहींत म्हटलें तरी चालेल. पोथी–पुराणें अगर कीर्तनें ऐकून लक्षांत राहिलेले हे शब्द काव्य–रचना करितांना मुद्दाम योजिलेले आहेत. कवितावाङ्मयाबद्दल ही जी भावना ह्या ओव्या रचणाऱ्या भगिनींच्या मनांत असते ती अगदींच उपेक्षणीय म्हणतां येणार नाहीं, हें आम्हीहि लक्षांत घेणें योग्य होणार नाहीं काय ? मात्र बोलभाषेपेक्षां काव्यरचनेंत अधिक प्रसाद व अर्थगौरव असावयास पाहिजे. याचा अर्थ मोरोपंती थाट असावा असा नाहीं.

मराठीमध्यें जानपदगीतांची कल्पना इंग्रजींतील पॅस्टोरल सॉंग्जवरून आली असें म्हणण्यास हरकत नाहीं. इंग्रजींतील हीं गीतें सोप्या पण ग्रांथिक इंग्रजींतच लिहिलेलीं आहेत. इंग्लंडमध्येंहि इकडच्याप्रमाणेंच अंतरा–अंतरावर बोलभाषा असून त्यांच्यांत व ग्रांथिक इंग्रजींत बराच फरक आढळतो. या धनगरी गीतांतून कोठेंहि बोलभाषा वापरलेली नाहीं. वापरलेला असलाच तर क्वचित् एकादा–दुसरा शब्द वापरलेला मात्र आढळतो. भावनेला अनुकूल असें वातावरण निर्माण करण्याकरितां इंग्लंडमधील कोणत्याहि कवीला तिकडील बोलभाषा वापरण्याची आवश्यकता वाटली नाहीं. नागर भाषेंतच आपली धनगरी गीतें लिहून तिकडील कवींनीं धनगरी जीवनाचें चित्र उभें केलेलें आहे.

बंगाली भाषेंत बहुजनसमाजाकरितां लिहिलेलीं गीतेंहि पोटभाषांतील

भाषाभेदापासून अलिप्त आहेत. ती नागर बंगालींतच पण सोप्या भाषेंत लिहिलीं आहेत.

मग मराठींतील जानपदगीतांतच बोलभाषा वापरणें कसें समर्थनीय ठरेल ? बोलभाषेंतील शब्द वापरल्याशिवाय शेतकरी जीवनाचा आभास उत्पन्न करणें मराठींतच कां अशक्य व्हावें ! कुणबाऊ शब्दांशिवाय आमच्या ग्रामगीतांची रचना आम्हांला कां संतोषप्रद होऊं नये !

या बोलभाषांपैकीं एकादीला पुढें मागें ग्रांथिक स्वरूप येणार आहे काय ? तें येणें शक्य असेल तर त्या बोलभाषेंत रचना करणें अयोग्य असें कोणीच म्हणणार नाहीं; पण तें अशक्य दिसतें.

विचार केला तर आपल्याला असें दिसून येईल कीं, शिक्षणाच्या प्रसारामुळें बोलभाषांची गळचेपी होत आहे. शिक्षणाचें प्रमाण जसजसें वाढत आहे, तसतशा बोलभाषा मागें पडत आहेत. पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरे वाचण्याची आवड खेडयांपाडयांतूनसुद्धां पसरलेली दिसून येत असून, नागर भाषेचा त्यामुळें सरसहा फैलाव होत आहे. आम्हांला सर्वच शेतकरी वर्ग साक्षर करावयाचा आहे, आणि आमच्या भाग्यानें हें कार्य जितकें लवकर झालें तितकें चांगलें. तें होतांच बोलभाषा मागें पडतील.

शेतकरी वर्गांतील सुशिक्षित मनुष्यच नव्हे तर कोणीहि सुशिक्षित गृहस्थ खेड्यांत कांहीं प्रचार करण्यास गेला, तर तो कधीं बोलभाषेंतून बोलत नाहीं. (त्याला एक अपवाद मला माहीत आहे.) तो सोप्या नागर भाषेंतच बोलतो. खेड्यांतील स्त्री-पुरुषांना ती भाषा कळते. बहुजनसमाजाकरितां लिहिलेलीं वर्तमानपत्रें नागर भाषेंतच असतात, हें मागें आलेंच आहे. असें असतां प्रासंगिक प्रचार—कार्यापेक्षां व वर्तमानपत्रापेक्षां ज्याला अधिक स्थैर्य व दीर्घ जीवन आहे ,त्या काव्यप्रकारांत मात्र बोलभाषांचा उपयोग केला पाहिजे, हें म्हणणें तितकेंसें रुचत नाहीं.

या सर्व गोष्टींचा विचार केल्यावर जानपदगीतें बोलभाषेंतूनच लिहिलीं

पाहिजेत हें म्हणणें दुराग्रहाचें आहे हें दिसून येईल. ती नागर भाषेंत लिहिल्यानेंच त्यांच्यापासून अपेक्षिलेल्या गोष्टी साध्य होण्याचा संभव आहे.

आतां ओघानेंच असा प्रश्न येतो कीं, ग्रामीणगीतांत कुणबाऊ भाषा वापरणेंच अयोग्य आहे काय ? ती भाषा वापरली म्हणूनच केवळ एकाद्या काव्यगुणांनीं युक्त अशा कवितेलाहि कमी लेखावयाचें काय ? हा प्रश्न केवळ भावनेनें निकालांत न काढतां विचारपूर्वकच सोडवावयास पाहिजे.

बोलभाषेंत रचना असलेलीं कांहीं सुंदर गीतें आमच्या कवींनीं लिहिलेलीं आहेत. त्या गीतांतील बोलभाषेचें स्वरूप सहज बदलून नागर करितां येईल, व तें तसें बदललें तरी त्यांतील काव्यगुण कमी होणार नाहीं, हें चोखंदळपणानें पाहिलें तरी पटेल. बोलभाषेंतलि केवळ दोन चार शब्दांचाच उपयोग करूनहि, आमच्या कांहीं कवींनीं सुंदर जानपदगीतें लिहिलीं आहेत. रसिकांना अशीं गीतें सहज शोधून काढतां येतील. गद्य वाङ्मयांतसुद्धां आपल्या लेखनकौशल्यामुळें बोलभाषेचा फारसा उपयोग न करतांहि खेडुताचें सुंदर चित्र एकादा लेखक सहज निर्माण करूं शकतो. रा. घाटे यांचा नाना न्हावी हें सहज रीतीनें रा. भडभड्याप्रमाणें पटवून देईल. उलट खांडेकरांचे 'माका तुका' दिसतांच एकदम त्याला बगल देऊन पुढें जाणारे वाचकच जास्त आढळतील.

शेतकरी जीवनाचा आभास उत्पन्न करण्याकरितां कवितेंत एकादा दुसरा बोलभाषेंतील शब्द घालावयास हरकत नाहीं. पण तो शब्द नागरभाषेपेक्षां अधिक अर्थवाहक पाहिजे. त्याचें स्वरूप मुद्दाम वेडेंवाकडें केलेलें नको. बोलभाषेंत रूढ असलेले पण नागर भाषेंत नसलेले शब्द व वाक्प्रचार कवितेंत आले तर त्यांचा कधींच अनिष्ट परिणाम होणार नाहीं. नागर भाषेच्या शब्दसंपत्तींत त्यामुळें भरच पडेल. मात्र शब्दकोश द्यावा लागेल इतकी ती यादी नको. ती यादी जर तितकी लांब असेल तर काव्यगुणांची तिच्यामुळें कुचंबणा होईल. सुंदर चेहऱ्यावर लहानसा तीळ

असला तर त्यामुळें सौंदर्यांत भर पडते; पण तो तीळ प्रमाणाबाहेर मोठा झाला कीं......!

एकंदरींत मराठीमध्यें जानपदगीतें जितकीं विपुल होतील तितकें चांगलें ! वनोपवनांतून निर्झरांच्या कांठानें मोरावर आरूढ होऊन वीणा वाजवीत फिरणारी सरस्वति देवि त्यामुळें शेतकन्यांच्या झोपडींतून डोकावूं लागेल. अमृतपानाऐवजीं त्यांच्याबरोबर चटणीभाकर खाऊन ती आनंदांत होईल. मात्र हीं गीतें नागर भाषेंतच पाहिजेत, पण तिचें स्वरूप अत्यंत सोपें, साधें व सरळ पाहिजे. क्वचित् आभास उत्पन्न करण्याकरितां बोलभाषेंतील मर्यादित शब्द चालतील. बहुजनसमाजाला तीं गीतें कोणीं ऐकविलीं, अगर त्याला वाचतां येऊं लागल्यावर वेळ मिळाला, तर तो तीं गुणगुणूं लागेल. हें कालावधीनंतर होणारें कार्य बाजूला ठेवलें तरी त्या गीतांनीं आज मोठें कार्य होईल. उपेक्षणीय ठरलेल्या बहुजनसमाजाविषयीं सुशिक्षितांच्या मनांत त्या गीतांनीं सहानुभूति उत्पन्न होईल. ते खेडुतांकडे आपुलकीनें पाहूं लागतील, व त्यांच्यामधील अंतर कमी होईल. मात्र तीं गीतें लिहिणाऱ्या कवींनीं केवळ मागणीचा पुरवठा करण्याकरितां लिहावयास नको. पूर्ण माहिती मिळवून, सहृदयतेनें खेडुतांशीं समरस होऊन हीं गीतें लिहिलीं पाहिजेत. हें कार्य आमच्या कवींनीं केलें तर बहुजनसमाज त्यांचा अत्यंत ऋणी होईल.

REFBK-0006377
ग्रंथालय ठाणे
6226
6300

* **सुगी** ( दुसरी आवृत्ति )

महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कवींच्या
जानपदगीतांचा संग्रह — किं. १ रु.

* **मीठभाकरी**

ग. ल. ठोकळ यांच्या
स्फुट कवितांचा संग्रह — किं. १ रु.

* **शिवार**

के. नारखेडे यांच्या
जानपदगीतांचा संग्रह — किं. १ रु.

* **कडू साखर**

ग. ल. ठोकळ यांच्या
ग्रामीण जीवनावरील गोष्टी — किं. १॥ रु.

* **काव्यकलेचें अंतरंग**

के. नारखेडे यांच्या
काव्यविषयक निबंधांचा संग्रह — किं. २ रु.

* **पवार घराण्याचा इतिहास**

लेखकः—मा. वि. गुजर, बी. ए. — किं. ५ रु.

## पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें—

१. ग. ल. ठोकळ, ५६३/१ शिवाजीनगर, पुणें ५.

२. परचुरे, पुराणीक आणि मंडळी, माधवबाग, मुंबई.

३. मेसर्स जोशी आणि लोखंडे, ३३५ शनिवार, पुणें २.

४. द. र. कोपर्डेकर, ५२९ सदाशिव पेठ, पुणें २.